# मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे


संपादक

मोरेश्वर गं. दीक्षित

संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व

व

वि. गो. खोबरेकर

सहायक संचालक, पुराभिलेख


Maharashtra State Archives

पुराभिलेख विभाग--ऐतिहासिक प्रकाशन क्र. १

# मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची
# हस्ताक्षरयुक्त पत्रे

Maharashtra State Archives

संपादक
**मोरेश्वर गं. दीक्षित**
संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व
व
**वि. गो. खोबरेकर**
सहायक संचालक, पुराभिलेख

१९६९
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई

# अनुक्रमणिका

पृष्ठांक

१. प्रास्ताविक .. .. .. .. .. .. एक ते चार

२. पत्रलेखकांचा त्रोटक परिचय—

शहाजी राजे १–२, छत्रपती शिवाजी ३–४, छत्रपती संभाजी ५, छत्रपती राजाराम ६, छत्रपती शाहू ७, बाळाजी विश्वनाथ पेशवे ७, बाजीराव बल्लाळ पेशवे ८, छत्रपती संभाजी (कोल्हापूर) ९, फत्तेसिंग भोसले ९, पिलाजी जाधव १०, सटवोजी जाधव १०, व्यंकटराव नारायण घोरपडे ११, चिमणाजी बल्लाळ ११, यशवंतराव पवार १२, राधाबाई १२, नारायण दीक्षित पाटणकर १३, राणी जिजाबाई (कोल्हापूर) १४, मुरारराव घोरपडे १५, उदाजी चव्हाण १६, त्रिंबकराव (मामा) पेठे १६, विश्वासराव १७, जगजीवन परशुराम प्रतिनिधी १८, यमाजी शिवदेव मुतालिक १९, राणी ताराबाई २०–२१, बाळाजी बाजीराव (नानासाहेब) पेशवे २१, गोविंदपंत बुंदेले २२, जनार्दन बल्लाळ २२, अंताजी माणकेश्वर गंधे २३, नारो शंकर दाणी राजेबहाद्दर २४, विठ्ठल शिवदेव विंचूरकर २५, समशेर बहाद्दर २६, नाना फडणीस २७, गोपाळराव गोविंद पटवर्धन २८, जानोजी भोसले २९, विठ्ठल सुंदर परशुरामी ३०, मल्हारराव होळकर ३१, दमाजी गायकवाड ३२, माधवराव बल्लाळ पेशवे ३३–३४, नारायणराव बल्लाळ पेशवे ३४, हरि बल्लाळ फडके ३५, रघुनाथराव बाजीराव ऊर्फ दादासाहेब पेशवे ३६, आनंदीबाई पेशवे ३७, महादजी शिंदे ३८, साबाजी भोसले ३९, पुरुषोत्तम महादेव हिंगणे ३९, रामशास्त्री प्रभुणे ४०, सखाराम बापू बोकील ४०, आनंदराव धुळप ४१, माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव पेशवे ४१, रघुजी भोसले (दुसरे) ४२, अहिल्याबाई होळकर ४२, तुकोजी होळकर ४३, त्रिंबकजी डेंगळे ४३.

३. बालबोधीकरणासहित मूळ मोडी पत्रे—

शहाजी राजे .. .. .. .. .. .. ४४–४७
छत्रपती शिवाजी .. .. .. .. .. .. ४८–५१
छत्रपती संभाजी .. .. .. .. .. .. ५२–५५
छत्रपती राजाराम .. .. .. .. .. .. ५६–६५
बाळाजी विश्वनाथ पेशवे .. .. .. .. .. .. ६६–६९
बाजीराव बल्लाळ पेशवे .. .. .. .. .. .. ७०–७३
छत्रपती शाहू .. .. .. .. .. .. ७४–७५
छत्रपती संभाजी (कोल्हापूर) .. .. .. .. .. ७६–७९
फत्तेसिंग भोसले .. .. .. .. .. .. ८०–८३
पिलाजी जाधव .. .. .. .. .. .. ८४–८९
सटवोजी जाधव .. .. .. .. .. .. ९०–९७
व्यंकटराव नारायण घोरपडे .. .. .. .. .. .. ९८–१०३
चिमणाजी बल्लाळ .. .. .. .. .. .. १०४–१११
यशवंतराव पवार .. .. .. .. .. .. ११२–११५
राधाबाई .. .. .. .. .. .. ११६–११९
नारायण दीक्षित पाटणकर .. .. .. .. .. .. १२०–१२३
राणी जिजाबाई (कोल्हापूर) .. .. .. .. .. १२४–१२९
मुरारराव घोरपडे .. .. .. .. .. .. १३०–१३९
उदाजी चव्हाण .. .. .. .. .. .. १४०–१४३
त्रिंबकराव (मामा) पेठे .. .. .. .. .. .. १४४–१४९

L. 2602—1*a*

Maharashtra State Archives

| | पृष्ठांक |
|---|---|
| विश्वासराव | १५०–१५३ |
| जगजीवन परशुराम प्रतिनिधी | १५४–१५९ |
| यमाजी शिवदेव मुतालिक | १६०–१६५ |
| राणी ताराबाई | १६६–१६९ |
| बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे | १७०–१७५ |
| गोविंदपंत बुंदेले | १७६–१८३ |
| जनार्दन बल्लाळ | १८४–१९१ |
| अंताजी माणकेश्वर गंधे | १९२–१९९ |
| नारो शंकर दाणी राजेबहाद्दर | २००–२०६ |
| विठ्ठल शिवदेव विंचूरकर | २०६–२१३ |
| समशेरबहाद्दर | २१४–२१७ |
| नाना फडणीस | २१८–२१९ |
| गोपाळराव गोविंद पटवर्धन | २२०–२२७ |
| जानोजी भोसले | २२८–२३५ |
| विठ्ठल सुंदर परशुरामी | २३६–२४१ |
| मल्हारराव होळकर | २४२–२४५ |
| दमाजी गायकवाड | २४६–२५३ |
| माधवराव बल्लाळ पेशवे | २५४–२५७ |
| नारायण बल्लाळ पेशवे | २५८–२६१ |
| हरि बल्लाळ फडके | २६२–२६७ |
| रघुनाथराव बाजीराव पेशवे | २६८–२७१ |
| आनंदीबाई पेशवे | २७२–२७७ |
| महादजी शिंदे | २७८–२८३ |
| साबाजी भोसले | २८४–२८९ |
| पुरुषोत्तम महादेव हिंगणे | २९०–२९३ |
| रामशास्त्री प्रभुणे | २९४–२९९ |
| सखाराम बापू बोकील | ३००–३०३ |
| आनंदराव धुळप | ३०४–३०९ |
| माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव पेशवे | ३१०–३२१ |
| रघुजी भोसले (दुसरे) | ३२२–३२७ |
| अहिल्याबाई होळकर | ३२८–३३३ |
| तुकोजी होळकर | ३३४–३३७ |
| विवकर्जी ढेंगळे | ३३८–३४५ |




## प्रास्ताविक

**म**हाराष्ट्रेतिहासाच्या प्रांगणात प्रामुख्याने वावरलेल्या ५४ ऐतिहासिक स्त्री-पुरुषांनी लिहिलेल्या हस्ताक्षरांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकात केला आहे. इतिहासाचा अभ्यास करताना गेल्या दोन शतकांत ज्या राजकारणी पुरुषांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविला त्यांच्या हालचाली कशा होत? राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक बाबतीत ह्या व्यक्तींनी जो प्रपंच मांडला त्याचे मूळ स्वरूप कसे होते? त्यांचा एकमेकांशी पत्रव्यवहार कसा होई? हे सर्व जाणण्याची जिज्ञासा व कुतूहल बहुतेक इतिहासाभ्यासकांस असते. ज्या गोष्टींविषयी आपण इतिहासात वाचतो त्या गोष्टी घडत असता प्रत्यक्ष लेखाद्वारे प्रमुख व्यक्ती त्या कशा तऱ्हेने व्यक्त करीत, अशा तऱ्हेच्या पत्रव्यवहारादी साधनांचे मूळ स्वरूपात साक्षात दर्शन करण्याचा अल्पसा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथात केलेला दिसेल. ह्या ग्रंथात काही ठळक व्यक्तींची पत्रे त्यांच्या मुळाबरहुकूम व समप्रमाण आकारात छापली असल्यामुळे ह्या साधनांचे प्रत्यक्ष स्वरूप कसे होते हे जाणण्याची इच्छा काही अंशी फलद्रूप होईल.

मराठी इतिहासाची बव्हंश साधने अस्सल मोडी लिपीत लिहिलेली असून ती बालबोधीत छापून प्रसिद्ध करण्याचे काम कै. वि. का. राजवाडे, का. ना. साने, वासुदेवशास्त्री खरे, द. ब. पारसनीस, गो. स. सरदेसाई यांनी मोठ्या प्रमाणावर केले. भारत इतिहास संशोधक मंडळासारख्या इतिहास संशोधनास वाहिलेल्या संस्थांचाही ह्या कामात मोठा वाटा आहे. गेल्या पिढीपर्यंत मोडी लिहिण्या-वाचण्याचा सराव सामान्यतः प्रत्येक सुशिक्षित इसमास असे. मोडी ही नेहमीच्या पत्रव्यवहाराची लिपी असल्यामुळे ही पत्रे प्रसिद्ध करताना त्यांना कोठलीही अडचण भासलेली दिसत नाही. त्यांना अजरख्त-खाने, बेहबुबी ह्यासारख्या फारशी शब्दांचा भरणा शिवकालीन किंवा फार जुन्या पत्रव्यवहारात आढळतो. त्यावेळी मात्र केवळ सराईत माणसाचे सहाय्य घ्यावे लागे. पण अलिकडच्या काळात मोडीचा प्रसार शाळा-कॉलेजांतून नाहीसा झाला व त्यामुळे नेहमीच्या वळणाचे साधे मोडी वाचनही विद्यार्थ्यांस दुष्कर वाटू लागले.

मराठ्यांच्या इतिहासाची पुष्कळशी साधने मोडीत लिहिलेली आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या ह्या साधनसंपत्तीची गणती केली तर ती सहज ५–७ कोटींच्या वर जाईल. एवढ्या मोठ्या साधन-संभाराचा इतिहासासाठी उपयोग करून घेण्यासाठी मोडी वाचनाचा सराव असणे अत्यंत जरूर आहे. विशेषतः अलिकडच्या पिढीत ही निकड तर अधिकच भासते. मोडी लिपीतील अक्षरे वाचून त्यांचे वळण व वेगवेगळ्या काळातील फरक समजावेत, वाचण्याचा सराव व्हावा व त्याचबरोबर ह्या साधनांचे मूळ स्वरूप लक्षात यावे म्हणून ही अस्सल साधने त्यांच्या मूळ लिपीत म्हणजे मोडीत छापलेली आहेत.

वेगवेगळ्या हस्ताक्षरांचे नमुने लक्षात यावे म्हणून या प्रकाराचा उपक्रम पूर्वी श्री. आ. बा. जोशी बारामतीकर व श्री. आबा चांदोरकर ह्यांनी आपल्या "श्री शिवशाहीचा लेखनालंकार" ह्या १९३४ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात केला होता. परंतु त्यात प्रसिद्ध व्यक्तींच्या हस्ताक्षरांच्या दोन-दोन तीन-तीन ओळीच फक्त लहान आकारात छापून त्यांचे देवनागरी लिप्यंतर प्रत्येक व्यक्तीच्या त्रोटक

Maharashtra State Archives

तपशिलासह दिलेले होते. ह्या प्रयत्नात समूळ कागदाचे यथाप्रत दर्शन होत नाही व अक्षरांचा मूळचा आकार फोटो पद्धतीने लहान करून छापल्यामुळे त्यांच्या मुळाची चांगली कल्पना येत नाही असे आढळून येते.

अस्सल पत्ररूपी साधनांद्वारे महाराष्ट्रेतिहासातील ठळक प्रसंग दिग्दर्शित करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून इ. स. १९२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कै. द. वि. आपटे ह्यांच्या "महाराष्ट्र-इतिहास-मंजिरी अथवा निवडक ऐतिहासिक उतारे" ह्या पुस्तकाचा उल्लेख केला पाहिजे. कै. गो. स. सरदेसाई ह्यांनीही इ. स. १९३९ मध्ये छापलेले "ऐतिहासिक पत्रबोध" हे पुस्तकही अशाच प्रकारचे आहे.

कै. द. वि. आपटे व प्रो. रा. वि. ओतुरकर ह्यांनी "साधन-परिचय अर्थात मराठ्यांचा पत्ररूप इतिहास" ह्या नावाचे आणखी एक पुस्तक इ. स. १९४१ मध्ये प्रसिद्ध केले व त्याची दुसरी आवृत्ती १९६३ मध्ये प्रसिद्ध झाली. ह्यावरून मूळ साधनांवर आधारलेल्या इतिहासाची जनमनावरील पकड उत्कृष्टपणे दिसून येते.

वरील सर्व ग्रंथांत ऐतिहासिक पत्रांतील उतारे देऊन उल्लेख केलेला असला तरी मोडी कागदांच्या प्रतिकृती केवळ वानगीदाखल व खंडशः दिलेल्या होत्या. प्रस्तुत पुस्तकात सर्व मोडी कागद मुळाबरहुकूम उपलब्ध करून दिलेला असल्यामुळे त्याचे सम्यक् दर्शन वाचकांस घडेल अशी सोय करून दिली आहे. तसेच मूळ पत्राबरोबरच त्याचे बालबोधी रूपांतरही शक्य तितके समोरासमोर दिल्यामुळे मोडी वाचन सुलभ व्हावे हा हेतूही सहज साध्य होण्याजोगा आहे.

प्रस्तुत संग्रहातील एकूण ५४ पत्रांपैकी ३२ पत्रे पुणे येथील पेशवे दप्तरांतून मुद्दाम निवडलेली असून पहिली क्रमांक १ ते ५ ही पत्रे पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सौजन्याने छापलेली आहेत. आणखी सात पत्रे डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे ह्या संस्थेने प्रकाशनार्थ मोठ्या उदारतेने दिली त्यांचाही निर्देश योग्य स्थळी केला आहे. वरील दोन्ही संस्थांचे आम्ही आभारी आहोत.

ह्या संग्रहास जोडलेल्या परिशिष्टांत प्रथम पत्रलेखकाची थोडक्यात ओळख, कामगिरी, त्याचे महाराष्ट्रेतिहासातील स्थान, जन्म, मृत्यू व आयुष्यातील प्रमुख घटना ह्यांची माहिती दिली आहे व नंतर पत्रव्यवहाराचा संदर्भ सांगितला आहे. त्यापुढे पत्राचे बालबोधी लिप्यंतर दिलेले आहे. ते देताना प्रत्येक ओळीतील अक्षरांचा क्रम मुळाबरहुकूम ठेवला असल्यामुळे बाजूला छापलेल्या मोडी लेखनाशी त्याचा पडताळा पहाता येईल.

ह्या प्रत्येक पत्रातील सगळाच मजकूर पत्रलेखकाच्या हातचा नाही हे येथे स्पष्ट करणे जरूरीचे आहे. बहुतेक पत्रे कारकून किंवा लेखकाकडून लिहून घेतली जात व ज्यांच्या नावे पत्र जाई तो पत्राच्या शेवटचा समाप्तिदर्शक मजकूर तेवढा स्वहस्ते लिही. त्याच्या स्वदस्तूरची एखादी वाक्ये त्या पत्राचे प्रामाण्य मानण्यास पुरेशी असत. काही वेळा लेखनाच्या प्रारंभी किंवा अग्रभागी असलेला श्रीकार किंवा त्यासोबतचे दैवताचे नाव हे देखील पत्रमालकाच्या हस्ते लिहिलेले आढळते. पत्रलेखनाची ही पद्धती जाणकारांना पूर्णपणे परिचित असल्यामुळे त्याविषयी वेगळे लिहिण्याची आवश्यकता नाही. खाशांची ही अक्षरे प्रस्तुत पुस्तकात वेगळी खुणेने दाखविलेली आहेत.

पत्रांच्या लिप्यंतराविषयी आणखी थोडे स्पष्टीकरण करणे जरूर वाटते. मोडीत लिहिताना ऱ्हस्व-दीर्घाची फारशी तमा बाळगलेली नसते. बहुतेक ईकारांत शब्द दीर्घच आढळतात. त्यांचे बाळबोधीकरण करताना मराठीत ते शब्द रूढ आहेत त्याचप्रमाणे ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहिलेले आढळतील. उकारांच्या



बाबतीत हाच नियम लागू केलेला आहे. मोडी लिपी सलग लिहिली जात असल्यामुळे बाळबोधीतल्या-प्रमाणे त्यात पूर्णविराम आढळत नाही. ही विरामचिन्हे बालबोधी लिप्यंतरात जरूरी भासेल तशी दिलेली आहेत. सामान्यतः जलद रीतीने लिहिण्यासाठी मोडीचा आश्रय केला जात असल्यामुळे अक्षरां-वरील शिरोरेघ मोडी लेखनात ती योग्य जागी दिलेली असतेच असे नाही. उदाहरणार्थ 'खरे' आणि 'खेर' ही आडनावे मोडीत एकसारखी लिहिलेली दिसली तरी त्यात वावगे मानीत नसत. परंतु बालबोधी-करणात ह्या शिरोरेघा मुळात अभिप्रेत असतील तशा दिल्या आहेत. मोडी लिपीतील ही प्रतिक्रिया फारशी किंवा अरबी लेखनाच्या संपर्कामुळे झाली किंवा कसे हा संशोधनाचा विषय आहे. जनश्रुती किंवा आख्यायिकांतून मोडी लिपीचे जनकत्व यादव रामचंद्राचा श्री करणाधिप हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत ह्याचेकडे दिले जाते. परंतु प्रत्यक्ष तशी वस्तुस्थिती होती किंवा नाही हे समजण्यास सध्या कोणतेच साधन नाही. कारण यादव राजवटीत मोडीत कोरला गेलेला एकही उत्कीर्ण लेख उपलब्ध नाही. निजामशाही कालापासून काही अगदी थोड्या लेखांतून एखाद दुसरे अक्षर मोडीत लिहिलेले आढळते. परंतु वर सांगितल्याप्रमाणे मोडी जलद लिहिण्याची लिपी असल्यामुळे अशी अपवादात्मक स्थळेही फार थोडी आहेत. नाही म्हणावयास मोडीत ज्याला दं कार, अर्धा दं कार असे म्हटले जाते व ज्या चिन्हाचा केवळ पत्राच्या सुरवातीस वापर केला जातो तेवढे एकच अक्षर किंवा संक्षेप 'ओम्', किंवा प्रणव म्हणून यादव-कालाच्या आरंभापासून उत्कीर्ण लेखांत वापरलेले दिसते. उदा० शक १२२७ मधील यादव रामचंद्राचा काटा (जि. वाशीम) येथील शिलालेखाचा प्रारंभ पहा.[1] तथापि हे प्रणवाचे चिन्ह म्हणूनही मोडी कागदपत्रांत वापरले असल्यामुळे त्याच्या अक्षरविन्यासाविषयी जास्त लिहिण्यासारखे नाही.

ह्या ग्रंथातील पत्रलेखनाचा बारकाईने अभ्यास केला तर असे आढळून येईल की शिवकालीन मोडी लिखाणाचे वळण, पेशवाईतील वळणापेक्षा भिन्न व अधिक क्लिष्ट आहे. एकात एक गिरवून अक्षरे लिहिण्याची पद्धत व फारशी शब्दांचा उपयोग ह्यामुळे शिवकालातील लेखन बरेच दुर्बोध वाटते. देवूनु करुनु असे शब्दप्रयोगही ह्या लेखनात वारंवार येतात. त्यामुळे शिवकालीन कागदपत्रांचे वाचन हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊन बसला आहे व विशेष सराव असल्याशिवाय ह्या कालातील पत्रे वाचता येणे सामान्यतः कठीण जाते. ह्या उलट पेशवाईतील वळण अधिक सुलभ, स्वच्छ लिहिलेले व निर्दोष वाटते.

पत्र लिहिण्याच्या, सनदापत्रे करण्याच्या काही विशिष्ट पद्धती असत. समाजातील वेगवेगळ्या थरांतील इसमांनी आपल्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना किंवा समान दर्जाच्या लोकांना लिहिताना कशा प्रकारे लिहावे ह्याबद्दलचे स्थूल नियम भारतात फार पूर्वीपासून प्रचलित होते. लेखनपद्धतीची ही परंपरा जुनी असल्याचे याज्ञवल्क्य स्मृती, अग्निपुराण, अपरार्क टीका ह्यांतील काही उल्लेखांवरून दिसून येते. हेमाडपंती मेस्तक ह्या नावाने प्रचलित असलेल्या प्रकरणात लेखनाचे काही मायने दिलेले आढळतात. परंतु त्यांचे प्राचीनत्व नेमके अजमाविता येत नाही. १४ व्या शतकात गुजराथेत लेखपद्धती नावाचा ग्रंथ लिहिला गेला. त्यात प्राचीन काळी राजकुलातील लोक परस्परास कसे लिहीत ह्याचे काही नमुने दिलेले आहेत. क्रय-विक्रय पत्रे, गहाण खते, खरेदी पत्रे इत्यादी अनेक विषय त्यात हाताळले असून ती माहिती प्राचीन व्यवहार समजून येण्यास फारच उद्बोधक आहे. शिवकालात रामदास स्वामींनी लेखन कसे असावे ह्याबद्दल दासबोधातील एका समासात सुदीर्घ उपदेश केलेला आढळतो.

१. दीक्षित, मो. गं., मराठी शिलालेख—नवे पाठ, पृष्ठ ३४-३५, सुषमा (नागपूर), मे १९५४, पृष्ठे २५०-५३.



Maharashtra State Archives

पत्रव्यवहारात सुसूत्रता असावी ह्याबद्दल खुद्द श्री शिवाजी महाराजांनीही खास प्रयत्न केले. त्यांनी जे अनेक कायदे केले त्यांना 'पद्धती' ह्या नावाने ओळखले जाते. अशा पद्धतींपैकी 'लेखन-प्रशस्ती' ह्या नावाची एक 'पद्धती' शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून बाळाजी आवजी चिटणीस व इतर मुत्सद्दी मंडळींच्या विचारे रचली गेली. सर्व राजपत्रे शुद्ध मराठीत लिहिण्याची पद्धत त्यामुळे प्रचलित झाली.

स्वराज्य झाल्यावर राज्यातील अधिकारी, मुत्सद्दी व इतर लोक राजास व परस्परास लिहिताना मनास येईल तो मायना वापरीत होते. त्यामुळे एक शिस्त रहात नाही असे आढळल्यामुळे शिवाजी महाराजांनी पत्रांचे मायनेही ठरवून दिले.

मराठी राज्यकारभारांत खाजगी व सरकारी अशा प्रकारची पत्रे आढळतात. सरकारी कागदाबाबत शिवाजी महाराजांनी विशिष्ट नियम घालून दिले, त्यांचा अम्मल शाहूपर्यंत नियमित चालत आला. आज्ञापत्र लिहिण्याचे व त्यावर छत्रपतींचा शिक्का उमटविण्याचे काम चिटणीसांकडे असे. 'सूज्ञ असा' अशी छत्रपतींची स्वदस्तूरची अक्षरे आज्ञापत्राच्या शेवटी असली तर शिक्का करण्याचा संकेत पाळला जात नसे. कुळकर्णी, खिजमदगार इत्यादी लहानसहान अंमलदारांनाही छत्रपतींची आज्ञापत्रे शिक्क्या-शिवाय पाठविली जात.

सर्व राजपत्रे चिटणीसांनी लिहिल्यावर त्यावर अष्टप्रधान आपली चिन्हे करीत.

१. मुख्य प्रधान यांचा शिक्का व जोडावर मोर्तब.
१. प्रतिनिधींचा शिक्का त्याचे शेजारी 'करणे' करून दिल्हे.
१. 'बारसूद' व दप्तरची तेरीख फडणीसांची.

१. 'जाणिजे' चिटणीसांचे.
१. 'रुजू' सुरनीस, मोर्तब खाली सचिव 'सुरु सुदबार' खाली त्यांचे चिटणीस.
१. 'संमत मंत्री' खाली बार.
१. संमत सुमंत खाली बार.

सरकारी कागदपत्रांचे एकंदर ७८ प्रकार कै. राजवाडे ह्यांनी दिले आहेत. ह्या सर्व प्रकारांची ओळख मोडी चांगले वाचता येऊ लागल्यावर इतिहासाभ्यासूंस होते.

प्रस्तुत ग्रंथांचे ऐतिहासिक स्त्री-पुरुषांनी लिहिलेल्या पत्रांचे मूळचे स्वरूप माहीत व्हावे व तदनुषंगाने वेगवेगळ्या काळातील मोडी लेखनाचा नमुना नजरेस पडावा एवढेच प्रयोजन आहे व ते इतिहासाभ्यासकांना पुष्कळ उपयोगी पडेल असा भरवसा वाटतो.

**—मोरेश्वर गं. दीक्षित**



## पत्रलेखकांचा त्रोटक परिचय

(१) **शहाजी भोसले** (जन्म : १६००–१६०१ सुमारे, मृत्यू : २३–१–१६६४)

हे मालोजी भोसल्यांचे पुत्र व छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील. शहाजी राजांचे वडील लहानपणीच इंदापूरच्या स्वारीत मृत्यू पावल्यामुळे त्यांचे पालनपोषण आई व चुलते विठोजी यांनी केले. निजामशाही सरदार लखुजी जाधवराव यांच्या मुलीशी—जिजाबाईशी—त्यांचे लग्न झाले. प्रथम निजामशाहीत चाकरी करून सरदारी मिळविली. पण पुढे मलिकंबर द्वेष करू लागल्यामुळे ते आदिलशाहीत गेले (सन १६२५). तेथे त्यांना सरलष्कर हा किताब मिळाला. मलिकंबर मेल्यावर पुन्हा ते निजामशाहीत आले (सन १६२८). त्यांची खानदेशात दर्याखानावर रवानगी झाली. दरम्यान लखुजी जाधवरावांचा दरबारात खून झाल्यावर, दरबार आपल्याही विरुद्ध होतो आहे हे पाहून ते सैन्यासह संगमनेरावरून पुण्यावर आले. आदिल-शाहीतील सरदार मुरार जगदेवाने पुणे जाळले, तेव्हा गरोदर असणाऱ्या जिजाबाईस शिवनेरी येथे ठेवून ते दर्याखानावर गेले. त्यांना मोंगल सरदार अजमखानांकडून मनसब मिळाली. पण पुढे निजामशाहीचा सूत्रचालक फत्तेखानाने त्यांचेविरुद्ध मोगलांशी संधान जोडल्यावर त्यांनी मोंगलांचा पक्ष सोडला व नाशिक, संगमनेर, जुन्नर वगैरे भाग ताब्यात घेऊन पेमगिरी येथे नवी स्वतंत्र निजामशाही उभारली (सन १६३२). निजामशाहीतील मुस्तफाखान, आदिलशाहीतील रणदुल्लाखान व मोंगल सेनापती खानजमान यांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना माहुलीच्या किल्ल्यात कोंडले. तेव्हा निजामशाहास मोंगलांच्या ताब्यात देऊन त्यांनी विजापूरकरांची चाकरी पत्करली. तेव्हापासून त्यांची कर्नाटकच्या मोहिमेवर रवानगी झाली (सन १६२७). बसवापट्टणच्या मोहिमेतील कामगिरीबद्दल त्यांना बंगळूरचा किल्ला, त्याचप्रमाणे पुणे परगणा व मावळातील काही जहागीर देण्यात आली. पुढे कर्यात मावळातील गावाचा पोटमोकासा त्यांनी आपला पुत्र शिवाजी राजे यांचे नावे करून दिला (सन १६४१) व दादोजी कोंडदेवास व्यवस्थापक नेमले.

विजापूरकरांचे मांडलिकत्व कर्नाटकातील हिंदू राजेरजवाड्यांस मान्य करण्यास लावताना शहाजी राजांचे धोरण सौम्य व सलोख्याचे असे, त्यामुळे त्यांच्या राजनिष्ठेबद्दल विजापूर दरबारी संशय व्यक्त करण्यात येऊ लागला. विजापूर सरदार मुस्तफाखानांच्या चहाडीवरून त्यास पकडून विजापुरास नेण्यात आले. पण चौकशीत आरोप खोटा ठरल्याने विजापूर सुलतानाने त्यांस पाच लक्ष होनांचा बंगळूर प्रांत जहागीर दिला.

शिवाजीच्या स्वराज्य संपादनार्थ होणाऱ्या हालचालींमुळे व इतर काही किरकोळ निमित्तामुळे विजापूरकरांनी शहाजीराजांस पुन्हा कैद केले (२५ जुलै १६४८) आणि सिंहगड व बंगळूर हे किल्ले विजापूरकरांच्या ताब्यात देण्याच्या अटीवर सुटका केली (१६ मे १६४९). त्यानंतर त्यांना चार-पाच वर्षे जेनाखान पीरजादे या विजापुरी सरदाराच्या तंत्राने वागावे लागले. १६५४ पर्यंत त्यांची विजापूर दरबारी राजनिष्ठ सरदारांत गणना होत होती. पुढे तंजावरच्या मसलतीसाठी त्यांची दूर रवानगी झाली.



Maharashtra State Archives

१६५७ त सॅंद्रपट्टण येथील डचांचे ठाणे घेऊन त्यांनी त्यांचा व्यापार बुडविला, तेगनापट्टनचा किल्ला घेतला (१६६१) व तंजावरच्या मुलुखात ते लूट करू लागले. तंजावरच्या नायकाने विजापूरकरांशी तह करून त्यांच्या अरणी व बंगळूर किल्ल्यांवर हल्ला केला व बंकापूर येथे त्यांना कैद केले (१६६३), तथापि दोनच दिवसांनी त्यांची सुटका झाली. तंजावरच्या नव्या राजाच्या मदतीने त्यांनी त्रिचनापल्लीच्या किल्ल्यावर हल्ला केला. होद्दोगिरी येथे ते शिकारीस गेले असता घोड्यावरून पडून मृत्यू पावले (२३ जानेवारी १६६४). त्या जागी त्यांची समाधी आहे.

ह्या पत्रात विनायक भट ठकार यास चऱ्होलीच्या बाजाराचे विडवाईपण दिले आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ४४–४७ पहावीत]



(२) **छत्रपती शिवाजी** (जन्म : १९–२–१६३०; मृत्यू : ३–४–१६८०)

शहाजी राजांची बायको जिजाबाई हिच्या पोटी शिवाजी महाराजांचा जन्म झाला. महाराजांच्या जन्माच्या वेळी त्यांचे आईवडील अत्यंत संकटावस्थेत होते. मोंगल सैन्याशी शहाजी राजांचा निकराचा झगडा चालू होता. शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी जुन्नर जवळच्या शिवनेरी किल्ल्यावर झाला. महाराजांच्या आयुष्याची पहिली ७–८ वर्षे जिजाबाईला अत्यंत त्रासाची गेली. नवऱ्याचे बादशहाशी युद्ध चालू असल्यामुळे शत्रू तिला व मुलाला केव्हा पकडतील ह्याची भीती तिला सारखी वाटत होती. शिवाजी महाराजांचे बालपण पुण्याच्या त्यांच्या जहागिरीतच गेले. दादोजी कोंडदेवासारखा निस्पृह मार्गदर्शक व जिजाबाईसारखी चाणाक्ष माता महाराजांस लाभली. त्यांच्याकडूनच त्यांस धर्माचे, नीतीचे शिक्षण मिळाले. बालपणीच शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या आसमंतातील मावळ प्रदेशात फिरून घोड्यावर बसणे, कुस्ती खेळणे, पोहणे, तलवार चालविणे इत्यादी अनेक अवघड कलांत वाकबगारी मिळविली. प्रत्यक्ष राज्यकारभार कसा चालवावयाचा ह्याचे धडेही त्यांस दादोजीकडून मिळाले. महाराजांनी मावळे लोकांत फिरून आपल्या जिवास जीव देणारे मित्र मिळवून एक मावळे मंडळ तयार केले, आणि गड काबीज करण्याच्या आपल्या कार्यास तोरणा किल्ला हस्तगत करून सुरवात केली. पुण्याच्या आसपासचे किल्ले घेतले व भीमा आणि नीरा यांच्या खोऱ्यांत एक लहानसे राज्य निर्माण केले आणि मोठमोठ्या देशमुखांचे सहकार्य मिळविले. जावळीचे मोरे बधले नाहीत म्हणून त्यांनी त्याजला कापून काढले. बाकीचे महाराजांस सामील झाले. त्यामुळे जुन्नरपासून ते वाईपर्यंतच्या १२ मावळांवर शिवाजी महाराजांचा हुकूम चालू लागला. १६५७ सालात महाराजांनी जुन्नर व अहमदनगर ही शहरे लुटली आणि आदिलशाहीतील कल्याण आणि भिवंडी ही शहरे काबीज केली. १६५७ च्या अखेरीस जवळजवळ सर्व उत्तर कोकण प्रांत महाराजांनी आपल्या अधिपत्याखाली आणला. राज्यवर्धनाचे काम चालले असता अंतर्गत राज्यकारभाराकडेही त्यांनी चांगले लक्ष पुरविले व राज्यकारभार हाकण्यास नवीन हुद्यांची निवडणूक करून त्यावर योग्य माणसे नेमली. अष्टप्रधान मंडळ निर्माण करून त्यांनी मोरोपंत पिंगळे यास पंतप्रधान, निळो सोनदेव यास मजुमदार, अण्णाजी दत्तोजी यास सचिव, गंगू मंगाजीला वाकसनीस, नेताजी पालकर यास सरनोबत, बाळाजी आवजीला चिटणीस अशा नेमणुका केल्या. विजापूरकरांना त्यांचा हा उद्योग पाहून राग आला. त्यांची खोड मोडण्याकरिता विजापूर दरबारने अफजुलखानास त्यांवर पाठविले. प्रतापगडच्या भेटीत इ. स. १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजुलखानाचा वध झाला. दुसऱ्या वर्षी अफजुलखानाचा मुलगा व इतर विजापुरी सरदार चालून आले त्यांचाही शिवाजी महाराजांनी धुव्वा उडविला. तेव्हा विजापूरकरांनी २२ सप्टेंबर १६६० रोजी त्यांच्याशी सलोख्याचा तह केला. या मुदतीत त्यांनी अनेक किल्ले बांधले. औरंगजेबास त्यांचा हा स्वतंत्र उद्योग मुळीच खपला नाही. त्याने आपला मामा शाइस्तेखान यास महाराजांवर पाठविले. त्याचा महाराजांनी खरपूस समाचार घेतल्यामुळे त्यास आपला मुलगा, काही राण्या व चार बोटे गमावून निराशेने परत जावे लागले. ह्या अचाट कृत्याने महाराजांचे वजन सर्वत्र वाढले आणि त्यांबद्दल भीतियुक्त आदर सर्वत्र निर्माण झाला. यावेळी समुद्र किनाऱ्यावरील इंग्रजांना महाराजांनी चपराक दिली. सुरतेवर इ. स. १६६२ मध्ये छापा घालून व १ कोटी रुपये लूट घेऊन शिवाजी महाराज परतले. अशा तऱ्हेने वसईपासून मालवणपर्यंतची समुद्रपट्टी आणि तिथपासून सह्य पर्वतापर्यंतचा प्रदेश मराठी राज्यात मोडू लागला. सुरतेवरील हल्ल्याने महाराजांनी औरंगजेबाचा क्रोध आपल्यावर ओढून घेतला. औरंगजेबाने त्यांचा नायनाट करण्याच्या हेतूने आपले दोन धुरंधर सरदार, मिर्झा राजा जयसिंग व

दिलेरखान, यांना दक्षिणेत पाठविले. ह्या दोघांनी महाराजांचे किल्ले एकामागून एक घेण्यास सुरवात केली. त्यामुळे महाराजांना एकंदर भयानक परिस्थितीची कल्पना आली. म्हणून त्यांनी जयसिंग व दिलेरखान या दोघांशी वाटाघाटी करून समेट घडविला. समेटात ठरल्याप्रमाणे महाराजांनी आपले २३ किल्ले मोंगलांच्या ताब्यात दिले आणि स्वतः औरंगजेब बादशहाच्या भेटीस आग्र्यास गेले. आग्र्यास गेल्यावर औरंगजेबाने त्यांस अपमानास्पद वागणूक देऊन कैदेत टाकले. बादशहाच्या कैदेतून त्यांनी मोठ्या धूर्तपणे पलायन केले. आणि वेषांतर करून ते सुरक्षितपणे दक्षिणेत पोहोचले.

दक्षिणेत आल्यावर महाराजांनी मोंगलांकडे असलेले आपले किल्ले जिंकून घेण्याचा धूमधडाका सुरू केला. पन्हाळा काबीज करून विजापूरकरांवर वचक बसविला. गमावलेला मुलूख पुन्हा ताब्यात आणल्यानंतर महाराजांनी आपणांस तारीख ५ जून १६७४ रोजी राज्याभिषेक करवून घेतला व राज्यकारभाराकरिता सरकारी कामाचे गट पाडून कायदेकानू बनविले आणि कामकाजात संस्कृत शब्दांचा उपयोग करावयाचा असे ठरवून त्याकरिता राज्यव्यवहार कोश नावाचा उत्कृष्ट शब्दकोश तयार करवून घेतला.

दुसऱ्या वर्षी महाराजांची स्वारी दक्षिणदिग्विजय करण्यास निघाली. भागानगर येथे शहाकडून सत्कार करून घेऊन त्या फौजा दक्षिणेत जिंजीपर्यंत जाऊन त्यांनी जिंजी किल्ला हस्तगत केला व सावत्र भाऊ व्यंकोजी यास समजाविले आणि स्वारी रायगड येथे डिसेंबरात येऊन पोहोचली. स्वराज्य संस्थापक व गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे देहावसान दिनांक ३ एप्रिल १६८० रोजी झाले.

या पत्रात रुद्राप्पा नाईक देसाई यास गनिमाचे ठाणे उठवून देण्यास आज्ञा केली आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ४८–५१ पहावीत]



(३) **छत्रपती संभाजी** (जन्म : १४–५–१६५७; मृत्यू : ११–३–१६८९)

छत्रपती शिवाजी महाराजांचे हे थोरले पुत्र. ह्यांचा जन्म तारीख १४ मे १६५७ रोजी पुरंदरावर झाला. त्यांची आई सईबाई त्यांच्या जन्मानंतर दोन वर्षांनी निवर्तल्यावर त्यांचे संगोपन आजी जिजाबाईने केले. संभाजी राजे ह्यांनी आपल्या बालपणी शिवाजी महाराजांचे साहसी जीवन पाहिले होते. त्याचा विलक्षण परिणाम त्यांच्या मनावर होऊन ते वडिलांपेक्षा साहसी आणि शूर निपजले. राज्यकर्त्यास न शोभणारा तामसीपणा, उतावळीपणा व लहरीपणा हे गुण त्यांच्या अंगी होते. त्यामुळे संभाजीराजांची कारकीर्द सुखाची झाली नाही.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांची आई सोयराबाईने राजारामास गादीवर बसवून राज्याचा बंदोबस्त केला. हे संभाजीराजांस न आवडून त्यांनी त्या मायलेकांस कैदेत टाकले व आपल्या विरुद्ध असलेल्या लोकांवर सूड उगवून आपल्याला तारीख १६ जानेवारी १६८१ रोजी राज्याभिषेक करवून घेतला.

छत्रपती झाल्यावर छत्रपती संभाजी महाराजांनी कवी कलश ऊर्फ कबजी ह्या कनोजा ब्राह्मणास आपला मुख्य प्रधान नेमले. शिवाजी महाराजांच्या काळी जे प्रधान मंडळात होते ते आपल्या विरुद्ध आहेत असे समजून त्यांना काढून टाकले. आणि आपल्या पसंतीची माणसे आपल्या प्रधान मंडळात नेमली. त्यांच्या कारकिर्दीस युद्धप्रसंगानेच सुरवात झाली. गादीवर आल्यावर जंजिऱ्याचा सिद्दी, गोव्याचे पोर्तुगीज व मोंगल बादशहा या तिघांशीच मुख्यतः त्यांस युद्ध करावे लागले. सन १६८१ त त्यांचा नौकाधीश दौलतखान याच्या सिद्दी कासमबरोबर चकमकी झडल्या. सिद्दी कासमास औरंगजेब बादशहानेच फूस लावून त्याजकडून संभाजी महाराजांवर चढाई करविली होती. चहूबाजूने महाराजांविरुद्ध उचल करावी आणि त्यांस पेचात आणून पराभूत करावे हा बादशहाचा मानस होता. स्वतः बादशहा औरंगजेब दक्षिणेत मोंगल सैन्य घेऊन त्यांचेवर चालून आला. सिद्दीस फूस दिल्यावर त्याने गोव्याच्या पोर्तुगिजांना संभाजीविरुद्ध उठविले. संभाजी महाराजांना त्यामुळे ह्या तिन्ही आघाड्यांवर लढावे लागले. सिद्दीचा त्यांनी बऱ्याच वेळा पराभव केला. पोर्तुगिजांचाही पराभव करून त्यांनी त्यांची चांगलीच खोड मोडली व त्यांना आपल्याशी तह करण्यास भाग पाडले. १६८१ पासून ४ वर्षे पावेतो संभाजी महाराजांनी औरंगजेब बादशहाशी नेटाने लढा केला. त्यात त्यांची सरशी होती. पण पुढील तीन-चार वर्षांत त्यांची घसरपट्टी झाली. ते कवी कलश ह्याच्या नादी लागून व्यसनात निमग्न राहू लागले. ह्या संधीचा फायदा घेऊन अकबराचा सरदार मुकरबखान ह्याने त्यांस संगमेश्वरी अचानक छापा घालून पकडले आणि बादशहासमोर आणले. बादशहाने त्यांचे हालहाल करून त्यांस तारीख ११ मार्च १६८९ रोजी जिवे मारिले.

ते बापाप्रमाणेच शूर होते. ते निःपक्षपाती न्याय देत असत. प्रजाहिताची कळकळही त्यांस होती. पण व्यसनाधीन झाल्यामुळे त्यांचा अशा वाईट रीतीने शेवट झाला.

या पत्रात संभाजी महाराजांनी मुरगोडकर देसाईस अभयपत्र दिले आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ५२–५५ पहावीत]



Maharashtra State Archives

**(४–५) छत्रपती राजाराम** (जन्म : २४–२–१६७०; मृत्यू : २–३–१७००)

छत्रपती शिवाजी महाराजांचे हे द्वितीय पुत्र. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १८ व्या दिवशी सोयराबाईच्या बाजूच्या मंडळींनी त्यांना गादीवर बसविले. पण दोनच महिन्यांनी संभाजी राजांनी त्यांस नजरकैदेत टाकून राजसूत्रे आपल्या हातात घेतली. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर त्यांचा मुलगा शाहू वयात येईपर्यंत त्यांनी कारभार पहावा असे ठरून ९ फेब्रुवारी १६८९ रोजी दुसरे मंचकारोहण झाले. त्यावेळी मोंगली छावणीच्या दक्षिणेतील हालचालीमुळे मराठी राज्याची स्थिती शोचनीय झाली होती. अशा प्रसंगी प्रल्हाद निराजी वगैरे मंडळींच्या सल्ल्याने आपले आसन रायगडी स्थिर न ठेवता रायगड ते विशाळगडापर्यंत कोणत्याही किल्ल्यात राजाराम महाराजांनी राहून मराठी सैन्याने त्यांच्यापासून जवळच रहावे असे ठरविले. पुढे जिंजीचा किल्ला आपल्या बाजूचा करून घेऊन त्यांनी तिकडे प्रयाण केले (सप्टेंबर १६८९), व जिंजीस अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. संताजी घोरपडे यास मुख्य सेनापती व प्रल्हाद निराजीस प्रतिनिधी नेमले व जिंजीस राहून राज्यशकट चालविण्याचा प्रयत्न केला. मोंगलांनी जिंजीस वेढा घातला. पण सात वर्षेपर्यंत मराठ्यांनी त्यास दाद दिली नाही. शेवटी मोंगलांच्या हातात तुरी देऊन राजाराम महाराज वेलोरास आल्यावर ७ फेब्रुवारी १६८९ रोजी जिंजी किल्ला झुल्पिकारखानाच्या ताब्यात आला. २२ फेब्रुवारीस ते विशाळगडी आले. सातारा येथे राजधानी करून सैन्य जमवून वऱ्हाड-खानदेशात त्यांनी चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यास प्रारंभ केला. इतक्यात संताजी व धनाजी यांच्यात दुहीचे बीज पेरले जाऊन त्यांच्यात आयेवाटकुटी येथे लढाई झाली. संताजीचे सेनापतीपद काढून घेण्यात आले. १६९९ च्या ऑक्टोबरात नेमाजी शिंदे, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले, राणोजी घोरपडे यांच्या मदतीने आदरकीच्या घाटातून सुरतेचा रोख धरला तेव्हा त्यांना मोंगलांनी परिंड्याजवळ गाठले. मोंगलांच्या हातावर तुरी देऊन राजाराम महाराजांनी टेंभुर्णीजवळ भीमा उतरून ब्रह्मपुरी येथील बादशाही छावणीवर हल्ला केला, पण तो साधला नाही. दरम्यान औरंगजेबाने स्वतः मावळात चाल केली व साताऱ्याला वेढा दिला. तेव्हा राजाराम महाराजांस आश्रयार्थ सिंहगडावर यावे लागले. तेथेच अल्पकाळ ज्वर येऊन छातीच्या विकाराने दिनांक २ मार्च १७०० रोजी ते मृत्यू पावले.

राजाराम महाराजांचा स्वभाव शांत असून त्यांचे अंगी कोणताच दुर्गुण नव्हता. हे राज्य स्वतःचे न समजता शाहूचेच आहे ह्या भावनेने त्यांनी कारभार केला. विश्वासू माणसांवर भरवसा टाकून निभावणूक केली. त्यांची कारकीर्द म्हणजे मराठे वीरांनी व मुत्सद्यांनी संगनमताने औरंगजेबास शह दिला त्याचाच वृत्तांत होय.

चौथ्या पत्रात सदाशिव नाईक सौंदेकर यांस अकोले वगैरे पाच महाल व गडकोट वंशपरंपरा बहाल केली आहे.

पाचव्या पत्रात छत्रपती राजाराम सरदारास आपल्याकडे वळविण्यासाठी सप्तहजारी नेमणूक देण्याचे आमिष दाखवीत आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ५६–६५ पहावीत]



**(६) छत्रपती शाहू** (जन्म : १८–५–१६८२; मृत्यू : १५–१२–१७४९)

हे शिवछत्रपतींचे नातू व संभाजीचे पुत्र. यांचा जन्म माणगावजवळ गांगवली येथे तारीख १८ मे १६८२ रोजी झाला.

इ. स. १६८९ च्या नोव्हेंबरपासून पुढे २८ वर्षे त्यांना आपल्या मातुश्रींसह मोंगल बादशहाचे कैदेत काढावी लागली. औरंगजेब बादशहा निवर्तल्यावर त्याचा पुत्र अजमशहा याने मराठ्यांस आपसात भांडत ठेवण्याकरिता शाहू महाराजांची सुटका केली. ते मे १७०७ मध्ये महाराष्ट्रात आले व त्यांनी १२ जानेवारी १७०८ मध्ये स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. त्यांची कारकीर्द ४२ वर्षे झाली. या कालावधीत त्यांनी तीन पेशवे नेमले, अनेक गुणवान लोक जवळ केले, अनेक सरदारांना सरंजामासाठी परमुलूख लावून देऊन त्यांनी मुलुखगिरीद्वारा मराठी सत्ता सबंध हिंदुस्थानभर पसरविण्याचा उद्योग जवळजवळ पुरा करीत आणला. त्यांच्या कारकिर्दीत राज्याचा विस्तार वाढला, व्यापही वाढला व दिल्लीच्या सत्ताधिशांचे कारभारी म्हणून छत्रपतींचे सरदार वावरू लागले. बादशहास न दुखविता बादशाही दौलत मराठ्यांनी राखावी ह्या त्यांच्या सूत्राची अंमलबजावणी त्यांच्या कारकिर्दीत मराठ्यांकडून होऊ शकली नाही. ती पुढे महादजी शिंदे यांनी १७८४ मध्ये बादशाही ताब्यात घेऊन केली. छत्रपती शाहू निपुत्रिक असे १५ डिसेंबर १७४९ मध्ये वारले. माणसाची अचूक पारख व योग्यता, शांत व कणवाळू स्वभाव, यामुळे त्यांची कारकीर्द ही मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष करणारी झाली.

प्रस्तुत पत्रात शाहू महाराजांनी पंतप्रधान बाजीराव यास सरकार कोठीकडे शिरस्त्याप्रमाणे मिठाचा पुरवठा होऊ देऊन त्यावरील जकात पेण बंदरी न घेणे अशी आज्ञा केली आहे. छत्रपती आपल्या हुकुमाने जकात माफ कशी करत असत याचे उदाहरण यात आहे. ‘सुदन असा’ हे शब्द छत्रपतींच्या हातचे.

[पत्रासाठी पृष्ठे ७४–७५ पहावीत]

**(७) बाळाजी विश्वनाथ** (मृत्यू : २–४–१७२०)

शाहू महाराजांस राज्यप्राप्ती झाल्यावर त्यांचा जम बसविण्यात बाळाजी विश्वनाथ भट ह्यांनी पुढाकार घेतला. त्यात त्यांना यश आल्यामुळे शाहू महाराजांनी त्यांस १६ नोव्हेंबर १७१३ रोजी आपला पेशवा नेमले. पेशवे बाळाजी विश्वनाथ मूळचे कोकणातील श्रीवर्धन गावचे. त्यांनी आपल्या कर्तबगारीने व पराक्रमाने मराठी राज्याची घडी बसविली व आपणास अनेक गावे शाहू महाराजांकडून इनाम मिळविली. १७१८–१९ मध्ये पेशवे बाळाजी विश्वनाथ दिल्लीस सय्यद बंधूंच्या मदतीस गेले. त्या मोबदल्यात दक्षिण सुभ्याच्या चौथाई-सरदेशमुखीचे हक्क व स्वराज्याची सनद मिळवून ते परत आले. त्यांनी शाहू महाराजांस कठीण प्रसंगी मदत केली व सनदा मिळवून मराठ्यांस नवीन उद्योगाचे पराक्रमक्षेत्र खुले केले. त्यांनी वसुलाची व्यवस्था उत्तम ठेवली, दिनांक २ एप्रिल १७२० रोजी त्यांचे देहावसान झाले.

राज्यात पुंडाई करणाऱ्या सरदारांस शिक्षा करून मराठी मुलुखात आपल्या सत्तेचा जम बसविण्याची कामगिरी छत्रपती शाहू महाराजांनी ह्यांवर सोपविली होती. राज्यातील बंडखोर सरदारांचा बंदोबस्त पेशवे बाळाजी विश्वनाथ कसा करीत ते प्रस्तुत पत्रावरून दिसून येते. ह्यात भोजजी पाटील अक्कलकोटकर हे हरामखोरी करतात म्हणून त्यास कैद करून दंड केल्याचा उल्लेख आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ६६–६९ पहावीत]



Maharashtra State Archives

(८) **बाजीराव बल्लाळ पेशवे** (जन्म : १८-८-१७००; मृत्यू : २८-४-१७४०)

थोरले बाजीराव यांचा जन्म १८ ऑगस्ट १७०० रोजी झाला. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे हे वडील चिरंजीव. हे लहानपणापासून हुशार व धाडसी होते. त्यामुळे पेशवे बाळाजी विश्वनाथ त्यांच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांनी ह्यांस १७ एप्रिल १७२० रोजी पेशवाईची वस्त्रे दिली. यांच्या कारकिर्दीतील मुख्य घटना म्हणजे मराठे-निजाम कलह व निजामाची शरणागती, माळवा व गुजराथची चौथाई व सरदेशमुखी यांची प्राप्ती, माळव्याचा मोंगली सुभेदार राजा गिरधर बहादूर व त्यांचा भाऊ दयाबहादूर यांचा संपूर्ण पाडाव, कोल्हापूरकर संभाजी, चंद्रसेन जाधव, त्रिंबकराव दाभाडे यांचा बंदोबस्त, सन १७२९ च्या मार्चमधील बुंदेलखंडातल्या छत्रसाल राजाला महमदखान बंगष याच्या विरुद्ध मदत आणि बंगषाचा पराभव या होत. याच वेळेला त्यांना मस्तानीची प्राप्ती झाली. यांच्या कारकिर्दीत नादिरशहाने हिंदुस्थानवर स्वारी केली, तेव्हा दिल्लीच्या बादशहाला मदत करण्यासाठी हे उत्तरेकडे निघाले. पण त्यापूर्वीच नादिरशहा निघून गेला होता. अफाट साहस व शौर्य यामुळे यांचा सर्व हिंदुस्थानात दरारा होता, त्यामुळे जेव्हा यांची धर्मपत्नी काशीबाईसाहेब उत्तरेकडे यात्रेला गेल्या तेव्हा त्या प्रांतातल्या सर्व राजेरजवाड्यांनी व खुद्द दिल्लीच्या बादशहाने बाईसाहेबांची सर्व व्यवस्था ठेवली होती. यांच्या कारकिर्दीत तेजस्वी व पराक्रमी सरदारांची एक मालिकाच निर्माण झाली. शिंदे, होळकर, बुंदेले, पवार, गायकवाड, हिंगणे, कोल्हटकर, वगैरे अनेक ब्राह्मण व मराठे सरदार पुढे येऊन त्यांनी वऱ्हाड, माळवा, बुंदेलखंड, दिल्ली वगैरे उत्तरेकडील प्रांतांत मराठ्यांचे वर्चस्व स्थापिले. धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी यांचे गुरू. बाजीराव साहेबांस बाळाजी, रामचंद्र, जनार्दन व रघुनाथराव असे चार औरस व मस्तानीपुत्र समशेर बहादूर असे एकंदर पाच पुत्र होते. मस्तानीचा व यांचा प्रेमसंबंध व त्यामुळे निर्माण झालेला गृहकलह बरेच दिवस चालला व त्यामुळे यांना खूप मनस्ताप झाला. उत्तरेकडे स्वारीवर असताना नर्मदाकाठी खरगोण जिल्ह्यातील रावेरखेडी येथे बाजीराव साहेब तापाने आजारी पडले आणि तेथेच २८ एप्रिल १७४० रोजी मृत्यू पावले.

बाजीराव पेशवे यांचे वडील बाळाजी विश्वनाथ याजबरोबर बाळाजी महादेव फडणीस हे दिल्लीस गेले असता तेथे बादशहाकडून चौथाईच्या सनदा घेऊन ते आपल्या मुक्कामात येत असता वाटेत पठाणांनी त्यास घेऊन जी दंगल केली तीत बाळाजी महादेव ठार झाले. त्यांचे चालवणे योग्य असे वाटून छत्रपतींनी बाळाजी महादेवचा भाऊ रामजी महादेव व पुत्र जनार्दन बल्लाळ ऊर्फ नाना यांना बागसाई गाव इनाम दिला. हे इनाम त्यांचेकडे वंशपरंपरेने चालू राहील असे प्रस्तुत पत्रात बाजीराव साहेबांनी पुन्हा सांगितले आहे. या पत्रावरून पुढील गोष्टी ध्यानात घेण्यासारख्या आहेत. सरकारातून इनाम गाव मंजूर झाल्यानंतर त्या पत्रात नमूद करावयाच्या गोष्टी अशा : (१) दरवर्षी सरकारातून इनामाबाबतचा नवीन हुकूम मागू नये. (२) या पत्राची प्रत देशपांडेकडे देऊन मूळ पत्र त्यांचेकडून मागून घेऊन देणे.

[पत्रासाठी पृष्ठे ७०-७३ पहावीत]



(९) **छत्रपती संभाजी** (कोल्हापूरकर) (जन्म : २३-५-१६९८; मृत्यू : २०-१२-१७६०)

छत्रपती राजाराम व राजसबाई यांचे हे पुत्र. हे कोल्हापूर राज्याचे संस्थापक मानले जातात. यांचा जन्म जिंजीस इ. स. १६९८ मध्ये झाला. यानी आपला सावत्र भाऊ शिवाजी व त्याची आई ताराबाई याना कैद करून कोल्हापूरची गादी मिळविली. यांच्या कारकिर्दीत रामचंद्र नीळकंठ अमात्य यानी आज्ञापत्र नावाचा राजनीतीवरील ग्रंथ लिहिला. शाहू छत्रपतींच्या मुलुखाला यानी उपद्रव दिल्याने पेशवे बाळाजी विश्वनाथ यानी त्यांचा वडगाव (सन १७१८) व उरुणवह (सन १७२०) या दोन ठिकाणी पराभव केला. हे कृष्णा व तुंगभद्रा यांच्यामधील प्रदेशावर आपली सत्ता मानीत असत व त्या आधारावर त्यानी चंद्रसेन जाधव व निजाम यांच्या साहाय्याने तिकडे आक्रमण केले. शेवटी लढाईत यांचा पराभव होऊन वारणेचा प्रसिद्ध तह झाला (सन १७२१) व शाहू बरोबर यांचा सलोखा झाला. पुढे शाहू व संभाजी यांच्या अनेक भेटी झाल्या. शाहू महाराजांनी १७४० त घोरपडे, शिंदे आदी सरदारांना संभाजीच्या प्रांतास उपसर्ग पोचू न देऊन त्यांचा अंमल आहे ऐसे करणे अशा ताकिदा दिल्या. करवीर राज्य व सातारा राज्य ही दोन्ही राज्ये शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर एक करून करवीर छत्रपती महाराजांचा एकछत्र शिक्का चालावा असा करार संभाजी महाराज, पेशवे बाळाजी बाजीराव व त्यांचे चुलत बंधू सदाशिवराव भाऊ यांचेमध्ये इ. स. १७४० त झाला. पण शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इच्छेनुसार दोन्ही राज्ये एक झाली नाहीत इतकेच नव्हे तर शाहू महाराज कैलासवासी झाल्यावर संभाजी महाराज करवीरकर यानी वारणा नदी अलीकडे येऊ नये असे नानासाहेब पेशव्यांनी कळविले. या वेळेपासून पेशवे व करवीरकर संभाजी यांच्यात बेबनाव झाला. तारीख २० डिसेंबर १७६० रोजी हे निवर्तले.

दुर्गोजीराजे महाडीक याना साथ देऊन स्वामीकार्य सिद्धीस जाईल असे करणे असा आदेश प्रस्तुत पत्रात बाबाजी नाईक निंबाळकर यांस केलेला आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ७६-७९ पहावीत]

(१०) **फत्तेसिंग भोसले** (मृत्यू : २०-११-१७६०)

हे शाहू महाराजांचे मानसपुत्र. शाहू महाराज सुटून दक्षिणेत आले त्यावेळी पारदच्या सयाजी लोखंडे नावाच्या पाटलाने त्यांस विरोध केला. त्यावेळी हे पाटील लढाईत कामास आले. त्यांच्या स्त्रीने आपला पुत्र राणोजी यास शाहू महाराजांच्या पायावर ठेविले व त्याचे पालन करावे म्हणून विनंती केली. शाहूने त्याचे नाव फत्तेसिंग ठेविले. त्याचा सांभाळ शाहू महाराजांची राणी विरूबाई हिने केला. विरूबाईच्या निधनानंतर तिची क्रिया या फत्तेसिंगाने केली. तिची जिंदगी व तिच्या खर्चासाठी तोडून दिलेला अक्कलकोट परगण्याचा भाग फत्तेसिंगास मिळाला. हेच अक्कलकोट संस्थानचे संस्थापक होत. फत्तेसिंग भोसले ह्यांनी बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व नानासाहेब यांच्याबरोबर व स्वतंत्रपणे अनेक मोहिमांत भाग घेऊन मराठी सत्तेचा विस्तार करण्यास साह्य केले. कोल्हापूर, कर्नाटक, बुंदेलखंड, भागानगर, त्रिचनापल्ली इत्यादी अनेक ठिकाणी स्वाऱ्या करून आपले शौर्य प्रगट केले. १७६० त यांस मृत्यू आला.

प्रस्तुत पत्रावरून पेशवाईत सरदार लोक घड्याळ ही परदेशी उपयुक्त चीज वापरू लागले हे समजून येते. घड्याळाचा वापर दर्शविणारे हे पत्र वाचकांस उद्बोधक वाटेल.

[पत्रासाठी पृष्ठे ८०-८३ पहावीत]



L. 2602—3

Maharashtra State Archives

### (११) **पिलाजी जाधव** (मृत्यू : ३–७–१७५१)

यांच्या वडिलांचे नाव चांगोजी व आईचे हंसाई. छत्रपती शाहू महाराजांची समग्र कारकीर्द यानी पाहिली व हरएक महत्त्वाच्या प्रसंगी मराठी राज्याची यानी सेवा केली. सन १७०७ मध्ये हे शाहू महाराजांस, ते दक्षिणेत आल्यावर मिळाले. चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांच्या झगड्यात यानी बाळाजीस खूप मदत केली. दमाजी थोराताचे बंड मोडून त्याला पकडून शाहूपुढे हजर केले. सन १७२४ मध्ये यानी निजामाच्या औरंगाबादेकडील मुलुखावर मराठ्यांचा अंमल बसविला. सन १७२८ च्या चिमाजी अप्पाच्या माळव्यातील स्वारीत हे होते. तसेच बाजीराव पेशव्यांच्या बरोबर बुंदेलखंडात पण हे गेले होते. सन १७३५ त शाहू महाराजांनी याना कोकणात पाठविले होते. त्यानी भोपाळच्या सन १७३८ च्या लढाईत फार महत्त्वाची कामगिरी केली. जंजिरा, दिल्ली व वसई वगैरे मोहिमांत जव्हार वगैरे उत्तर कोकणातील प्रदेश जिंकण्याचे काम यानी केले. सन १७४४–४५ त यानी उत्तरेकडे स्वारी करून तारीख २२ मार्चला भेलसा हस्तगत करून भोपाळच्या फैज महंमदखान याजबरोबर तह केला. पेशव्यांशी यांचा फारच घरोबा होता. नानासाहेब याना काका म्हणत असत. तारीख ३ जुलै १७५१ रोजी वाघोलीस हे पोटशूळाच्या व्यथेने मरण पावले.

जंजिऱ्याच्या सिद्दीखानाने ब्रह्मेंद्रस्वामी यांचा हत्ती धरून नेला, परशुराम क्षेत्र भ्रष्ट केले. त्यास शिक्षा व्हावी म्हणून शाहू महाराजांनी चिमाजी अप्पास सिद्दीवर स्वारी करण्यास फर्माविले. ही स्वारी १७३३ मे मध्ये सुरू होऊन त्याच वर्षीच्या डिसेंबरात संपली. या स्वारीने रामगड व त्या भोवतालच्या प्रदेशावर मराठ्यांची सत्ता स्थापन झाली. या स्वारीच्या सुरुवातीचे हे पत्र असून, या मोहिमेत प्रारंभीच्या सैन्याच्या हालचाली व महाडास धोका कसा नाही, हे या पत्रात सांगितले आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ८४–८९ पहावीत]

### (१२) **सटवोजी जाधव** (मृत्यू : ३१–१–१७४७)

पिलाजी जाधव यांचे पुत्र. चिमाजी व बाजीराव पेशवे यांचेबरोबर कर्नाटक, दिल्ली, बोडसे, वसई इत्यादी ठिकाणच्या लढाईत त्यानी प्रामुख्याने भाग घेतला होता. त्यांचा मृत्यू फाल्गुन शुद्ध २, शके १६६८ रोजी झाला.

प्रस्तुत पत्रात उत्तरेत भदावरकरांशी* तह, पंतप्रधानांच्या मर्जीनुरूप करून येतो, असे सांगितले आहे. मराठा सरदार कारभाऱ्यांकडून पत्र लिहून घेऊन शेवटी स्वहस्ते एखादाच शब्द लिहीत असत.

[पत्रासाठी पृष्ठे ९०–९७ पहावीत]

* बाजीरावाने बुंदेलखंडातील ओरछा, दांता व नरवर ह्या संस्थानिकांकडून १७३७ च्या जानेवारीत खंडण्या वसूल केल्या आणि फेब्रुवारी महात भदावरकरांकडे खंडणीची मागणी केली. भदावर राजाने खंडणीची मागणी नाकारून लढाईची जोराची तयारी केली. पण मराठ्यांच्या जोराच्या हल्ल्यापुढे भदावरकरांचा टिकाव न लागून त्याने १८ फेब्रुवारी १७३७ रोजी शरणागती पत्करली व मराठ्यांस खंडणी म्हणून २० लक्ष रुपये व दोन हत्ती देण्याचे कबूल केले (पे. द. १५, ले. १८, ४७). ह्या संदर्भात वरील पत्र आहे.



### (१३) **व्यंकटराव नारायण घोरपडे** (जन्म : १७०१; मृत्यू : १७४५)

इचलकरंजीच्या नारोपंतांचे हे पुत्र. याना बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची अनूबाई नावाची मुलगी दिलेली होती. हे शाहूच्या पक्षात होते. त्यानी गोव्यावर स्वारी करून पोर्तुगिजांना पराभूत केले (सन १७३९). यानी इचलकरंजीस तट बांधला. यांची मुलगी वेणूबाई त्रिंबकराव पेठ्यास दिली होती. साताऱ्यास यांच्या नावाचा व्यंकटपुरा प्रसिद्ध आहे. यांचा मृत्यू इ. स. १७४५ मध्ये झाला.

व्यंकटराव नारायण स्वारीवर असता त्यास उदाजी चव्हाण व चिकोडीकर हे एक होऊन इचलकरंजीकरांची ठाणी घेणार ही बातमी समजली. ती त्यानी पत्रात लिहून बाजीराव पंतप्रधान यास त्या दोघांचा बंदोबस्त करण्याविषयी विनंती केली आहे.

[पत्रासाठी पृष्ठे ९८–१०३ पहावीत]

### (१४) **चिमणाजी बल्लाळ ऊर्फ चिमाजी अप्पा** (जन्म : अंदाजे १७०८; मृत्यू : १७–१२–१७४०)

हे पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे द्वितीय पुत्र व पेशवे बाजीराव यांचे धाकटे बंधू. यांचा जन्म इ.स. १७०८ साली झाला. १७१८ साली यांस हुजूर मुतालिकीचा अधिकार मिळाला. इ. स. १७२० ते १७४० पर्यंत ते आपल्या पराक्रमी बंधूचा पाठपुरावा करताना दिसतात. १७२८ ते १७३२ या काळात त्यांनी मध्य हिंदुस्थानातील अनेक महत्त्वाच्या मोहिमा अंगावर घेऊन पार पाडल्या. १७३६ मध्ये जंजिऱ्याची सिद्दीखानावरील मोहीम, १७३७ त साष्टी काबीज, तदनंतर तारापूर, माहीम, वरसोवा, वांद्रे ही स्थळे काबीज करीत सन १७३९ त मे च्या ४ तारखेस वसई काबीज करून त्यांनी आपली कोकणची मोहीम संपविली. पुढील वर्षी बाजीराव साहेबांच्या मृत्यूनंतर ते व पुतण्या नानासाहेब पेशवे हे दोघे उत्तरेस निघाले. पहिल्या मुक्कामात चिमाजी अप्पांची प्रकृती नादुरुस्त झाल्यामुळे त्यास परतावे लागले, ते १७ डिसेंबर १७४० रोजी पुण्यास मृत्यू पावले.

चिमाजी अप्पा हे खऱ्या अर्थाने बाजीराव पेशवे यांचे पाठीराखे भाऊ होते. बाजीरावाच्या चढाऊ धोरणाचा त्यांनी पाठपुरावाच केला. बाजीराव पेशव्यांचे लक्ष घरी नसे. अशा वेळी घरची अनेक कार्ये, पुतण्याची मुंज, जवळच्या नातलगांची लग्ने, आई राधाबाईची काशीयात्रा, अशी अनेक घरगुती कामे त्यांस उरकावी लागत. घरचे सर्वजण चिमाजी अप्पांकडेच कर्ता म्हणून पहात असत. बाजीराव पेशव्यांचे चिरंजीव नानासाहेब हे तर चिमाजीजवळच असत. चुलत्या-पुतण्यांचे सूत जमे. चिमाजी अप्पांनी लिहिलेल्या पत्रातून त्यांची नम्रता, प्रांजलपणा दिसून येतो. चिमाजी अप्पा हे नम्र, चारित्र्यवान, कुटुंबवत्सल व पराक्रमी असे आदर्श धाकटे बंधू होऊन गेले.

हे संपूर्ण पत्र चिमाजी अप्पांच्या हस्ताक्षरांत आहे. यात लेखकाने तोफा-बंदुकांस लागणाऱ्या दारूचा वसईस कारखाना सुरू करावा व हजार रुपयांची दारू खरेदी करावी असे नानासाहेबांस लिहिले आहे.

पोर्तुगीज, इंग्रज आदी परदेशीय सत्तांशी मराठ्यांचा संघर्ष पश्चिम किनाऱ्यावरील स्थळे जिंकताना झाला. त्यात या परदेशी लोकांनी बंदुका, तोफखाना यांचा सर्रास उपयोग केला. तसाच उपयोग आपणही करावा हे मराठी सरदारांस पटून उत्तरोत्तर त्यांनी लढायांकरिता चांगली दारू खरेदिण्याचे धोरण आखले. या पत्रावरून मोठ्या प्रमाणात दारूगोळा खरेदी करण्याची सुरुवात बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली असे दिसते.

[पत्रासाठी पृष्ठे १०४–१११ पहावीत]



L. 2602—3a

Maharashtra State Archives

(१५) **यशवंतराव पवार** (मृत्यू : १४-१-१७६१)

धारचे आनंदराव पवार यांचे हे पुत्र. माळव्याबाहेरील मराठी राज्याचा विस्तार करणाऱ्यांपैकी हे एक होत. सन १७३४-३५ च्या माळव्याच्या मोहिमेत हे होते. सन १७३६ मध्ये चिमाजी अप्पांबरोबर हे कोकणात गेले. त्याच साली बाप वारल्यामुळे ऑगस्टमध्ये त्यांना सरदारीची वस्त्रे मिळाली. नोव्हेंबर १७३६ ची झील तलावावरील लढाई, १७३९ ची वसईची मोहीम, डिसेंबर १७३७ ची भोपाळची लढाई यामध्ये यांनी चांगलाच पराक्रम गाजविला. पेशव्यांच्या इ. स. १७४४-४६ च्या बुंदेलखंडावरील स्वारीत हे होते. सदाशिवराव भाऊसाहेबांची व यांची बोलाचाली होऊन यांनी त्यांच्या डेऱ्यावर तोफा डागल्या. म्हणून यांच्या सरंजामाची जप्ती झाली (सन १७४७) व ती सन १७५१ मध्ये मोकळी झाली. श्रीरंगपट्टण (सन १७५७), शिदखेड, उदगीर (सन १७६०) वगैरे लढायांत यांनी बराच पराक्रम गाजविला. यांच्या वंशात राजा हे पद प्रथम यानाच मिळाले. पानिपतच्या (१७६१) लढाईत हे ठार झाले. यांनी २७ वर्षे कारभार केला.

मराठ्यांची सत्ता नर्मदेच्या पलीकडे उत्तर हिंदुस्थानात फैलावण्यास ज्या मराठी सरदारांनी पुढाकार घेतला त्या शिंदे-होळकर-पवार यांपैकी प्रस्तुत पवार हे एक होत. हे सरदार बाजीराव पेशव्यांनी निर्माण केले. तेव्हापासून ते पेशव्यांच्या सेवेत राहून आपल्यावर पडलेली कामगिरी बजावीत असत. पेशव्यांची मर्जी राखून पेशव्यांनी सांगितलेले काम ते किती तत्परतेने पार पाडीत असत हे या पत्रावरून दिसते. महादेवभट हिंगणे यांनी हस्तिनापुराहून परवाने आणल्याबाबत यशवंतराव पवार हे प्रस्तुत पत्रात नानासाहेब पेशव्यांस कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे ११२-११५ पहावीत]

(१६) **राधाबाई** (मृत्यू : १९-४-१७५३)

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांची ही पत्नी व अंताजी मल्हार बर्वे दुबेरकर यांची कन्या. राधाबाईसाहेबांना राजकारणाचे चांगले ज्ञान होते व वेळोवेळी त्यांचे पुत्र पेशवे बाजीराव व चिमाजी अप्पा त्यांचा सल्ला घेत असत. १७३५-३६ त त्या काशीयात्रा करून आल्या. त्या धामधुमीच्या काळातही अल्पशा लवाजम्यानिशी त्या उत्तरेत जाऊन आल्या. उत्तरेतील सत्ताधीश राधाबाईंचा मान राखण्यासाठी आपापल्यापरी झटले हे पेशव्यांच्या प्रतिष्ठेचे एक प्रत्यंतरच होते. पेशवे फिरतीवर असताना पुण्यातील व्यवहार ही बाई मोठ्या दक्षतेने चालवी. अनेक कौटुंबिक, सामाजिक बाबतीत त्या लोकहिताच्या दृष्टीने वागत. गोविंद हरि पटवर्धनांच्या घरातील एक बटीक महारीण निघाल्यामुळे त्यांच्यावर पुण्यातील ब्रह्मवृंदाकडून वाळीत पडण्याचा प्रसंग आला. त्यावेळी त्यांनी मध्यस्थी करून पटवर्धनांकडून प्रायश्चित्त घेवविले. शहरातील वसाहत, बंदोबस्त, सण, समारंभ, उत्सव, दानधर्म, आहेर, बाळंतविडे, मंदिरांची बांधकामे यांत राधाबाईंचे पुढारीपण असे.

बाबूजी नाईक बारामतीकर व त्यांचा भाऊ आबाजी नाईक यांनी आपणास छत्रपतींनी कर्नाटक सुभा लावून द्यावा म्हणून साताऱ्यास उपोषण सुरू केले. आबाजी नाईक बारामतीकर यास पत्रलेखिका राधाबाई यांची कन्या भिऊबाई ही दिलेली होती. हे उपोषण सुरू असताना भिऊबाईने साताऱ्यास येऊ नये आणि पेशवे हे आपले पुत्र व नाईक आमात यांचे भांडण विकोपास न जाऊ देता जेणेकरून नाईक बंधूंचे जीव वाचतील ती कारवाई करावी, असे राधाबाई प्रस्तुत पत्रात म्हणतात.

[पत्रासाठी पृष्ठे ११६-११९ पहावीत]



(१७) **नारायण दीक्षित पाटणकर** (जन्म : १६५० पूर्वी; मृत्यू : १४-१०-१७४८)

कायगाव टोके येथील हे जहागीरदार व दीक्षित या घराण्याचे मूळ पुरुष. मूळचे हे कोकणातील खेड रहाटागर येथील. यांनी पैठण येथे तपश्चर्या केली व तेथे त्यांना साक्षात्कार होऊन ब्रह्मज्ञान झाले. यांची व बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मैत्री होती. यांची व औरंगजेबाची भेट झाली होती. शाहू छत्रपती व पेशवे बाजीराव यांना गुरुस्थानी मानीत असत. दक्षिणेतील राजकारणात यांचे अंग असे. वृद्धापकाळी त्यांनी काशीस वास्तव्य करून तेथे अन्नछत्रे घातली आणि सदाशिव नाईक वारल्यानंतर काशीकडील राजकारण पुढे चालविले. ते भगवद्भक्त, स्वधर्मनिष्ठ, परोपकारी, राजकारणी होते असे कागदपत्रावरून दिसून येते. काशी येथे कार्तिक शुद्ध १४ शके १६७० म्हणजे १४ ऑक्टोबर १७४८ रोजी यांचा अंत झाला. मृत्युसमयी त्यांचे वय १०० वर होते. यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. तीसुद्धा मोठी पतिव्रता व साध्वी होती. यांचे दोन मुलगे वासुदेव दीक्षित व बाळकृष्ण दीक्षित हे पण आपल्या वडिलांप्रमाणे स्वधर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न व राजकारणात भाग घेणारे होते.

पेशव्यांशी यांचा वारंवार पत्रव्यवहार होता. प्रस्तुत पत्र पेशव्यांस पाठविलेले असून त्यात पंतप्रधानांनी स्वारीस गेल्यावेळी यश संपादून सुखरूप यावे म्हणून श्रीस प्रार्थना करितो असे पत्रलेखक लिहितात.

[पत्रासाठी पृष्ठे १२०-१२३ पहावीत]



Maharashtra State Archives

### (१८) **जिजाबाई** (मृत्यु : १७-२-१७७३)

कोल्हापूरकर थोरले संभाजी छत्रपती यांची ही राणी, तोरगळकर शिंदे यांची कन्या व ताराबाईसाहेबांची सून. ही हुशार व राजकारणी होती. संभाजी छत्रपती तिच्याच सल्ल्याने वागे. ही स्वभावाने क्रूर, कडक शिक्षा करणारी, धोरणी व संशयी; पण प्रसंगी तडजोड करून कार्य साधणारी अशी होती. कोल्हापूरचे राज्य स्थापण्यात तिचा मोठा वाटा होता.

छत्रपती संभाजी निपुत्रिक वारल्यावर तिने माधवराव पेशव्यांकडून दत्तकाची परवानगी घेऊन शहाजी राजे खानवटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेऊन त्यास शिवाजी असे नाव ठेविले (२७ सप्टेंबर १७६२) व कारभार आपल्या हाती घेतला.

मनोळी व चिकोडी या दोन तालुक्यांत पुंडांचा उपद्रव होता. १७६४ त माधवराव पेशव्यांनी या दोन्ही तालुक्यांचा अंमल सुरळीत करून दिला. पण त्यासाठी फौजेच्या खर्चासाठी लागलेली सात लक्षांची रक्कम जिजाबाईसाहेबांजवळ नसल्यामुळे पुण्याचे सावकाराचे कर्ज काढून व त्यास दोन तालुके पेशव्यांचे आमिनगिरीने लावून देऊन, तिने रकमेची भरती केली. पुढे पैशांची फेड वेळेवर झाली नाही, सावकारांचा तगादा आला, तेव्हा पेशव्यांनी तालुक्यांची उपज वसूल करून सावकारांची फेड करण्याचे काम पटवर्धनांस सांगितले. त्यामुळे पटवर्धनांचा व जिजाबाईचा कलह लागला. सन १७७० च्या अखेरीस कर्नाटकात जात असता माधवराव पेशवे पुन्हा कोल्हापुरात गेले व त्यांनी जिजाबाईसाहेबांशी तह करून प्रकरण मिटविले. जिजाबाईचा सावंतवाडीकर, इचलकरंजीकर, कागलकर वगैरेंशीही वारंवार तंटा होत असे, आणि प्रांतात वरीच धामधूम चालू असे. सावंतवाडीकरांचे कारभारी जिवाजी विश्राम व विठ्ठल विश्राम हे रांगण्याकडे जिजाबाईस त्रास देत होते. माधवराव पेशव्यांनी त्यांचा बंदोबस्त करून जिजाबाईचा जम बसवून दिला (१७६७).

करवीरपीठाच्या शंकराचार्यांशीही तिचा झगडा झाला. स्वामींच्या मठाशेजारी तिने संभाजी महाराजांचे दहन जबरदस्तीने करून त्या जागेवर मंदिर बांधले व त्या मठातील ब्राह्मण-भोजनाची जागा मंदिरात घेतली होती. तिच्याच कारकिर्दीत इंग्रजांनी मालवणचा किल्ला घेऊन मराठ्यांच्या राजकारणात चांगला शिरकाव केला (१७६५). जिजाबाईने साडेसात लक्षांचा दंड भरून किल्ला सोडवून घेतला. इंग्रजांनी १२ मार्च १७६६ रोजी तिच्याशी स्वतंत्र तह करून तिचे हातपाय जखडून ठेवले, आणि मालवणास वखार घालण्याची परवानगी मिळविली. ही १७ फेब्रुवारी १७७३ रोजी मृत्यू पावली.

प्रस्तुत पत्र सदाशिवराव भाऊस असून, त्यात जिजाबाईने पेशवे व आपले यजमान यांनी काय बोलणी केली त्यांचे स्मरण करून देऊन स्वराज्योपयोगी मनसुबा पंतप्रधानांच्याकडून व्हावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १२४–१२५ पहावीत]



### (१९) **मुरारराव घोरपडे** (जन्म : १७०८; मृत्यु : १७७७)

प्रसिद्ध सेनापती संताजी घोरपडे यांचे हे पुतणे, शिदोजीराव घोरपडे यांचे हे पुत्र. त्यास शाहू महाराजांनी सरदेशमुखीचे वतन व सरंजाम दिला (२ फेब्रुवारी १७२१). तसेच त्यास पुढील वर्षी हिंदुराव्याचा किताबही बहाल केला. मराठ्यांची कर्नाटकातील सत्ता टिकविण्यास मुराररावांचा पराक्रम कारणीभूत झाला होता. हे गुत्ती व सोंडूर संस्थानचे संस्थापक होय. यांनी सन १७४१ च्या त्रिचनापल्लीस झालेल्या चंदासाहेबाबरोबरच्या लढाईत मोठा जय मिळविला. म्हणून शाहू महाराजांनी त्यास कर्नाटकाच्या सरदेशमुखीचे वतन व त्रिचनापल्ली किल्ल्याची सुभेदारी दिली. पेशव्यांनी त्यास सेनापती हा किताब दिला होता. यांनी कर्नाटकातील गुत्ती येथे आपली राजधानी केली. म्हणून त्यास गुत्तीकर घोरपडे असे नाव पडले. यांनी कर्नाटकात तीस वर्षे स्वतंत्र बाण्याने वागून हैदर, इंग्रज, फ्रेंच आणि अर्काट, सावनूर, करनूल, कडाप्पा येथील नबाब यांना सतत चळचळ कापवून आपले संस्थान वाढविले. नेहमी दहा हजार घोडस्वारांचे खडे सैन्य त्यांचेपाशी असे. कर्नाटकातील मराठी सत्तेचे संरक्षण मुख्यत्वेकरून यांनी केले. हे अत्यंत शूर, राजकार्य धुरंधर होते. हैदराने विश्वासघाताने यास कैद करून चांदीची बेडी घालून कपालदुर्ग किल्ल्यात बंदीत ठेविले. तेथेच त्यांचा अंत झाला (१७७७).

प्रस्तुत पत्रावरून मुरारराव घोरपडे पेशव्यांशी स्वतंत्र बाण्याने कदाचित फटकून वागत असावे असे दिसते. सदाशिवराव भाऊंनी निजामाशी मराठ्यांचे सरळ नसता मुरारराव घोरपडे त्यांशी सूत जमवितो असा आरोप केल्यावर मुरारराव घोरपडे आपले अनुसंधान मोगलांकडे नसून पंतप्रधान पेशव्यांवर आपला सर्व विश्वास आहे, बंधुभावानेच पेशव्यांशी आपण वागणार, अशी ग्वाही या पत्रात देतात.

[पत्रासाठी पृष्ठे १३०–१३१ पहावीत]



Maharashtra State Archives

(२०) **उदाजी चव्हाण** (जन्म : सुमारे इ. स. १६८०–८१; मृत्यु : २४–११–१७६२)

उदाजीराव चव्हाण, ममलकतमदार, हिमतबहादूर हे विठोजीराव चव्हाणांचे पुत्र. विठोजीराव चव्हाण इ. स. १६९७ च्या बेंगरूळच्या लढाईत ठार झाल्यावर राजाराम महाराजांनी उदाजीराव चव्हाणांचा पराक्रम पाहून त्यास "हिमतबहादूर" हा बापाचा किताब बहाल केला. ताराबाई व शाहू ह्यांचे भांडणात ह्यानी प्रथम ताराबाईची बाजू घेतली. ताराबाईने त्यास तीन लाखांचा मुलूख सरंजामास देऊन शाहू महाराजांवर स्वारी करण्यास; पाठविले. पुढे ह्यानी इ. स. १७२८ च्या प्रारंभी शाहू महाराजांचा आश्रय पत्करला. पण महाराजांशी एकनिष्ठ रहाणे त्यास जमले नाही. धरसोड वृत्ती आणि स्वतंत्र खावया यामुळे त्यानी १७३३ नंतर करवीरकर संभाजीच्या बाजूस जाऊन शाहूच्या मुलखात त्रास देण्यास सुरवात केली. तो त्रास एवढा जाचक झाला की, शाहू महाराजांनी १७३९ मध्ये उदाजी चव्हाणांवर मोहीम केली. मोहिमेत त्यांची ठाणी सर करून त्यांस वठणीवर आणिले. तदनंतर हे निजामाकडे गेलेले आढळतात. नानासाहेब पेशव्यांनी त्यास वतनाचे आमिष दाखवून आपल्याकडे आणण्याचा प्रयत्न केला. इ. स. १७५३ च्या जानेवारीत उदाजी चव्हाण यानी शिवाजी सोळोखी ह्या करवीर सरदारांच्या सरंजामी मुलुखात उपद्रव दिला. इ. स. १७६० च्या जानेवारीत कोल्हापूरच्या जिजाबाई राणीसाहेब यांनी उदाजी चव्हाण हिमतबहादूर यास करवीरचे पक्षात मिळविण्याची खटपट केली. 'राजाराम छत्रपती स्वामी चरणी तत्पर उदाजी चव्हाण हिमतबहादूर ममलकतमदार निरंतर' असा त्यांचा शिक्का होता. ते इ. स. १७६२ मध्ये निवर्तले.

प्रस्तुत पत्र ताराबाई आईसाहेबांस लिहिलेले दिसते. सांकेतिक आज्ञेप्रमाणे कार्य करतो असे आश्वासन उदाजीराव चव्हाणांनी पत्रात दिले आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १४०–१४३ पहावीत]

(२१) **त्रिंबकराव (मामा) पेठे** (मृत्यु : ११–४–१७७४)

विसाजी कृष्ण पेठे यांचे हे पुत्र. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे जावई व्यंकटराव घोरपडे यांची मुलगी वेणूताई यांना दिली होती. शाहू छत्रपतीच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या कारभारात हे मुख्य होते. हे माधवराव पेशव्यांच्या बाजूचे होते. पेशव्यांच्या कर्नाटकच्या स्वारीत यांनी खूप पराक्रम केला. पंढरपूरजवळ माधवराव व दादासाहेब यांच्या युद्धात (२६ मार्च १७७४) हे जखमी झाले व त्यातच ११ एप्रिल १७७४ रोजी मरण पावले. यांची बहीण रखमाबाई विसाजी अप्पास दिली होती.

या पत्रात पेशवे नानासाहेब व दमाजी गायकवाड यांची सातार्‍यास गेंडपाच्या माळावर जी लढाई झाली व त्यात दमाजीसह गायकवाड व दाभाडे मंडळीस पकडून नानांनी कैदेत ठेविले, त्याबद्दलची हकिगत आहे. संपूर्ण पत्र त्रिंबकराव पेठे यांच्या हातचे आहे. या लढाईनंतर दाभाडे-पेशवे करार होऊन गुजराथ-काठेवाड सर्व मुलूख पेशवे व गायकवाड यानी निम्मा निम्मा वाटून घ्यावा असे ठरविण्यात आले. दमाजीची सुटका झाल्यानंतर वाटणीचा करार करण्यात आला. या कराराचा गुजराथचे इतिहासाशी फार संबंध आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १४४–१४९ पहावीत]



(२२) **विश्वासराव** (जन्म : २२–७–१७४२ ; मृत्यु : १४–१–१७६१)

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे व गोपिकाबाई यांचे हे पुत्र. १७४९ च्या मार्चमध्ये त्यांची मुंज झाली. मे १७५० मध्ये त्यांचा दीक्षित पटवर्धन घराण्यातील लक्ष्मीबाईशी विवाह झाला. त्यांना युद्धनीतीचा अनुभव मिळावा म्हणून सिदखेडच्या मोहिमेची (ऑगस्ट १७५७ ते २ जानेवारी १७५८) जबाबदारी त्यांचेवर सोपविली होती. जनकोजी हा विश्वासरावाचा समवयस्क व मित्र याच मोहिमेत त्यांचे बरोबरीने होता. सिदखेडच्या लढाईत मराठ्यांचा जय झाला. उदगीरच्या मोहिमेत (१७६०) हे भाऊसाहेबांबरोबर हजर होते. 'यानी तिरंदाजी बहुत उत्तम प्रकारे केली', 'दोन महिने सडे स्वारीने रात्रंदिवस घोड्यावर जीन ठेवून, सभोवत्या फौजा ठेवून विश्वासराव दावघाव पहात होते', अशी वर्णने आहेत.

उत्तरेतील अबदालीवरील मोहिमेतही भाऊसाहेबांच्या बरोबरीने हे गेले होते. पानिपतच्या रणसंग्रामात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला. १४ जानेवारी १७६१ रोजी हे व भाऊसाहेब आपल्या सैन्याच्या मध्यभागी प्रथम हत्तीवर बसून लढत होते. दुपारी विश्वासराव हत्तीवरून उतरून 'दीलपाक' घोड्यावरून लोकांस उत्तेजन देत पुढे पुढे घुसत असता त्यांच्या छातीत झांबरकाची गोळी अकस्मात लागून ते तत्काळ गतप्राण झाले. त्याबरोबर भाऊसाहेबांचेही देहभान सुटले. त्यांनी विश्वासरावाचा मुडदा उचलून हत्तीचे अंबारीमध्ये घातला व स्वतः ईर्षेने शत्रुसैन्यात घुसले. पुढे गणेश वेदांती, काशीराज वगैरेंनी त्यांचे शव मिळवून त्यांचा अंत्यसंस्कार केला. हे सर्व पेशव्यांत 'देखणे' होते असे बखरकारांनी म्हटले आहे.

प्रस्तुत पत्रात विश्वासराव जनकोजीराव निंबाळकराची बेलपांढरी (नजीक नेवासे) येथे भेट घेण्याचे योजितात. 'विनंती' ही अक्षरे विश्वासरावांचे हातची आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १५०–१५३ पहावीत]

L 2602—4



Maharashtra State Archives

## (२३) जगजीवन परशुराम प्रतिनिधी (मृत्यू : २०-८-१७५४)

जगजीवनराम परशुराम हे परशुराम त्रिंबकचे सर्वांत धाकटे पुत्र. श्रीपतराव प्रतिनिधींचा मृत्यू २५ नोव्हेंबर १७४६ रोजी झाल्यावर शाहू महाराजांनी त्यांचे धाकटे बंधू जगजीवनराम यांची प्रतिनिधीपदावर नेमणूक केली. यावेळी जगजीवनराम हे रत्नागिरी जिल्ह्यात ७५,००० रुपयांचा अंमल होता, त्याची व्यवस्था पहात श्रीपतगडावर होते. त्यास प्रतिनिधीपदाची वस्त्रे देऊन त्यांच्या नावचा शिक्काही तयार झाला. ते आपला कारभार मुतालिक यमाजी शिवदेव याच्या तंत्राने करीत. शाहू महाराजांनी त्यास प्रतिनिधी पदासंबंधाने हुजूर खर्चाचे नेमणुकीचा सरंजाम करून दिला. शाहूचे पश्चात बाळाजी बाजीराव पेशव्यास मराठी राज्य चालविण्याचा अधिकार प्राप्त झाल्यावर त्यांनी प्रतिनिधी व मुतालिक यांना कैद करून त्यांची रवानगी पुरंधर किल्ल्यावर केली. कारण हे लोक ताराबाईचे पक्षपाती व पेशव्यांच्या विरोधी गटात होते. सांगोल्यास सदाशिवरावभाऊंनी जी राज्यकारभाराची व्यवस्था केली, त्यात प्रतिनिधींच्या जहागिरीपैकी काही मुलूख चिटणिसांना देऊन ती आटोपशीर केली. जगजीवनराम प्रतिनिधीकडून जहागिरीपैकी सांगोल्यास जे घेण्यात आले त्याबद्दल त्यांस पूर्वीचे प्रतिनिधीपद देण्यात आले. १७५२ च्या प्रारंभापासून जगजीवनराम मुख्य प्रतिनिधी व भवानराम दुय्यम प्रतिनिधी असे झाले आणि त्याप्रमाणे छत्रपती रामराजे यांनी शिक्का दिला. रामराजास कैद करण्याच्या ताराबाईच्या कारस्थानात प्रतिनिधी होते.

बापूजी नाईकास प्रतिनिधीपद ताराबाईने देऊ केल्यामुळे ताराबाईच्या पक्षातून जगजीवन परशुराम फुटले. बापूजी नाईकाने ताराबाईच्या हुकुमावरून प्रतिनिधींच्या तालुक्यावर हल्ला केल्यामुळे जगजीवनराम त्यावर चालून गेले. दोघांची लढाई होऊन, नाईकाने त्या लढाईतून पळ काढला. पेशव्यांची सावनूरच्या नबाबावर जी स्वारी झाली, त्यात जगजीवनराम प्रतिनिधी होते. पण मराठ्यांच्या अवसानघातकीपणामुळे जगजीवनरामचा सावनूरच्या नबाबाकडून पराभव झाला. १७५२–५३ मध्ये त्यास करवीरकरांवर फौज घेऊन पाठविले. या स्वारीत करवीरकरांच्या फौजेस प्रतिनिधीकडून चांगली तंबी मिळाली. पुढच्या वर्षी तुळाजी आंग्रेवर विजयदुर्गास पाठविले असता जगजीवनरामांनी आंग्रे यास चांगले जेर करून तह करण्यास लाविले. सातार्‍यास ही बातमी कळल्यावर त्यांचा छत्रपतींनी गौरव केला. जगजीवनरामांनी पुढे कोल्हापूर छत्रपतींचे मुलखात धुमाकूळ मांडिला. जगजीवनराम प्रतिनिधी १७५४ मध्ये वारले. त्यांना राज्यकारभाराचा अनुभव कमी होता. आयुष्यभर त्यांचे पेशव्यांशी धुसफूस चालू होते. ते पराक्रमी होते.

प्रस्तुत पत्र जगजीवनराव परशुरामांनी पेशवे बाळाजीराव यास लिहिले असून, त्यात बापूजी नाईकाच्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्यासाठी यमाजीची फौजेसह रवानगी झाल्याचा उल्लेख आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १५४–१५९ पहावीत]



## (२४) यमाजी शिवदेव मुतालिक (मृत्यू : १७६४ नंतर)

हे सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात वामणोली गावचे राहाणारे. राजाराम छत्रपतींच्या कारकिर्दीत परशुराम त्रिंबक प्रतिनिधींचे हाताखाली ते कारकुनी करीत होते. १७४२–४३ च्या सुमारास त्यास प्रतिनिधींची मुतालिकी मिळाली. ते मुत्सद्दी असून शिपाई होते. ते पेशव्यांच्या विरोधकांपैकी होते. प्रतिनिधीकडून सांगोले व मंगळवेढे ही ठाणी पेशव्यांच्या कबजात देण्यासाठी त्यांची रवानगी झाली तेव्हा त्यांनी पेशव्यांस कळविले की, प्रतिनिधी छत्रपतींचे सेवक, त्यांच्या आज्ञेने प्रदेशाची देवघेव करता येईल, पेशव्यांचा हुकूम आपण मानणार नाही. सांगोले येथे त्यांनी संग्रामाची तयारी केली. तेव्हा छत्रपतींच्या आज्ञेनेच त्यांना तोंड दिले पाहिजे हे जाणून पेशव्यांनी सदाशिवराव व रामराजा यास फौज देऊन सांगोल्यावर रवाना केले. बरोबर मुख्य सल्लागार म्हणून रामचंद्रबाबा व इतर मुत्सद्दी मंडळी पाठविली. दोन आठवडे संग्राम होऊन यमाजी शिवदेव शरण आले. सांगोले, मंगळवेढे ही ठाणी पेशव्यांकडे आली व पेशव्यांचे वर्चस्व सिद्ध झाले. पुढे रामराजाला ताराबाईने पकडून सातार्‍यात अटकेत ठेवले. यमाजी व त्यांचे पुत्र गमाजी हे बाहेर राहून ताराबाईस साह्य करू लागले. त्यावरून पेशव्यांनी यमाजीस पकडून इगतपुरीजवळ कावनई किल्ल्यावर त्यास अटकेत ठेवले (१७५१). पुढे पेशव्यांनी दादोबा प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांस वश करून आपल्याला अनुकूल करून घेतले. त्यांच्या अखेरच्या वर्षातल्या उद्योगांची स्पष्टता होत नाही. १७६० च्या अखेरीस नानासाहेब पेशव्यांबरोबर ते उत्तरेत स्वारीत गेल्याचा उल्लेख आहे. पानिपतच्या वाताहतीनंतर त्यांनी आपले व्याही विठ्ठल सुंदर यांच्या द्वारा निजामाकडून पेशव्यांवर चढाई केली. त्यात ते व त्यांचे पुत्र गमाजी होते असे समजते (१७६४).

तुळाजी आंगरे यांनी विसाळगडास वेढा देण्याचे योजिले तेव्हा तो चव्हाण घोरपडे यांच्या मदतीने उठविण्यास यमाजी शिवदेव यास आज्ञा झाली असता, आज्ञेप्रमाणे फौजफाटा घेऊन पारिपत्यास जात आहे, असे यमाजी शिवदेव कळवितात. संपूर्ण पत्र यमाजी शिवदेवांच्या हातचे आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १६०–१६५ पहावीत]

(२५) **ताराबाई** (जन्म : १६७५; मृत्यु : १०-१२-१७६१)

शिवछत्रपतींचे पुत्र राजाराम महाराज यांची ही पत्नी व हंबीरराव मोहिते सेनापती यांची कन्या. त्यांचे सासरचे नाव सीताबाई व माहेरचे नाव ताराबाई होते.

राजाराम महाराजानंतर ताराबाईसाहेबांनी आपला मुलगा शिवाजी ह्याला रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, धनाजी जाधव सेनापती यांच्या सहाय्याने गादीवर बसविले व राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली. सवत राजसबाईस व तिच्या मुलाला त्यांनी कैदेत टाकले.

त्यांनी परशुराम त्रिंबकरावास प्रतिनिधीपद व सर्व किल्ल्यांचा बंदोबस्त सांगितला आणि सर्व सरदारांस मोंगलांच्या मुलुखात शिरून चौथाई व सरदेशमुखीच्या नावाखाली पैसा गोळा करण्यास पाठविले (१७००).

शाहू महाराजांची सुटका १७०७ त होऊन ते महाराष्ट्रात आले तेव्हा ताराबाई हातची सत्ता सोडण्यास तयार नव्हती. तिने धनाजी व परशुराम त्रिंबक यांची शाहू महाराजांवर रवानगी केली पण धनाजी शाहू महाराजांस मिळाला. परशुराम त्रिंबकचा कडूस येथे पराभव झाला. तो साताऱ्यास गेला व शाहू महाराजांचा सातारा येथे राज्याभिषेक (१७०८) झाला. तेव्हा ताराबाईसाहेब पन्हाळ्यास पळून गेल्या.

पुढे पन्हाळा, विशाळगड हे किल्लेही शाहू महाराजांच्या स्वाधीन (१७०८-०९) आले असता ताराबाई मालवणास गेली व त्यांचा पक्ष दुबळा पडला.

१७१० त पन्हाळ्याच्या किल्लेदाराने तो किल्ला ताराबाईच्या स्वाधीन केला. पन्हाळा व कोल्हापूर येथे ताराबाईचा अंमल झाला. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर थोरात, निंबाळकर, घाटगे, आंग्रे, चव्हाण इत्यादी मंडळी ताराबाईच्या पक्षात गेली. सातारा ते कोल्हापूर ह्या भागात त्यांनी धुमाकूळ मांडला.

बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी सैन्य जमवून ताराबाईसाहेबांना तोंड दिले. परशुरामपंतास कैदेतून सोडवून प्रतिनिधीपद दिले. अनेक नवीन सरदार त्यांनी निर्माण केले. ताराबाईच्या पक्षात फितुरी करवून शाहू महाराजांचा पक्ष बळकट बनविला. ताराबाईचा मुलगा शिवाजी याचा मृत्यू (जानेवारी १७१२) झाल्यावर राजसबाईचा मुलगा संभाजी गादीवर आला. राजसबाईने ताराबाई व तिची सून यांना अटकेत ठेवले.

श्रीपतराव प्रतिनिधीने वारणातिरी संभाजीचा पराभव (१७३०) केल्यावर त्याची बायका-माणसे कैद केली, त्यात ताराबाई होती. साताऱ्याच्या किल्ल्यात तिला नजरकैदेत ठेविले. तिने आपला नातू व शिवाजीचा मुलगा रामराजा यास शाहू महाराजांस दत्तक घ्यावयास लावले. छत्रपती शाहूनंतर सातारा येथील सूत्रे आपल्या हातात घ्यायचा प्रयत्न तिने केला. पण पेशव्यां-मुळे तिला ते जमले नाही. दमाजी गायकवाडाच्या सहाय्याने सातारा किल्ला व रामराजा यांस तिने ताब्यात घेतले (१७५१). तिच्याशी तडजोड करण्याचे पेशव्यांचे प्रयत्न व्यर्थ झाले.



१७५५ त ती जानोजी भोसल्याच्या मध्यस्थीने पुण्यास पेशव्यास भेटली, पण रामराजास तिने मुक्त केले नाही. तिच्या मृत्यूपर्यंत रामराजा तिच्या बंदिवासातच होता. १० डिसेंबर १७६१ त ती वारली. नानासाहेब पेशवे व सदाशिवभाऊ यांचा मरेपर्यंत तिने द्वेष केला.

ती महत्त्वाकांक्षी, रागीट, हट्टी, मत्सरी पण दीर्घोद्योगी होती. तिने मराठी साम्राज्यात दुहीचे बीज पेरले.

या पत्रात दत्ताजी गायकवाड यांचे खुनी गुरवद्वय विचित्रगड येथे लपून राहिले असता त्यांचा शोध करून पाठविण्याबद्दल ताराबाईसाहेब सचिवास आज्ञा देत आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १६६-१६९ पहावीत]

(२६) **बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे** (जन्म : ८-१२-१७२१; मृत्यु : २३-६-१७६१)

यांचा जन्म ८ डिसेंबर १७२१ रोजी झाला. बाजीराव पेशवे यांचे हे वडील पुत्र. बाजीराव पेशवे स्वारीवर असता हे व चिमाजी अप्पा साताऱ्यास राहून महाराजांची मर्जी संभाळण्याचे काम करीत असत. पेशवे बाजीराव निधन पावल्यावर शाहू महाराजांनी बाळाजी बाजीराव यास पेशवाईची वस्त्रे दिली (१७४१). यांच्या कारकिर्दीत कर्नाटकात तसेच उत्तरेत सर्वत्र मराठी सत्ता फैलावली. इ. स. १७४९ मध्ये छत्रपती शाहू महाराज निवर्तले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे पेशवाई भट घराण्यात वंशपरंपरेने सुरू झाली. नादान रामराजाकडून सांगोले येथे सर्व सत्ता पेशव्यांकडे राहावी असे त्यांनी लिहून घेतले. छत्रपतींची सत्ता या कराराने नामधारी झाली. १७५८-५९ मध्ये मराठ्यांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर फैलावली. मुसलमानांस हे सहन न होऊन त्यांनी अहमदशहा अब्दालीस हिंदुस्थानात बोलाविले. यामुळे पानिपतची प्रसिद्ध लढाई होऊन त्यात मराठ्यांचा पराभव झाला. पानिपतावर चुलतभाऊ भाऊसाहेब व पुत्र विश्वासराव आदी हजारो सरदार, सैनिक मारले गेले व महाराष्ट्राची एक पिढी कापली गेली. याचे दुःख होऊन ह्या पेशव्याने 'भाऊ, भाऊ' करून २३ जून १७६१ रोजी प्राण सोडला.

बाळाजी बाजीराव प्रस्तुत पत्रात नाना फडणिसास लिहितात की, त्याने गोविंद बल्लाळ, नारोशंकर आदी मामलेदारांकडून रसद जमा करून स्वारीसाठी फौजेस पगाराची रक्कम पोचती करावी. बाळाजी बाजीराव स्वतः खंदे लेखक होते. त्यांनी स्वहस्ते लिहिलेली शेकडो पत्रे उपलब्ध आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १७०-१७५ पहावीत]



Maharashtra State Archives

**(२७) गोविंदपंत बुंदेले** (मृत्यु: २०-१२-१७६०)

यांचे मूळ नाव गोविंद बल्लाळ खेर. हे जातीने कऱ्हाडा ब्राह्मण. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील नेवरे हे होय. तेथील ते कुळकर्णी होते. भाऊबंदकीच्या त्रासामुळे ते देशावर आले व बाजीरावापाशी राहिले. अंगच्या हुशारीने ते मोठेपणास चढले.

बाजीराव पेशव्यांबरोबर छत्रसालच्या मदतीस जाणाऱ्या लष्करात ते होते. पेशव्यांनी छत्रसालाकडून मिळालेले झांसी, गुलसराई, काल्पी, सागर हे प्रांत त्यांच्या स्वाधीन करून त्यांना ते प्रांत सांभाळण्यास सांगितले (१७३३).

फरूखाबादेच्या लढाईत त्यांनी रोहिल्यांचा साफ पराभव केला व पेशव्यांची शाबासकी मिळविली (१७५५).

अंतर्वेदीत प्रवेश करून इटावा येथे जबरदस्त लढाई देऊन अशगरअलीस त्यांनी ठार केले व पुष्कळ प्रांत मराठी राज्यास जोडून ते स्वदेशी परत आले.

अब्दाली दुआबात असता त्याने इराण्यांच्या बाजूने बराच परिणामकारक शह देण्याचा प्रयत्न केला. अब्दालीने आताईखान यास दहा हजार स्वारानिशी बुंदेल्यावर गुप्त रीतीने पाठविले. गाजुद्दीननगरजवळ दग्याने हल्ला करून आताईखानाने पंताच्या फौजेत कापाकापी केली. पंताचे शीर कापून ते अब्दालीने सदाशिवरावाकडे पाठविले (२० डिसेंबर १७६०).

प्रस्तुत पत्रात 'अंतर्वेदीत वजीराने बेइमानी केली, फितुरी होऊन मराठ्यांचा अंमल व ठाणी उठली. त्यास चार हजार फौज ताबडतोब पाठविल्यास अंमल बसविता येईल', असे गोविंदपंत पेशवे नानासाहेब यांस कळवीत आहेत. निम्मे अधिक ('एविसीची विनंती' इथपासून ते शेवटपर्यंत) पत्र लेखकाच्या हातचे आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १७६-१८१ पहावीत]

**(२८) जनार्दन बल्लाळ** (मृत्यु: १७५६)

नाना फडणिसाचे वडील जनार्दन बल्लाळ हे प्रस्तुत पत्राचे लेखक होत. लेखकाने आपल्या चुलतबंधूस म्हणजे नाना फडणिसांचे चुलत चुलते बाबूराव रामचंद्र यास हे पत्र लिहिले आहे. पेशव्यांनी भानूंचे काही एक उणे पडू न देता पूर्वीप्रमाणेच चालविले. जनार्दन बल्लाळ व बाबूराव रामचंद्र हे दोघेही एकत्र रहात होते. दोघेही नेहमी मोहिमेवर जात असत.

जनार्दन बल्लाळ यांस पोटशुळाची व्यथा असे. इ. स. १७५६ साली हे रघुनाथराव-दादाबरोबर उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीत गेले असता त्यांचे दुखणे एकाएकी विकोपास जाऊन त्यातच त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पुत्र बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस यास तारीख २१ नोव्हेंबर १७५६ रोजी फडणिशीची वस्त्रे मिळाली.

प्रस्तुत पत्रात जनार्दन फडणीस आपल्या बंधूस पेशवे-आंग्रे यांच्यात सुरुवातीपासून जे तहनामे झाले ते दप्तरी शोध करून पाठवावे असे लिहीत आहेत. आंग्र्यांशी चालू असलेल्या संघर्षाचा वाटाघाटीने निकाल लावण्याकरिता मागील कागदपत्रांचा पुराव्यादाखल शोध घेण्याचे काम फडणीस दप्तरात चालू होते, असे या पत्रावरून दिसते.

[पत्रासाठी पृष्ठे १८४-१९१ पहावीत]



**(२९) अंताजी माणकेश्वर गंधे** (मृत्यु: १७६१)

हे मूळचे नगर जिल्ह्यातील कामरगाव येथील राहाणारे. दिल्लीहून त्यास सात हजारांची मनसब होती. उत्तरेकडील राजकारणात शिंदे-होळकराप्रमाणे सेनापती म्हणून ते महत्त्व पावले.

प्रथम शाहू महाराजांच्या पदरी ते नोकरीत होते. नंतर ते पेशव्यांकडे आले. बाजीराव व मुहम्मदखान बंगष यांच्या संग्रामात आपल्या सैन्यासह ते हजर होते. बंगषाने त्यांचा उज्जयनीस पराभव केला (१९ मे १७३१).

१७५३ त दिल्ली येथे बादशहा व वजीर यांमध्ये युद्धप्रसंग झाला असता पेशव्यांचे तर्फे अंताजी माणकेश्वरानी बादशहास मदत केली. बादशहाकडून इटावा व फपुंद हे परगणे त्यास जहागीर म्हणून मिळाले.

सन १७५५ त ते पुन्हा हिंदुस्थानात गेले व नागोरास दस्ताबीस मिळाले. १७५७ त त्यानी अब्दालीला चांगला हात दाखविला. पण अब्दालीच्या भारी फौजेपुढे त्यांचे चालले नाही. बादशाही कारस्थानात त्यांचे वर्चस्व होते, पण हिंगण्यांशी मतभेद झाल्यामुळे १७५९ त त्यास पुण्यात परत यावे लागले. सदाशिवरावाकडून त्यांच्या कारभाराची झडती झाली त्यात ते निर्दोषी ठरले. पानपतच्या युद्धात त्यानी भाग घेतला होता. त्यावेळी ते पळून दिल्लीच्या रोखाने चालले असता, दांडग्यांच्या हुल्लडीत फरूखाबादच्या जमीनदाराच्या हातून ठार झाले.

ह्या पत्राने मल्हारजी होळकरांस बिजेसिंग व जोधपूरकर यांच्याशी झालेल्या तहाने पंचवीस लाख व जालोर किल्ला मराठ्यांस मिळाल्याचे पत्रलेखक कळवीत आहे.

[पत्रासाठी पृष्ठे १९२-१९९ पहावीत]



Maharashtra State Archives

(३०) **नारोशंकर दाणी राजेबहादर** (मृत्यु : १–१–१७७५)

हे प्रथम उदाजी पवाराचे हाताखाली शिलेदार होते. १७२० पासून ते माळव्यात वावरत असल्याचे उल्लेख सापडतात. १७३० त मल्हारराव होळकरांनी त्याना इंदूरचा सुभेदार नेमले होते. त्यानी लोकांस हैराण केल्यावरून त्यास कारभारावरून दूर केल्याचा उल्लेख ६ नोव्हेंबर १७३२ च्या पत्रात आहे. पुन्हा ओर्च्छेकरांचे पारिपत्यास १७४२ नंतर पाठविले असता त्यानी ओर्च्छेकर राजास कैद करून व ओर्च्छात गाडवाचा नांगर फिरवून ते उजाड केले व पुनः आबाद करून तेथे श्रीमंतांचा अंमल बसविला. ओर्च्छाजवळ बळवंतनगर नावाचे लहानसे गाव असून तेथे ओर्च्छेकरांचा किल्ला होता. तो त्यानी घेऊन तेथे नवीन शहर वसविले. तेच झांशी शहर. त्यानी झांशीची भरभराट केली. झांशीस राहून त्यानी १४ वर्षे कारभार केला.

पानिपतपूर्व उत्तरेकडील राजकारणात त्यानी महत्त्वाची कामगिरी बजावली. भाऊसाहेबानी दिल्ली काबीज केल्यावर (जुलै १७६०) बादशहाकडून यास राजेबहादर हा किताब देऊन दिल्लीचा बंदोबस्त सांगितला. पानिपतचे वर्तमान कळताच सरकारी खजिना ५ लाख व शिर्दांचा व सावकारांचा खजिना पाच-सहा लाख तसाच टाकून ते फौजेसह दिल्लीहून त्वरित पळून गेले. दिल्ली अब्दालीने ताब्यात घेतली म्हणून नाना फडणिसाने त्यास एका पत्रात ठपका दिला आहे. पेशव्यानीही त्याबद्दल त्यांचे महाल जप्त केले होते.

नोव्हेंबर १७६२ त आळेगावच्या लढाईनंतर रघुनाथरावदादांनी जेव्हा पेशवाईचा कारभार आपल्या हाती काही काळ घेतला त्यावेळी भवानराव प्रतिनिधीवर इतराजी होऊन त्यांचे प्रतिनिधीपद काढून घेऊन ते रघुनाथरावदादानी आपल्या मुलाच्या नावे केले व त्यांची मुतालकी नारोशंकराला दिली.

ते घरसोडीच्या वृत्तीचे होते.

आंतर्वेदीत जमीनदारांच्या बखेड्याच्या बंदोबस्तास नारोशंकर गेल्याचे प्रस्तुत पत्रावरून समजते.

[पत्रासाठी पृष्ठे २००–२०५ पहावीत]



(३१) **विठ्ठल शिवदेव विंचूरकर** (जन्म : १६९५; मृत्यु : २०–८–१७६७)

हे ऋग्वेदी ब्राह्मण असून त्यांचे उपनाम दाणी असे होते. मराठ्यांच्या इतिहासातील एक शूर सेनानी आणि मुत्सद्दी म्हणून त्यांची ख्याती होती. हे मूळचे सासवडचे राहाणारे. शाहू महाराजांच्या बखीच्या ओळखीने त्यानी पागेत नोकरी मिळविली व पुढे छत्रपतीकडून १० स्वारांची मनसब त्यास मिळाली (१७२०). शिद्दीवरील मोहिमेत त्यानी शौर्य गाजविल्यामुळे त्यास सरदारी मिळाली. थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या बहुतेक मोहिमांत ते हजर असत. विशेषतः दर्याबहादूर व बंगष यांच्यावरील स्वाऱ्यांत त्यानी चांगला पराक्रम गाजविला. नासिरजंगावरील १७४० च्या स्वारीत पेशव्यांस मिळालेल्या जहागिरीची वहिवाट पेशव्यांनी त्यानाच सांगितली. कुंभेरी, ग्वाल्हेर, गोहद, सावनूर, वगैरे मोहिमांत त्यानी उत्तम कामगिरी बजाविली. ग्वाल्हेरचा बळकट किल्ला त्यानी काबीज केला. १७५७ मध्ये दिल्ली काबीज करण्यात त्यानी पुढाकार घेतला होता. दिल्लीपती बादशहाकडून त्यास विंचूरची जहागीर व 'उमदेतुलमुल्क' हा किताब मिळाला. दिल्लीला ते मराठ्यांच्या तर्फे प्रतिनिधी म्हणून होते. पानिपतातून जखमी होऊन त्यास यावे लागले याची त्यास खंत वाटे. थोरले माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत त्यास १६,८५,००० चा सरंजाम मिळाला. हैदरावरील अनेवाडीच्या मोहिमेत त्यानी चांगला पराक्रम गाजविला (१७६४). सन १७६७ त ते मृत्यु पावले.

प्रस्तुत पत्रात विठ्ठल शिवदेव राघोबादादास कळवितात की, आग्रा प्रांतात मराठ्यांचा अंमल नीट बसण्यासाठी जाटांकडे तो सुभा न ठेवता स्वामींनी आग्र्याच्या सुभ्याच्या सनदा आपल्याकडे द्याव्या.

[पत्रासाठी पृष्ठे २०६–२११ पहावीत]



Maharashtra State Archives

(३२) **समशेरबहादूर** (जन्म : १७३४; मृत्यू : १७६१)

हे पेशवे बाजीराव व मस्तानी यांचे पुत्र. त्यांचा जन्म १७३४ मध्ये झाला. ते बापाप्रमाणेच पराक्रमी निपजले. त्यांची मुंज करावी असे बाजीराव पेशव्यांस वाटत होते, पण पुण्याच्या ब्रह्मवृंदांनी ते घडू दिले नाही. त्यांच्या सहाव्या वर्षीच म्हणजे इ. स. १७४० मध्ये त्यांचे आईवडील निवर्तले. त्यामुळे ते पोरके झाले. तरीही ते पेशव्यांच्या इतर मुलांबरोबर वाढले. त्यांच्या तालीम शिक्षणाची आणि कारकुनी विद्येची सोय नानासाहेब पेशव्यांनी घरातच केली. सरदेसाई म्हणतात, "पेशव्यांच्या घरातील इतर मुलांबरोबर त्यांचे शिक्षण होऊन मराठी भाषा व मोडी अक्षर त्यास सुंदर येऊ लागले". सदाशिवराव भाऊंच्या हाताखाली वागून ते हुशार बनले. नानासाहेबांनी त्यास स्वतंत्र सरदारकी दिली. त्याची वहिवाट ते स्वतंत्रतेने आपल्या १६–१७ व्या वर्षापासून जातीने करू लागले. त्यांचे लग्न पेठ संस्थानचा राजा लक्षधीर दलपतराव याची मुलगी लालकुंवर हिच्याशी १४ जानेवारी १७४९ रोजी झाले. ती लवकरच वारल्यावर दुसरे लग्न निमगिरीकरांची मेहेरबाई हिच्याशी तारीख १९ ऑक्टोबर १७५३ रोजी झाले. त्यांचा पेहराव पेशवे कुटुंबियासारखाच असावा असे वाटते. त्यांनी पेशव्यांच्या आज्ञेनुसार कोकण, राजपुताना, हिंदुस्थान इत्यादी ठिकाणी चांगलीच कामगिरी बजाविल्याचे दिसते. निजामावरील एका मोहिमेत समशेरबहादूर असता लष्करातच त्यांचा मुलगा अलीबहादूर ह्याचा जन्म झाला. पानिपतावर विश्वासरावांच्या समवेत समशेरबहादूर होते. त्यांची बायको त्यांच्या बरोबर होती. पानिपतास बेरंग दिसू लागल्यावर त्यांनी आपल्या स्त्रीस झांशीस पाठविले. पानिपतच्या संग्रामात ते जखमी होऊन भरतपुरास परत आले व तिथेच मृत्यू पावले. हे वृत्त समजताच मेहेरबाईस तिच्या मुलासह नानासाहेबांनी तिच्या बापाकडे पोचती केली. पुढे नानासाहेब निवर्तल्यावर ती मुलासह पुण्यास आली. पुढील पेशव्यांनी पूर्वीप्रमाणेच तिची सर्व व्यवस्था लावून दिली. समशेरबहादूरांचा मुलगा अलीबहादूर याचे लालनपालन पेशव्यानीच केले. नाना फडणिसांनी त्यास १७८८ मध्ये बांद्याची जहागीर दिली. त्याचा वंश बांद्यास नांदतो.

'बलुच्यांच्या मुलुखाची ताकीद करावी' म्हणून समशेरबहादूरास आज्ञा झाल्याचा उल्लेख प्रस्तुत पत्रात आहे.

[पत्रासाठी पृष्ठे २१६–२१७ पहावीत]



(३३) **नाना फडणीस** (जन्म : १२-२-१७४२ ; मृत्यू : १३-३-१८००)

ह्यांचे मूळ नाव बाळाजी जनार्दन भानू. जनार्दन बल्लाळ भानू यांचे हे पुत्र. वडील वारल्यावर फडणविशीची वस्त्रे व पालखी ह्यांस तारीख २९ नोव्हेंबर १७५६ रोजी मिळाली. १७५७ च्या श्रीरंगपट्टणाच्या मोहिमेत पेशव्यांबरोबर ते होते. पानिपतच्या संग्रामातून ते पळून आले. माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत त्यांनी जबाबदारीची कामे केली. पेशवे नारायणराव यांच्या खुनानंतर ते बारभाईत सामील झाले. ह्यांनी इंग्रजांशी पुरंदरचा तह इ. स. १७७६ त केला. हरिपंताकडून हैदरचा व महादजीकडून कोल्हापूरकरांचा बंदोबस्त (१७७७) वगैरे गोष्टीत त्यांचाच पुढाकार होता.

यांचे चुलत बंधू मोरोबादादा फडणीस यांनी त्यांच्याविरुद्ध राघोबादादांना गादीवर बसविण्याचा कट केला. मोरोबाला कैद करून नाना मुख्य कारभारी (११ जुलै १७७८) झाले. नानांच्या कारभारी कारकिर्दीत इंग्रजांचा तळेगावी पराभव झाल्यावर त्यांनी त्यांचेशी सालबाईचा तह केला (१७८२). खर्ड्याच्या लढाईत (१७९५) निजामाचा पराभव झाला. सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत त्यांचा चांगला जम होता. पण त्यांच्या मृत्यूनंतर चिमाजीला गादीवर आणण्याचा त्यांचा प्रयत्न (महाडचे कारस्थान) उलटला व दुसरा बाजीराव गादीवर आला. बाजीरावाने त्यांना कैद (३१ डिसेंबर १७९७) केले व पुढे दोन कोटी रुपये घेऊन मुक्तता (१८ जुलै १७९७) केली. १३ मार्च १८०० रोजी ते मृत्यू पावले.

दमाजी गायकवाड व खंडागळे धारूरचा घाट चढून (उदगीर स्वारीस) येत आहेत अशी बातमी या पत्रात आहे.

[पत्रासाठी पृष्ठे २१८–२१९ पहावीत]

(३४) **गोपाळराव गोविंद पटवर्धन** (जन्म : १७२१ ; मृत्यू : १७-१-१७७१)

हे साडेतीन रावांपैकी पहिले राव. ह्यांस इ. स. १७४० च्या सुमारास शिलेदारी मिळाली.

दमाजी गायकवाडाबरोबर नाना पुरंधरे यांच्या लढाईत (गेंडयांच्या माळाची लढाई) त्यानी पराक्रम गाजविला व दमाजी गायकवाडास पकडून नानासाहेबांपुढे आणून उभे केले. १७५१ साली गायकवाडावरील स्वारीतही त्याचा विशेष भाग होता.

कर्नाटकच्या स्वारीत त्यानी बराच पुढाकार घेतला व हैदरशी अनेक लढाया केल्या. पहिल्या लढायांत त्यानी हैदरशी ३२ लाखांवर तह केला, तो पेशव्यांना नापसंत पडला. पुढे उदगीरची लढाई (१७६०) झाली. दौलताबादचा किल्ला घेतला. त्यावेळी त्यानी किल्लेदाराला जहागीर व नगद रक्कम देऊन पेशव्यांचे निशाण किल्ल्यावर चढविले म्हणून त्याजवर नानासाहेबाचा रोष झाला.

रघुनाथरावदादाना निजामअल्लीविरुद्ध पाठविले असता व गोपाळरावाना त्यास जाऊन मिळण्यास सांगितले असता, ते गेले नाहीत म्हणून पेशव्यांनी त्यांची खरमरीत कानउघाडणी केली.

माधवराव-राघोबादादा यांच्या वितुष्टात हे मिरजेस गेले. राघोबादादास त्यांची दहशत होती. म्हणून आबा पुरंदरे यास त्यांचेवर पाठविले. पुरंदऱ्यानी जमखिंडीजवळ त्यांचे लष्कर लुटले. तेव्हा ते निजामास जाऊन मिळाले. निजामाच्या पुण्यावरील स्वारीत (१७६३) ते आघाडीवर होते. राक्षसभुवनाचे लढाईनंतर (१७६३) ते पुन: पेशव्यांकडे आले. पुढील आठ वर्षांत त्यानी पेशवाईत स्वामीनिष्ठेने कार्य केले व माधवराव पेशव्यांचे केवळ उजवा हात बनले. १७६४-६५ च्या हैदरवरील युद्धात त्यांच्यावरच मोठी भिस्त होती, त्यात त्यानी चांगली कामगिरी बजावली. त्यानी १७६६ च्या हैदरावरील तिसऱ्या स्वारीतही मोठी कामगिरी केली.

१७७० च्या जून महिन्यात चिकबाळापुराजवळ हैदराच्या फौजेशी गाठ घालून त्यानी हैदराचे बरेच नुकसान केले. १७७० च्या ऑक्टोबरात त्यानी कोल्हापूर प्रांत काबीज केला. त्यानंतर हैदराचे सरदार चंद्रोजी जाधव व बाळाजी भीमराव यांचा त्यानी पाडाव केला. या स्वारीहून परत मिरजेस आल्यावर जलोदराच्या व्यथेने ते १७ जानेवारी १७७१ रोजी मृत्यू पावले.

कर्नाटकच्या स्वारीत माधवराव पेशव्यांना त्यांचा विशेष उपयोग झाला. ते स्पष्टवक्ते व व्यवहारात वाकबगार होते.

प्रस्तुत पत्रात गोपाळराव हे दौलताबादेचा किल्लेदार किल्ला स्वाधीन करीत नाही, असे भाऊसाहेबांस लिहीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २२०-२२७ पहावीत]



(३५) **जानोजी भोसले** (मृत्यू : १५-५-१७७२)

नागपूरकर रघूजी भोसल्याच्या चार पुत्रांपैकी हे थोरले पुत्र. बापाच्या मृत्यूनंतर सावत्र बंधूंशी दौलतीसाठी त्यांच्या चकमकी झडल्या. नानासाहेब पेशव्यांकडून तडजोड झाल्यावर जानोजी भोसल्यांना 'सेनासाहेब' पद व मुधोजीला 'सेना धुरंधर' हा किताब मिळाला.

१७५६ त सावनूरच्या लढाईत त्यानी चांगली कामगिरी केली. १७५७-५८ त त्यानी सलाबतजंगाची बाजू घेतल्यामुळे निजामअल्लीशी त्यांचे युद्ध झाले. १७५७ त एलिचपूर येथे तह होऊन वऱ्हाडच्या उत्पन्नापैकी शेकडा ४५ भोसल्यांनी व शेकडा ५५ निजामाने घ्यावे असे ठरले. उदगीरच्या लढाईत पेशव्यांकडून त्याना बोलावणे आले होते. पण तेथे तह झाल्यामुळे त्यांच्या सैन्याचा उपयोग झाला नाही.

पानिपत पराभवानंतर नानासाहेबांबरोबर ते उत्तरेस निघाले. पण भिलसा येथेच पराभवाची बातमी कळल्यामुळे नानासाहेब पुढे गेलेच नाहीत. जानोजी बुंदेलखंडात सागर, हट्टा या बाजूस राहून हिदूपंत बुंदेले वगैरे संस्थानिकास त्यानी काबूत आणले.

माधवराव पेशव्यांचे कारकिर्दीत त्यास सेनासाहेब सुभ्यांची सनद मिळाली (१७६१). निजाम अलीशी त्यानी संधान जोडून निजाम व प्रतिनिधी यांचे मदतीने पेशव्यांवर चढाई केली (१७६३). मोरो धोंडोजी हा मोंगलांचा सरदार वऱ्हाडात होता. त्यावर भोसल्यांचे फौजेने छापा घालून त्यास लुटले. तेव्हा मोंगल चिडून जाऊन त्यानी जानोजीविरुद्ध पेशव्यांकडे मदत मागितली असता माधवराव पेशव्यांनी नागपुरावर स्वारी करण्याची मोहीम आखली (१७६५-६६). याखेरीज कर्नाटक मोहिमेच्या वेळी जानोजी भोसल्यांची मदत वेळेवर आली नाही, हे निमित्त होतेच. पण रघुनाथदादांचे भोसल्यास अभय मिळाल्यामुळे पेशव्यांचा हिरमोड झाला. पुढे १७६८ त रघुनाथदादांस कैदेत टाकल्यावर पुन्हा १७६९ त पेशव्यांनी भोसल्यावर स्वारी करून (जानेवारी ते जून १७६९) जानोजीचा पाडाव केला. कनकापूर येथे तह झाला (२३ जून १७६९) व कराराप्रमाणे १७७० च्या कर्नाटक स्वारीत भोसल्यांची फौज पेशव्यांचे मदतीस गेली. माधवराव पेशव्यांचे अंतकाळी जानोजी त्यास थेऊर येथे भेटले (एप्रिल १७७२). त्यानंतर लौकरच १५ मे १७७२ रोजी पोटशूळीच्या व्यथेने मौजे येरळ, प्रा नळदुर्ग येथे ते मृत्यू पावले.

" मोंगलाने (निजामाने) देवस्थाने उध्वस्त केली, त्याचे पारिपत्य करण्यास येणे ", असी विनंती प्रस्तुत पत्रात जानोजी भोसले राघोबादादास करीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २२८-२३५ पहावीत]



Maharashtra State Archives

(३६) **विठ्ठल सुंदर परशुरामी** (मृत्यु : १७६३)

हे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. मूळ संगमनेर येथे राहाणारे. रामदासपंतांचे विद्यमाने निजाम अलीजवळ ते प्रथम नोकरीस राहिले. पुढे त्यांस निजामाने दिवाण नेमले (१७६२). ते मोठे बुद्धिमान, महत्त्वाकांक्षी, उलाढाली करण्यात निष्णात होते. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांत त्यांची गणना होते. पेशवाईतील घडामोडींचे निरीक्षण करून त्यांनी निजाम अलीची व्यवस्था लाविली. म्हणून निजामाची त्याजवर मर्जी होती. पानिपतावर मराठ्यांचा संहार झाला त्या संधीचा व पेशव्यांच्या अंतःकलहाचा फायदा घेऊन त्यांनी मराठ्यांवर घाला घालून निजामाची सत्ता वाढविण्याचा उद्योग आरंभिला. गमाजी मुतालिक (यमाजी शिवदेवांचा मुलगा) विठ्ठल सुंदरचे व्याही होते. त्यांचे मार्फत प्रतिनिधीस व देवाजीपंतांचे मार्फत जानोजी भोसल्यांस वळवून त्यांनी पेशवाईचा भयंकर उच्छेद आरंभिला. पुणे जाळले. शेवटी माधवराव पेशव्यांनी राक्षस-भुवनवर विठ्ठल सुंदर व त्यांचा पुतण्या विनायकदास या दोघांची इतिश्री केली (ऑगस्ट १७६३).

त्यांस निजामाकडून 'राजाबहादूर प्रतापवंत' हा किताब होता.

ह्या पत्रात विठ्ठल सुंदर पंतप्रधानांस लिहितात की, रामचंद्र मल्हार याने ब्राह्मणांवर जुलूम केला त्याचे निवारण व्हावे.

[पत्रासाठी पृष्ठे २३६–२४१ पहावीत]



(३७) **मल्हारराव होळकर** (जन्म : ५–८–१६९३; मृत्यु : २०–५–१७६६)

हे इंदूर राज्याचे संस्थापक.

ते जातीने धनगर होते. पुणे जिल्ह्यातील होळ गावचे (नीरेच्या काठी). लहानपणीच बाप वारल्यावर मामाबरोबर कदमबांडयांचे लष्करात ते प्रथम नोकरीस राहिले. त्यांचा पराक्रम पाहून बाजीराव पेशव्यांनी त्यास बांडयांकडून मागून घेतले (१७२१). तेव्हापासून त्यांचा भाग्योदय झाला. १७२५ त पेशव्यांनी त्यास ५०० स्वारांची मनसब दिली. त्यांनी शिद्यांच्या सहाय्याने माळव्यात बंगशाला जेरीस आणून सर्व माळवा प्रांतात आपला अंमल बसविला.

मल्हारराव होळकरांनी शिंद्यांच्या बरोबर मराठ्यांची सत्ता उत्तर हिंदुस्थानात पसरविली. कुंभेरीच्या लढाईत त्यांचा पुत्र खंडेराव मारला गेला म्हणून सुरजमल जाटाचा शिरच्छेद करण्याची व कुंभेरीची माती यमुनेत टाकण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली (१७५३). बादशहा व वजीर जाटास मदत करतात असे समजताच अहमदशहास कैदेत टाकून त्यांनी आलमगीरास गादीवर बसविले (१७५४).

उत्तर हिंदुस्थानातील राजकारणात त्यांचा प्रमुख भाग होता. जयाप्पा शिंद्यांशी त्यांचे बिनुष्ट होते. रघुनाथरावांबरोबर राजपुताना व सरहिंदच्या मोहिमेत (१७५८) त्यांनी भाग घेतला. दत्ताजी पडल्यावर अब्दालीवरील मोहीम त्यांनी घेतली. पण त्यात अपयश आले. पानिपत मोहिमेत भाऊसाहेबांशी त्यांचा मतभेद होता, पण त्यांनी त्यास सहाय्य केले. पानिपत युद्धातून त्यास पळून यावे लागले. पानिपत युद्धानंतर उत्तरेत मराठ्यांचा जम बसविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. माधोसिंगाचे पारिपत्य त्यांनी एप्रिल १७६१ त केले.

यानंतर राक्षसभुवनाच्या लढाईत (१७६३), जाटाने दिल्लीस घातलेल्या वेढ्यात (१७६४) ते होते. सुराजउद्दौल्याच्या मदतीस इंग्रजांविरुद्ध ते गेले. इंग्रजांकडून पराभव (१७६५) झाल्यावर राघोबादादांबरोबर जाटाच्या पारिपत्यास निघाले. ते असमपूर (दतिया) येथे मृत्यू पावले (२० मे १७६६).

छत्रपती शाहू महाराज हे आजारी असल्यामुळे आपण साताऱ्यास येत आहे, असे प्रस्तुत पत्रात मल्हारराव होळकर पंतप्रधानास कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २४२–२४५ पहावीत]



Maharashtra State Archives

(३८) **दमाजी गायकवाड** (जन्म : १७३२ ; मृत्यु : १८-८-१७६८)

पिलाजी गायकवाडांचे हे थोरले पुत्र त्यांचे नंतर गादीवर आले. पिलाजीच्या मरणानंतर त्यानी जोधपूरपर्यंत स्वाऱ्या केल्या. कंठाजी कदम यास गुजराथ सोडावयास लाविले. अब्दुल अझीझ व फकीरुद्दौला हे गुजराथचे सुभेदार म्हणून आले असता त्यांचा त्यानी पराभव केला.

रघुजी भोसले व बाळाजी बाजीराव यांच्या तडजोडीमध्ये दमाजीनी माळव्याच्या वसुलीचा हिशेब द्यावा असे ठरले.

पुढे ते ताराबाईस मिळाले, व निंब येथे त्यांची पेशव्यांशी लढाई झाली (१७५१). पेशव्यांच्या पराभवानंतर नानासाहेबानी त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्यांचा पराभव केला व त्यास पुण्यात अटकेत ठेविले. नंतर त्यास सोडून दिले.

पानिपतच्या लढाईत त्यानी भाऊसाहेबास सहाय्य केले. तांदुळजाच्या लढाईत ते हजर होते. १७६८ साली ते मृत्यू पावले.

दमाजी गायकवाड ह्या पत्रात दादासाहेबांस लिहितात की, "कर्ज भारी, पगाराची बाकी थकल्यामुळे फौजेत गवगवा, म्हणून फौजेसुद्धा सत्वर येणे कठीण".

[पत्रासाठी पृष्ठे २४६-२५१ पहावीत]



(३९) **माधवराव बल्लाळ** (जन्म : १६-२-१७४५; मृत्यु : १८-११-१७७२)

माधवराव पेशवे हे नानासाहेब पेशव्यांचे द्वितीय पुत्र. ह्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १७४५ रोजी सावनूर येथे झाला. पानिपतच्या आघाताने नानासाहेब पेशवे तारीख २३ जून १७६१ ला निवर्तल्यानंतर माधवरावास २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली. पानिपती मराठ्यांची बहुतेक कर्ती माणसे कामास आलेली, दक्षिणेत निजाम, हैदर, उत्तरेत जाट, रजपूत, पठाण, रोहिले, मोंगल मराठ्यांच्या नाशास टपलेले व घरात राघोबादादांचे दौलतीकरिता भांडण. ह्या सर्व प्रसंगास धैर्याने तोंड देऊन मराठी राज्याची बिघडलेली घडी नीट बसविण्याचे काम माधवराव पेशव्यानी केले.

माधवरावांस पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला त्यावेळी त्यांचे वय १६ वर्षांचे होते. पेशवाईचा कारभार पाहू लागल्यावर निजामाचे प्रकरण उपस्थित झाले. निजाम मराठ्यांवर चालून आला. मराठेही त्यास साफ बुडवावा ह्या हेतूने पुढे सरसावले. इतक्यात दादासाहेबानी निजामाशी आतून कारस्थान केले व उरळी येथे तह करून सलोखा केला. पुढे माधवरावांची व दादासाहेबांची आपसात तेढ वाढून चुलत्या-पुतण्याची लढाई झाली. त्यात माधवराव निष्कारण होणारा संहार टाळण्यासाठी चुलत्यास शरण गेले. ह्या गृहकलहाचा फायदा घेऊन निजाम मराठेशाही बुडविण्याकरिता मराठ्यांवर चालून आला. ह्यावेळी मराठी फौज शत्रूवर तुटून पडून निजामाचा पराभव केला. माधवराव अल्पवयी असताही त्यानी पेशवेकुळाला साजेसा पराक्रम केला. चुलत्याशी ते जरी अतिशय नम्रतेने वागत होते तरी त्यास त्यानी धाकात ठेविले होते.

पानिपतवर मराठ्यांचा पराभव झाल्यापासून कर्नाटकातील पाळेगार व हैदर वगैरे सत्ताधीश मराठ्यांची सत्ता मानीनासे झाले होते. निजामाचा बंदोबस्त केल्यावर माधवराव पेशव्यानी स्वतः कर्नाटकात चार स्वाऱ्या केल्या आणि गेलेला मुलूख मराठी अंमलाखाली आणिला. १७६६ च्या एप्रिलात चाळीस हजार फौजेनिशी दादासाहेब उत्तरेस गेले. गोहदच्या जाटांशी हुज्जत घालून ते फेब्रुवारी १७६७ मध्ये अपयश पदरी घेऊन परत आले. माधवरावानी उत्तरेत मराठ्यांचा अंमल बसविण्यासाठी मल्हारराव होळकर, विश्वासराव लक्ष्मण दाणी, रामचंद्र गणेश, आणि विसाजी कृष्ण बिनिवाले आदी सरदारास पाठविले. ह्या सर्व सरदारानी जाटांचा बंदोबस्त केला व बुंदेल्याना नमविले. अप्पाजी केशवने रोहिल्यांचा पराभव केला. १७७१ च्या अखेरीस मराठे सरदारानी शहाआलम बादशहास दिल्लीस आणून बसविले. मराठ्यांच्या ह्या कर्तृत्वाने त्यांच्या सत्तेस आगळे तेज आले. पानिपत पराभवाने लागलेला कलंक धुऊन निघाला. ह्यामुळे इंग्रज चपापले. हिंद किनाऱ्यावरील पाश्चात्य वखारवालेही चरकले.

आपल्या न्यायनिष्ठुर वागणुकीने त्यानी आपला लौकिक वाढविला. एवढा मानी, करारी आणि उद्योगी पेशवा रामशास्त्री सारख्या न्यायाधिशांस गुरुस्थानी मानून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागत असे. उदात्त आणि निःपक्षपाती भावनेने माधवरावानी शत्रु-मित्रावर छाप बसविली, नागपूरकर भोसल्यांचा तंटा तोडला व कारभारात हिशेबीपणा आणिला. सारांश हिंदुस्थानात व कर्नाटकात गड, किल्ले व स्थळे नानासाहेबांचे कारकिर्दीत आली नव्हती ती माधवरावानी घेऊन शत्रू पादाक्रांत केले. राज्यरक्षण करून नानासाहेबांहून अधिक पराक्रम केला. ह्या सर्व





Maharashtra State Archives

दगदगीमुळे शेवटच्या २–३ वर्षांत त्यांना क्षयाची व्यथा जडली. त्याने माधवराव फारच जर्जर झाले. तरी पण लायक माणसास जवळ करून त्यांना शाबासकी देऊन, तर काही वेळा कर्तव्य-कठोर होऊन शिक्षेची भीती दाखवून त्याजकडून कामे करून घेतली. हिशेबाच्या कामात त्यांनी फारच दक्षता घेतली. पूर्वीच्या तीन पिढ्यांच्या कारभारात राहिलेली अपूर्तता व उघडकीस आलेल्या चुका सुधारून माधवरावाने राज्याचा गाडा सुरळित मार्गावर आणून ठेविला. एवढे काम करीत असता त्यावर जो अपरिमित ताण पडला त्यामुळे त्यांना क्षय रोगास बळी पडावे लागले. माधवराव ह्या असाध्य दुखण्याने तारीख १८ नोव्हेंबर १७७२ रोजी निवर्तले. त्यांचे बरोबर त्यांची साध्वी पत्नी रमाबाई सती गेली. माधवरावांची गणना सर्वोत्तम पेशवा म्हणून केली जाते.

'देवाच्या जागेवर सोफा बांधिला, तो मोडून त्या जागेवर देवालय बांधणे' असे प्रस्तुत पत्रात माधवराव रामशास्त्री प्रभुण्यास लिहीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २५४–२५७ पहावीत]

(४०) **नारायण बल्लाळ पेशवे** (जन्म : १०–८–१७५५; मृत्यु : ३०–८–१७७३)

नानासाहेब पेशव्यांचे हे धाकटे पुत्र. यांचा जन्म १० ऑगस्ट १७५५ रोजी झाला. माधवरावांचे मृत्यूनंतर त्यास पेशवाई मिळाली.

बाबाजी बर्वे हे त्यांचे कारभारी होते. त्यांच्या कारकिर्दीत कृष्णाजी धुळपाने फिरंग्यांचा पराभव केला (१७७३). राघोबादादा व आनंदीबाई यांच्या मसलती आपल्या विरुद्ध आहेत असे कळताच दादास त्यांनी सहकुटुंब कैद केले.

त्यांच्या कारकिर्दीत चांद्रसेनीय कायस्थांचे प्रकरण घडले असता त्यांनी कायस्थांचे विरुद्ध निकाल दिला. कायस्थांनी नारायणरावास कैदेत टाकण्याचा व राघोबास पेशवाई देण्याचा कट रचला.

पुढे गारद्यांकडून त्यांचा खून झाला (१७७३). त्यांचा स्वभाव तापट होता. ते हलक्या लोकांच्या आहारी जात असत. पोरवयामुळे त्यांचेकडे भारदस्तपणा व सारासार विचार कमीच होता.

ह्या पत्रात नारायणराव नाना फडणिसास 'बोभाटपा जलद पाठविण्यास सांगत आहेत.'

[पत्रासाठी पृष्ठे २४८–२५१ पहावीत]



(४१) **हरि बल्लाळ फडके** (जन्म : १७२९; मृत्यु : २०–६–१७९४)

बाळंभट नावाच्या भिक्षुकाचे हे पुत्र. त्यांचा भाऊ बापू हा पानिपतच्या लढाईत मेला. तेव्हा माधवराव पेशव्यांनी कारकुनाच्या जागी यांची नेमणूक केली (१७६२). माधवरावांची त्यांचेवर मर्जी होती व मृत्युसमयी त्यांनी आपल्या श्रीवर्धनच्या देशमुखीचे वतन त्यास इनाम दिले.

नारायणरावांच्या वधानंतर बारभाईंना ते सामील झाले. मोरोबांचे कारस्थान त्यांनीच उघडकीस आणिले (१७७८). त्यांनी राघोबादादांचा पाठलाग करून महीतिरी त्यांची फौज उधळून लावली (१७–२–१७७५). कर्नल कीटिंग राघोबादादांसह पुण्यास चालून येत असता, हरिपंतांनी त्यांचेशी लढाई दिली (आनंदमोगरीची व आडासची लढाई).

१७७४–७५ त हैदरखानावरील मोहिमेत त्यांनी हैदरापासून खंडणी वसूल केली (१७७८).

पहिल्या इंग्रज-मराठे युद्धात (१७८१), टिपूवरील स्वारीत (१७८७ व १७९२) त्यांचा महत्त्वाचा भाग होता. ते सिद्धटेक येथे पोटदुखीने मृत्यू पावले (२० जून १७९४). ते नाना फडणिसांच्या पूर्ण विश्वासातील होते. ते गेल्यामुळे नानांचे सामर्थ्य लुळे पडले.

गंगापुराहून मातुश्रीबाई पुण्यास गेल्यामुळे पुण्याकडे येत आहे, असे प्रस्तुत पत्रात हरि बल्लाळ फडके लिहीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २६२–२६७ पहावीत]



Maharashtra State Archives

(४२) **रघुनाथराव बाजीराव ऊर्फ दादासाहेब पेशवे** (जन्म : १८-८-१७३४; मृत्यु : ११-१२-१७८३)

थोरल्या बाजीराव पेशव्यांचे हे तिसरे चिरंजीव. नानासाहेब पेशव्यांचे कारकिर्दीत १७५० च्या नोव्हेंबर त्यांनी उत्तरेकडील मोहिमेत भाग घेतला. गुजराथवर स्वारी (ऑक्टोबर १७५१–जुलै १७५२) केली, अहमदाबाद काबीज (एप्रिल १७५३) केले, पुढे कुंभेरीचा वेढा (मे १७५४), सुरजमल्लाविरुद्ध मोहीम वगैरेत त्यांचा महत्त्वाचा भाग होता. बादशहा व खानखनान वजीर यांचा पराभव करून त्यांनी दुसऱ्या आलमगिराला गादीवर बसविले व साडेभ्यांयशी लाखांची खंडणी मिळविली.

आपल्या दुसऱ्या मोहिमेत (नोव्हेंबर १७५६–ऑक्टोबर १७५८) त्यांनी अब्दालीच्या पाठोपाठ दिल्ली काबीज केली. मथुरा, वृन्दावन, कुरुक्षेत्र घेतले व अटकेपार झेंडे लावून परत आले.

ते उदगीरच्या लढाईत हजर होते (१७६०). नानासाहेबानंतर त्यांचे माधवरावांशी बिनसले. घोडनदीच्या लढाईत त्यांनी माधवरावांचा पराभव केला. पुढे राक्षसभुवनाच्या लढाईत निजामाचा पराभव झाल्यावर त्यांनी माधवरावांकडे अर्ध्या राज्याची मागणी केली. घोडपच्या लढाईत माधवरावांनी त्यांना कैद केले. माधवरावानंतर नारायणरावांकडूनही ते नजरकैदेत होते. नारायणरावास धरण्याचा कट झाला. नारायणरावांच्या खुनानंतर त्यांच्याविरुद्ध बारभाईंचे कारस्थान झाले. त्यावेळी ते हैदराबरील स्वारीवर होते. हैदरशी कल्याणदुर्गाचा तह करून ते परत आले. बराच मुलूख त्यांनी हैदराला दिला, त्यानंतर त्यांनी जमखंडी–मिरज घेण्याचा प्रयत्न केला. कासेगावची लढाई (१७७४) झाली. हरिपंत फडकेकडून त्यांचा पाठलाग झाल्यावर अहमदाबादेस ते इंग्रजांच्या आश्रयाला गेले, सुरतेला त्यांनी इंग्रजांशी तह केला व इंग्रजांकडून गादी मिळवून देण्याचे आश्वासन घेतले.

मॉस्टीनच्या सहाय्याने त्यांनी मोरोबादादांबरोबर कारस्थान केले, पण नाना फडणिसांनी ते हाणून पाडले (१७७८).

इंग्रजांचा तळेगावावर पराभव (१७७९) झाल्यावर साल्बाईच्या तहामुळे राघोबादादांचा इंग्रजांचा आश्रय सुटला. दरमहा पंचवीस हजाराची नेमणूक घेऊन कोपरगावी रहाण्याचे त्यांनी ठरविले. तेथेच ११ डिसेंबर १७८३ रोजी ते मृत्यू पावले.

नारायणरावांच्या खुनानंतर राघोबादादा पेशवाईची वस्त्रे स्वीकारून हैदरावर चाल करून कर्नाटकात गेले. तेथून नाना फडणीस यास 'पुण्यात हुल्लड झाली, त्याचा बंदोबस्त करावा' अशी आज्ञा प्रस्तुत पत्रातून करीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २६८–२७१ पहावीत]



(४३) **आनंदीबाई पेशवे** (मृत्यू : २७-३-१७९४)

राघोबादादांची ही दुसरी बायको, राघो महादेव ओक मल्ठणकर यांची ही कन्या. लग्न १७ डिसेंबर १७५५ रोजी झाले. आतापर्यंतच्या ऐतिहासिक प्रवादाप्रमाणे 'ध' चा 'मा' करून नारायणरावांचा खून घडविणाऱ्या कटामागील ही खरी सूत्रधार. परंतु, नारायणरावास पेशवाईची वस्त्रे देण्यासाठी राघोबादादांचे मन हिनेच वळविले. नारायणरावांच्या खुनाबद्दल प्रायश्चित्त घेऊन गोपिकाबाईंचे दर्शन घेऊन त्या पुण्यशील माऊलीचा आशीर्वाद मिळवावा म्हणून यात्रा आनंदीबाईने आपल्या नवऱ्यास सल्ला दिला. पुतण्याच्या खुनाबद्दल पुराव्याचे माप पदरात घालून मगच शिक्षा करावी असा हट्ट तिने धरिला. पेशव्यांच्या घराण्याच्या लौकिकाबद्दल हिला कळकळ होती, असेही हिच्या काही उदाहरणांवरून वाटते. मराठी राज्यास उतरती कळा लागल्याबद्दल तिनेच हळहळ व्यक्त केली होती. नारायणरावांच्या खुनानंतर १७७५ मध्ये हिला धारच्या किल्ल्यात अटकेत ठेविले होते. तेव्हापासून अटकेत, नजरकैदेत असेच तिचे दिवस गेले. सखारामबापूस लिहिलेल्या पत्रात इंग्रजांचा कावा हिच्या चांगलाच ध्यानात आलेला होता असे दिसते. राघोबादादांच्या मृत्यूनंतर कारभाऱ्यांच्या नजरकैदेत ही कोपरगावी २ लाख रुपयांची नक्त नेमणूक घेऊन राहिली.

हिचा पहिला मुलगा भास्करराव (जन्म १८ मार्च १७६२); परंतु तो देवी येऊन मार्च १७६३ त मृत्यू पावला. दुसरा मुलगा १५ ऑगस्ट १७६४ ला जन्मला व त्याला एक वर्षात मृत्यू आला. तिसरा मुलगा बाजीराव व चौथा मुलगा चिमाजी अप्पा याखेरीज गोदूबाई या नावाची एक मुलगी होती.

ही २७ मार्च १७९४ रोजी आनंदवल्ली येथे निधन पावली.

नारायणरावांच्या नूतन बालकास सुख पडे ते जागी सखारामबापूच्या सल्ल्याने ठेवावे, अशी सूचना आनंदीबाई ह्या पत्राने नाना फडणिसांस करीत आहे.

[पत्रासाठी पृष्ठे २७२–२७७ पहावीत]



Maharashtra State Archives

(४४) **महादजी शिंदे** (जन्म : १७२७; मृत्यू : १२-२-१७९४)

राणोजी शिंद्यांचे हे पुत्र. सुरवातीला ते पेशव्यांच्या खाजगी पागेत चाकरी करीत होते. तेथेच त्यांनी युद्ध कलेचे शिक्षण घेतले. तळेगाव-उंबरीच्या लढाईत त्यांनी शौर्य गाजविले. औरंगाबाद (१७५१), साखरखर्डा (१७६६) व पंजाबकडील मोहिमेत (१७५९) त्यांनी भाग घेतला. निजामास मिळालेल्या जानोजी भोसल्यास त्यांनी परत आणिले. पानिपतच्या लढाईत त्यास एक पाय गमावून परतावे लागले. गोहदच्या जाटावरील राघोबादादांच्या स्वारीत शिंद्यांच्या दौलतीतर्फे प्रथमच त्यांनी भाग घेतला (१७६६-६७). १८ नोव्हेंबर १७६६ रोजी त्यास सरदारीची वस्त्रे मिळाली.

उदेपूरच्या गादीच्या तंट्यात ६० लाखांची खंडणी त्यांनी वसूल केली व माळव्यात आपला जम बसविला. माधवराव पेशव्यांकडून सर्व हुजूरपागेचे सेनापतिपद व जहागिरी मिळविली. उत्तरेकडील मोहिमेवर त्यांची रवानगी झाली असता (१७७१), त्यांनी नजिब-खानाचा प्रांत लुटला. शहा आलम बादशहास इंग्रजांच्या तावडीतून सोडवून दिल्लीस आणून गादीवर बसविले.

नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर झालेल्या बारभाईच्या कारस्थानात नाना फडणीस व सखारामबापू यांनी महादजी शिंद्यांना आपल्या गोटात वळवून, त्यांच्याकडून राघोबादादांचा बंदोबस्त करविला. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धात त्यांनी मुत्सद्देगिरीची कामगिरी बजावली. साल्बाईच्या तहानंतर रजपूत राजांनी बळकावलेला मुलूख त्यांनी परत मिळविला व उत्तरेत मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. दहा-बारा वर्षांत सर्व उत्तर हिंदुस्थानची सूत्रे आपल्या हातात खेळविली व दिल्लीच्या बादशहाला आपल्या हाताखाली घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या इंग्रज व शिखांवर मात केली. बादशहाकडून त्यांनी पेशव्यांसाठी 'वकील-इ-मुतालिक' चे पद व स्वतःस त्या पदाची नायबगिरी मिळविली. बादशहास दरमहा ६५ हजारांची नेमणूक करून देऊन दिल्लीची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली (१७८५). पुढे मुसलमान सरदार व रजपूत राजांची बंडाळी झाली (१७८६-८७). लालसोटच्या लढाईत बादशहाची फौज रजपुतांना मिळाल्यामुळे त्यांना हार खावी लागली (१७८७). त्यानंतर गुलाम कादीरने दिल्ली, अलीगड वगैरे घेतल्यामुळे त्यांना चंबळ अलीकडे यावे लागले. नाना फडणिसांनी त्यांच्या मदतीसाठी अलीबहादूर यास पाठविले (१७८८). पुन्हा त्यांनी दिल्ली व राजपुताना हस्तगत केला (१७८९-९०). उदेपूरचा राणा स्वतः त्यास सामोरा आला. गुलाम कादीरला देहांत शासन करून शहा आलमला पुन्हा पातशाहीवर बसविले व स्वतः राज्यकारभार हाती घेतला. १७९२ त ते पुण्यास परत आले. १२ फेब्रुवारी १७९४ रोजी ते वानवडी येथे नवज्वराने मृत्यू पावले.

सतलजपासून तुंगभद्रेपर्यंत साऱ्या हिंदुस्थानभर मराठी साम्राज्याचा दरारा बसविण्यात महादजी शिंद्यांकडे फार मोठे श्रेय जाते.

प्रस्तुत पत्रात महादजी शिंदे 'तापीतीरी चांगदेवापाशी नदी उतरून आपण येतो' असे नाना फडणिसास कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २७८-२८३ पहावीत]



(४५) **साबाजी भोसले उर्फ नाना** (मृत्यू : २६-१-१७७५)

पहिल्या रघुजी भोसल्यांचे हे धाकटे पुत्र व जानोजींचे भाऊ. दौलतीच्या मालकीसाठी पहिल्या रघूजीच्या पश्चात यांचा मुधोजी भोसल्यांशी तंटा उत्पन्न झाला व त्याचे पर्यवसान कुंभारी येथे जानेवारी १७७३ मधल्या लढाईत झाले. नंतर त्या दोघामध्ये २८ जानेवारी १७७३ रोजी तह झाला व दोघानी कारभार पहावा असे ठरले. परंतु पुन्हा इ. स. १७७५ मध्ये लढाई होऊन तीत हे मारले गेले. हे बारभाईच्या कारभाऱ्यास सामील होते. ते पहिल्या रघूजीच्या धाकट्या स्त्रीचे पुत्र होते.

साबाजी भोसले यांनी ह्या पत्रात कडेवलीतल्या देशमुखीबाबत निंबाळकर, शिंदे, होळकर यांनी सदाशिव गणेश यास अभय द्यावे असे माधवराव नारायण पेशव्यास लिहिले आहे.

[पत्रासाठी पृष्ठे २८४-२८९ पहावीत]

(४६) **पुरुषोत्तम महादेव हिंगणे** (मृत्यू : ५-५-१७८२)

मराठ्यांचे दिल्ली येथील वकील म्हणून हे प्रसिद्ध होते. महादेवभट हिंगण्यांचा १७४४ त खून झाल्यावर त्यांचे चार मुलगे दामोदर, बापूजी, पुरुषोत्तम व देवराव हे दिल्ली व इतर ठिकाणी वकिलातीच्या कामावर होते. रघुनाथरावांच्या दिल्लीवरील स्वारीत त्यांचा हिंगण्यांशी बेबनाव झाला. अंताजी माणकेश्वरांशी पैशावरून तंटा, हे त्याचे मूळ कारण होते.

माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत पुरुषोत्तम व देवराव यांची दिल्लीच्या वकिलातीवर पुनः स्थापना झाली (१७६९). पुरुषोत्तम महादेवानी हे काम चांगले करून नाना फडणिसांची मर्जी संपादिली. मध्यंतरी ते राघोबाला सामील झाल्यामुळे माधवराव पेशव्यांच्या रोषास पात्र झाले होते.

१७८२ त ते दिल्ली येथे मृत्यू पावले.

या पत्रात हिंगणे पंतप्रधानास इंग्रजांचे पारिपत्यास सरकारची फौज यमुनेचे प्रांतात फिरणार असे कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २९०-२९१ पहावीत]



Maharashtra State Archives

(४७) **रामशास्त्री प्रभुणे** (जन्म : १७२०; मृत्यु : २१-१०-१७८९)

हे पेशवाईतील एक प्रख्यात न्यायाधीश. ते मूळ माहुलीचे राहणारे. त्यांचे सर्व शिक्षण काशीस झाले. सन १७५१ मध्ये त्यांनी पेशव्यांचे दरबारी प्रथम धर्मखात्यात नोकरी धरली. नंतर सन १७५९ मध्ये ते मुख्य न्यायाधीश झाले. ते अत्यंत निस्पृह होते. माधवराव यांच्याच तंत्राने वागत असत. नारायणराव पेशव्यांच्या खुनाबद्दल यांनी राघोबादादास निर्भयपणे देहांत प्रायश्चित घेण्यास सांगितले व नोकरी सोडून माहुलीस निघून गेले. सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत ते पुन्हा न्यायाधीश झाले. तारीख २१ ऑक्टोबर १७८९ रोजी ते मरण पावले.

प्रस्तुत पत्रात 'बायकोने ब्राह्मणास बुद्धिपूर्वक जीवे मारिले' म्हणून रामशास्त्री प्रायश्चित सांगीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे २९४-२९९ पहावीत]

(४८) **सखाराम बापू बोकील** (जन्म : १७१६ ; मृत्यु : २-८-१७८१)

यांचे पूर्ण नाव सखाराम भगवंत बोकील. प्रथम ते हिवऱ्याचे कुळकर्णी होते. महादजीपंत पुरंदरे यांच्याकडे कारकून म्हणून ते राहिले. नानासाहेब पेशव्यांबरोबर उत्तरेकडील स्वाऱ्यांत (१७४१-१७४४), सदाशिवराव भाऊंबरोबर कर्नाटकच्या स्वारीत (१७४६), मल्हारराव होळकरांबरोबर उत्तरेकडील राजकारणात (१७४७-४८) त्यांनी भाग घेतला. गुजराथवरील मोहिमेत ते राघोबादादांचे कारभारी होते (१७५१).

अहमदाबादेचा किल्ला सर करणे, रोहिल्यांचा पाडाव करून दोआब जिंकणे, कुंभेरीचा वेढा, दिल्लीत मराठ्यांचे वर्चस्व, इत्यादी कामगिरीत यांनी प्रमुख भाग घेतला होता. नानासाहेब पेशव्यांच्या अंतकाळी त्यांचे मुख्य कारभारी म्हणून त्यांची नेमणूक झाली. माधवरावांच्या कारकिर्दीत त्यांना राजीनामा द्यावा लागला. कारण राघोबादादांकडे त्यांचा विशेष कल होता. ते राघोबादादांचे कारभारी असून ९ लाखांची जहागिरी त्यांना त्यांचेकडून मिळाली होती (१७६२). माधवरावांचे अंतसमयी पुन्हा कारभारी पदावर त्यांची नेमणूक झाली. नारायणरावाला संभाळण्याची कामगिरी त्यांचेवर सोपविली होती. नारायणरावांच्या कारकिर्दीत सर्व राज्यकारभार हेच पाहू लागले. त्यांनी नारायणरावाला पकडण्याच्या राघोबादादांच्या कारस्थानात भाग घेतला पण पुढे राघोबादादांविरुद्ध ते बारभाईला सामील झाले. बारभाईच्या कारभाराचा सर्वाधिकार त्यांच्याकडेच होता. पुढे नाना फडणिसांशी त्यांचे बिनसले. मोरोबादादांच्या कारस्थानात त्यांनी भाग घेतला. पुरंदरच्या तहानंतर नानांनी त्यांना कैद करून सिंहगडावर पाठविले (२६ फेब्रुवारी १७७९). त्यांचेवर फितुरीचा संशय होता. त्यांचा शेवट हालात झाला. रायगडावर कैदेत असताना त्यांना मृत्यू आला (२ ऑगस्ट १७८१).

पेशवाईतील साडेतीन शहाण्यांतील एक 'शहाणा' म्हणून त्यांची ख्याती होती.

या पत्रात वृद्धावस्थेतील आजारीपणात खर्चास पाठविण्याची विनंती सखारामबापू करीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे ३००-३०३ पहावीत]



(४९) **आनंदराव धुळप** (मृत्यु : १७९५)

यांच्या घराण्याचे मूळ नाव मोरे. शिवाजी महाराजांनी या घराण्याची धुळधाण केल्यावर यांचे पूर्वज स्वसंरक्षणासाठी विजापूर दरबारी येऊन राहिले. तेथे त्यांनी समशेर गाजविल्यामुळे धुळप हा बहुमानाचा किताब मिळाला. नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर यांची कर्तबगारी सन १७६७-६८ त दिसून आली. सन १७८३ मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध मोठा जय मिळविला. याबद्दल पेशव्यांनी २५ मे १७८३ रोजी यास बहुमान, खासगीचा पोषाख व कंठी दिली. आनंदराव धुळप हे सन १७९५ मध्ये मरण पावले.

सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बाहेर इंग्रजांच्या आरमाराचा पाडाव केल्याचे आनंदराव धुळप बाळाजीपंत लेले यास कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे ३०४-३०९ पहावीत]

(५०) **माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव पेशवे** (जन्म : १८-४-१७७४ ;
मृत्यु : २७-१०-१७९५)

हे नारायणराव पेशव्यांचे पुत्र. पुरंधर किल्ल्यावर त्यांचा जन्म झाला (१८ एप्रिल १७७४). जन्मापासून ४० दिवसांनी त्यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. बारभाईचे कारस्थान त्यांच्यासाठीच घडले. सवाई माधवराव व त्यांची आई गंगाबाई हे खासे आणि नाना फडणीस व सखारामबापू हे कारभारी म्हणून राज्यकारभार पाहू लागले. रघुनाथरावदादांचा यांना पकडून कैद करण्याचा कट फसला. ते सव्वातीन वर्षांचे असताना आई गंगाबाई वारली. आजी (सदाशिवराव भाऊची बायको) पार्वतीबाई हिने व नाना फडणिसांनी त्यांचे पुढील संगोपन केले. १७७९ साली त्यांची मुंज झाली. महादजीपंत गुरुजींकडे त्यांचे शिक्षण झाले. टोकेकर घसे यांच्या कन्येशी त्यांचे पहिले लग्न झाले (फेब्रुवारी १७८३). १७८८ च्या मार्चपासून ते राज्यकारभारात थोडे थोडे लक्ष घालू लागले. १७९१ त त्यांनी छत्रपती महाराजांची सातारा येथे भेट घेतली. १७९३ त त्यांचे दुसरे लग्न (गणेशपंत गोखल्यांची मुलगी) यशोदाबाईंशी झाले.

महादजी शिंद्यांकडून दिल्लीचे 'वकील-इ-मुतालिक' ह्या पदाची त्यास प्राप्ती झाली. ह्यांच्या कारकिर्दीत मराठ्यांचा दरारा सबंध हिंदुस्थानभर झाला.

दुसऱ्या बाजीरावाने जुन्नरहून (कैदेतून) त्यांचेशी गुप्त पत्रव्यवहार केला म्हणून नाना फडणिसांनी त्यांचा निषेध केला. वाताच्या झटक्यात खिडकीतून उडी टाकल्यामुळे त्यास २७ ऑक्टोबर १७९५ रोजी मृत्यू आला.

'पातशहाच्या वकीलगिरीची वस्त्रे पुण्यास पाठवावी' असे प्रस्तुत पत्रात पेशवे महादजी शिंद्यास लिहीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे ३१०-३२१ पहावीत]



L 2602—7

Maharashtra State Archives

(५१) **रघूजी भोसले २ रा** (जन्म : १७५७ ; मृत्यु : २२-३-१८१६)

हे मुधोजी भोसल्यांचे पुत्र व जानोजीचे दत्तक पुत्र. सवाई माधवरावांचे कारकिर्दीत यांच्या नावे सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे व नेमणूक तारीख २४ जून १७७५ रोजी रीतसर होऊन आली व हे कायदेशीर रीतीने सेनासाहेब सुभा झाले. सन १७९५ त खर्ड्याचे लढाईत ते स्वतः हजर होते. हे तारीख २२ मार्च १८१६ त मरण पावले. ते अत्यंत मातृभक्त होते. ते काम करण्यात बाकबगार व मेहनती, धार्मिक होते. त्यांनी चिखूर येथे सोमयाग केला होता.

हैदराबादेकडील जाबसाल लिहून पाठविल्याचे रघूजी प्रस्तुत पत्रात नाना फडणिसांस कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १२३-१२७ पहावीत]

(५२) **अहिल्याबाई होळकर** (जन्म : १७२५ ; मृत्यु : १३-८-१७९५)

ही मराठेशाहीतील एक सच्छील व धार्मिक राज्यकर्ती म्हणून प्रसिद्ध पावली. औरंगाबाद जिल्ह्याच्या बीड तालुक्यातील चौंडे गावच्या पाटलाची ही मुलगी. १७३३-३४ त मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेराव यांचेशी तिचा विवाह झाला. कुंभेरीच्या वेढ्यात खंडेराव मृत्यु (१७५४) पावले. मल्हाररावांच्या मृत्यू (१७६६) नंतर तिचा मुलगा मालेराव हा अज्ञान असल्यामुळे तिच्याकडे राज्यकारभाराचा भार आला. त्याचाही वेडाच्या झटक्यात मृत्यू होऊन तिच्याकडे राज्याची सर्व सूत्रे आली. दत्तक घेण्यास तिने नकार दिला. महादजी शिंदे व पेशवे यांच्या सहानुभूतीने तिने राज्यकारभाराचे धोरण आखले. तिच्या सेनेचे अधिपत्य तुकोजीराव होळकरांकडे होते. त्यास पेशव्यांकडून मान्यता मिळाली. पुणे, हैदराबाद, नागपूर, श्रीरंगपट्टण, लखनौ वगैरे ठिकाणी तिने विश्वासू वकील ठेवले. तिचा अंतस्थ कारभार अतिशय सुव्यवस्थित होता. ती प्रजाहिततत्पर होती. १७८८ साली झालेले चंद्रावतांचे बंड तिने मोडले. भिल्लांशी तिने स्नेहपूर्ण संबंध ठेवला होता.

औदार्य, न्यायप्रियता, भूतदया इत्यादी गुणांसाठी ती प्रसिद्ध होती. खाजगी पैसा सरकारी कामासाठी खर्च करून, उरलेला लोकोपयोगी सार्वजनिक उपयोगाच्या कामांसाठी व ठिकठिकाणी धर्मशाळा, विहिरी, घाट व रस्ते, अन्नछत्रे, मंदिरांचे जीर्णोद्धार इत्यादी कार्यात तिने खर्च केला. दानशूर म्हणून तिची सर्वत्र कीर्ती झाली. १७९५ साली ती मृत्यु पावली.

पेंढाऱ्यांची फौज सरकारचाकरीत ठेवण्याचा धोका अहिल्याबाई होळकर प्रस्तुत पत्राने पंतप्रधानांच्या नजरेस आणीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १२८-१३३ पहावीत]



(५३) **तुकोजी होळकर** (जन्म : १७२७; मृत्यु : १५-८-१७९७)

हे जानोजी होळकरांचे पुत्र. अहिल्याबाईमुळे होळकरशाहीचा स्वतंत्र कारभार याना पहाता आला नाही. सन १७६९ पासून महादजी शिंद्यांबरोबर पाच वर्षे हे दिल्लीकडे होते. सन १७७४ त दक्षिणेत आले. ते राघोबादादांचे पक्षपाती होते. सन १७७८ व १७८० त ते महादजी शिंद्यांबरोबर इंग्रजांशी लढले. १७८१ च्या बोरघाटात इंग्रजांशी झालेल्या लढाईत सैन्याचे अधिपत्य हरिपंत फडके याजकडे होते. सन १७८६ मधील टिपूवरील लढाईत यांनी चांगला पराक्रम केला. सन १७९२ साली यांची व शिंद्यांची कोटघाचे उत्तरेस लाखेरीवर मोठी लढाई होऊन यांची हार झाली. हे खर्ड्याच्या लढाईत हजर होते. १५ ऑगस्ट १७९७ रोजी पुणे येथे ते वारले.

महाराष्ट्रात असलेल्या महालखेड्यांचा बंदोबस्त केशव गणेश कुटे यांजकडे द्यावा असे तुकोजी होळकर हरिपंत फडक्यांस प्रस्तुत पत्रात लिहीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १३४-१३७ पहावीत]

(५४) **त्रिंबकजी डेंगळे** (मृत्यु : १६-१०-१८२९)

हे प्रथम दुसऱ्या बाजीरावाच्या पदरी खिजमतगार म्हणून होते. पुढे त्यास पेशव्यांच्या खास तैनातीतील जागा मिळाली. ते कट्टर इंग्रजद्वेष्टे होत. इंग्रजांपासून मराठी राज्य वाचविण्यासाठी त्यानी बरीच धडपड केली.

ते मूळ संगमनेर तालुक्यात निंबगावजाळी येथे राहाणारे. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे ते विश्वासू बनले. तोफखान्यावरील सरदार पानसे यांची जहागीर जप्त करून त्यांच्या जागेवर पेशव्यानी त्रिंबकजींची नेमणूक केली. पुढे त्यास सदाशिव माणकेश्वरांच्या जागी मुख्य कारभारी म्हणून नेमले. फौज जमवून इंग्रजांशी हात करण्याचा उद्योग त्यानी आरंभिल्यामुळे इंग्रजांना त्यांचा धाक होता.

१८१४ साली त्यानी गुजराथेत सरकारी फौज पाठवून गायकवाडांकडे इजाऱ्याने असलेले प्रांत ताब्यात घेतले. गायकवाडांकडून गंगाधर शास्त्र्यांचे शिष्टाईकरिता आगमन झाले असता पंढरपूर येथे शास्त्र्यांचा खून झाला. त्रिंबकजीवर इंग्रजांनी त्या खुनाचा आरोप ठेवला व पेशव्यांकडे त्याना आपल्या स्वाधीन करण्याचा लकडा लावला. बाजीरावाने प्रथम वसंतगड येथे त्रिंबकजीस कैदेत ठेवले. पुढे इंग्रजांच्या स्वाधीन केले (२५ सप्टेंबर १८१५). ते ठाण्याच्या तुरुंगातून पळाले (१२ सप्टेंबर १८१६) व पुनः फौज जमवून त्यानी इंग्रजांविरुद्ध दंगा आरंभिला. इंग्रजांनी त्यास पकडण्याची खूप खटपट केली. बक्षिसे जाहीर केली. त्यास कोणी मदत करू नये म्हणून बाजीरावाकडून जाहीरनामा काढविला. त्रिंबकजी गुप्तपणे खानदेशातील अहिरगाव येथे राहिले. पण फितुरीमुळे शेवटी पकडले गेले. चुनार किल्ल्यात त्याना टेवटपर्यंत ठेवले. तेथेच १६ ऑक्टोबर १८२९ रोजी ते मृत्यू पावले.

प्रस्तुत पत्रात त्रिंबकजी डेंगळे हे 'तगादा करून ऐवज वसुलात आणावा' असे सदाशिव भिकाजी यास कळवीत आहेत.

[पत्रासाठी पृष्ठे १३८-१४५ पहावीत]



L. 2602—7a


शिवचरित्र-साहित्य खंड १, लेखांक ४० | क्र. १ | कार्तिक वद्य ३० शके १५७५ (१० नोव्हेंबर इ. १६५३)

(फारशी अष्टकोनी शिक्का)

अज रखतखाने माहाराज राजेश्री शाहाजी राजे दाईम दौलतहु बजानेब कारकुनानी [हाल व इस्तक] बाल व देसमुखानी पा पुणे बिदानद सुा अरबा खमसेन अलफ रामसेटी सेठ पेठ बाजार मौजे चन्होली पा मजकूर हुजूर येउनु मालुम केले जे [पेठ मज]कुरी पेसजी बाजार मामूर होता तो बहुत दिवस मोडला आहे [या. .आपणा]स साहेबी हाती धरून बाजाराची व पेठ मजकूरची मामुरी...... फर्माविली यावरी बाजारास व पेठेस बारा सालचा कौल मन्हामती केला मग माहाली आपण कसबे पुणियात जाउनु मामुरीस माहाजन व बिढवे पाहिजे म्हणोनु बिनायक भट ठकार याच्या घरास जाउनु त्याच्या गला पडोन [त्यांस बो]*

*[   ] या कंसातील मजकूर संपादकांनी सुचविला आहे.









Maharashtra State Archives

लिलो जे पेठ मजकुरीचे बिडवंपणा तुम्ही मिरासी करून घेणे आपण आ पलिया संतोशे तुम्हास देतो पहिला कोण्ही मिरासी बिडवं ना[ही अंसे] बालिलो यावरी तेही कबूल केले म्हणो लागले जे तुवा आपणा [बिड] वंपण देतोस तरी तु काही मुकासी नव्हेस अंसे बोलतोस तंसेच माहा[राज] साहेबाचे खुर्दखत करून देणे व माहाली महजर करून देणे यंसे बोलिले इतकेंहि आपण कबूल केले आणि त्यांस माहाली आपण बिडवंपण दिधले यावरी [पेठ] मजकुरी आपणा बराबरी कस्ट मशाखती करून पेठेची जुजबी जुजबी मामुरीहि केली व पेस्तरही करितील तरी साहेबी मनास आणौन बिड[वंपण वि] नायक भट ठकार यासच दिल्हे पाहिजे दरम्यान साहेबी पेठ मजकुरीचे बिडवं[प] ण रेणकोजी देवकर यास दिल्हे आहे तरी भट मजकुरावरीच साहेबी मेहरबान होउनु रेणकोजीने बिडवंपणाची सनद करून घेतली आहे ते रद करून वि[नाय] क भटास मन्हामती करून खुर्दखत दिधलीया पेठेची व बाजाराची मामु री होईल म्हणौनु रामसेटी मजकूरे हुजूर अर्ज केला बराय मालुमाती [खा] तिरेसी आणौनु वेदमूर्ती राजश्री विनायक भट ठकार सो कसबे [पुणे] यावरी साहेब मेहरबान होउनु मौजे चन्हालीचे पेठेचे बिडवंपण मि[रा] सी करून दीधली असे याचे हाते पेठ मजकुरीचे बिडवंपणाचे [काम] घेत जाणे आणि भट मजकूराचे नावे ठाणाहून महजरहि करून देणे उजूर न करणे दरम्यान रेणकोजीने आपले नावे बिडवंपणाची सनद [घे] तली आहे ते रद असे विनायकभटाचेच हाते बिडवंपणाचे [काम घेत] जाणे यास जो कोण्ही इस्कील करील त्यास ताकीद करणे तालीक लेहोनु घेऊ[न] असेली खुर्दखत विनायक भट ठकार या पासी परतोन देणे मोर्तब

तेरीख २९ | माहे जिल्हेज
जिल्हेज | र मुर्‍ सूव
रा बार







शिवचरित्र साहित्य
खंड १२, लेखांक ८६

क्र. २

मार्गशीर्ष वद्य १ शके १५९८
११ डिसेंबर इ. १६७६

श्री


अष्टकोनी मुद्रा

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ।। शाहसु
नो: शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३ नल संवत्सर मार्गसीर्ष वदि प्रतिपदा इंदु वासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी रुद्रपा नाईक देसाई पा मुरगूड यांसी आज्ञा केली ऐसी जे तुमचा मुतालीक चेनपा हुजूर आहे त्याणे सांगितले की रुद्रपा स्वामीचे कामावरी येखियार होऊन भुजबलगडीचे कामाबदल बडऊपर व मोपवरावरी नागणगौडा पाठविले होते त्यास वाटेस तोरगलकरांनी जिवे मारिले त्याकरिता हिलगिरी धरिली की साहेबकामास अंतर पडिले म्हणून तरी तुम्ही

श्री शिवचरणी तत्पर त्र्यंबक सुत मोरेश्वर







L 2602—4

काही फिकीर न करणे स्वामीचे सेवेस येक्षियार आले आहा साहेब काम उदं
ड कराल ऐसे स्वामी समजले असेती बहूत कांहीं काम तुमच्या हाते घेऊ
न तुम्हास सर्फराज करून ऐसा दिलासा असो देणे साल मजकूर सन सबा स
बैना कारण स्वामी तुमचे परगणियाचा काही खंडणी अगर पैका घेत नाही
तुम्हास माफ केले असे तुम्ही साहेबांचे तर्फेने कुली रुजुवातीने वर्तणूक क
रून गनिमाचे लोकांस गोशमाल देत जाणे का कडकोली गनिमाचे ठाणे आ
हे तेही उठऊनू तेथे आपले ठाणे बैसे ते करणे व वरकडही जागाजागांची ठा
णी गनिमाची उठऊनू देणे स्वामीही तुमची हर बाब मदत करितील
तुम्ही साहेबकाम चालवीत जाणे भुजबलगडीची बहुत काही मदत हर
येक बाबेने करून आपले चाकरीचा व रुजूवातीचा व येक्षियारीचा मजु
रा करून दाखवणे की स्वामी तुम्हावरी पुढेही मेहरबानी करीत ते करणे

[१] लेखन सीमा     मर्या<br>देयं विरा<br>जते

चंद्र . . .     मास मार्गसीर्ष


मार्गसीर्ष

सुरु सूद बार

---

[१] 'लेखन सीमा' ही अक्षरे शिवछत्रपतींची.









Maharashtra State Archives

शिवचरित्र साहित्य खंड १२, लेखांक ८७

क्र. ३

वैशाख वद्य ४ शके १६०२
७ मे इ. १६८०

श्री


श्री शंभोः
शिव जातस्य मुद्राद्यौ
रिव राजते यदं
कसेविनी लेखा
वर्तते कस्य नो
परि

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६ रौद्रनाम संवत्सरे वैशाख बहुल चतुर्थी भृगुवासरे क्षत्रियें कुलावतंस श्रीराजा शंभू छत्रपति याणी

रुद्रापा देसाई प्रा मुरगोड यासि

दिल्हें अभयेपत्र ऐसें जे तुमचे विषई देवजी श्रीखंडे हवालदार इा कटोरगड यांणी स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र लिहिलें की रुद्रापा देसाई आपले विलातीचे फुडील सालाचे खंडणीचा






तहरह होणे आहे त्यानिमित्य मुतालीक स्वामी
चे सेवेसी पाठवणार आहेत तरी स्वामीन ये
क अभयपत्र देशाई यांस पाठविलियां उमे
दवार होऊन स्वामीकार्यी तत्पर राहातील म्हणू [न]
सविस्तर लिहिलें त्यावरून स्वामी तुम्हावरी कृपा
ळू होऊन अभयेपत्र दिल्हें असे तुम्ही आपला
मुतालीक स्वामीसन्निध पाठवणे अंतःकर्णा
स आणून स्वामी जेणेप्रमाणे राजश्री कैलाश
वासी स्वामीने खंडणी बांधोन विल्हे केली आहे तेणे
प्रमाणेच करितील येविषई तुम्ही आपलें स
माधान असों देणे आणि स्वामी सेवेसी तत्पर
असोन वर्तणूक करीत जाणें येविषई अभये

असे १लेखनालंकार मर्या देयं विरा जते

सुरु सूद

१ 'लेखनालंकार' ही अक्षरे छत्रपती संभाजी यांच्या हातची.







Maharashtra State Archives

शिवचरित्र-साहित्य
खंड ३, लेखांक ४७९

क्र. ४

आषाढ शुद्ध १५ शके १६१८
४ जुलै इ. १६९६

श्री


महादेव

राजश्री सवाई सदाशिव नाईक
सोंधे गोसावी यांसी

११८

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजाराम छत्रपति उपरि तुम्ही मा बायाजी विठल व रायाची रखमांगद यांसमागमें पत्र पाठविलें होतें तें पाऊन लिहिला अभिप्राव व उभयेतानी कितेक स्नेहाचे प्रसंग मुखवचनी सांगितल्यावरून त्यासारिखें अंत:कर्णास आणून त्याचे उतर उभयेता मशारनिल्हेस सांगून त्यां हा










Maharashtra State Archives

ती तुम्हास लिहिविलें व आम्ही आपलें उतरहि पाठविलें येंसें उभयेपक्षीं उतर प्रतिउतर पाठवीत असतां मग तुम्ही आपणाकडील भलें मनुश रा कोनेरपंत यांचे विद्यरत रा मध्वाजी रखमांगद यांसमागमें निर्वाहपूर्वक सांगून पाठविल तेंही राजश्री शंकराजी पंडीत सुमंत व राजश्री निलोकृस्ण यांचे गुजारतीने विदित केलें कीं उभयेपक्षीं पूर्वापर स्नेह सारोधार चालोन आला आहे व पुढेंही उत्तरोतर चालावा येंसीयासी पंजमाहाल देश दुर्गादि आपणांस मोकरर करून पारंपरा चालावें येंसें निर्वाह करून भाषापत्र द्यावें यासी देऊं करार केलें मख्ता होन प्रलयेघटी २२२०० बावीस हजार दोनसें नेम करून लिहून पाठविलें यावरी यासी मान्य करून सदरहू पंजमहाल देशदुर्ग तुम्हास आम्ही आपुले मनःपूर्वक भाव संवत्सरी मोकरर करून दिल्हे बीा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ता आंकोले देहायेदेखील कोट व मंहेडगड | १ | ता कडवाड देहायेदेखील कोट | १ | ता सिवेश्वर देहायदेखील कोट | १ |
| ता कदरें देहायेदेखील कोट व मधुरगड | १ | ता आडवट देहायेदेखील | १ | ता खोलगडदेखील लोक गांव | १ |
| सिदीगड | १ | लग | ० | लग | ० |

येकून माहाल ५ पांच व कोट ४ च्यार व गड ४ च्यार यासी मख्त होन प्रलय घटी बावीस हजार दोनसे घेऊन तुम्हास सदरहू माहाल ५ व कोट ४ व गड ४ दिल्ही आहत तुम्ही आपले वौशपारंपरेनें अनुभऊन सुखरूप असणे तुमचे देश विलायत सोंधे देहाये देखील हुडवा वगैरे मुलूक तालुका बंकापूर व आम्ही क्रियापूर्वक दिल्हे मा







L 2602—9a

श्री धर्म प्र
द्योतितशेष
वर्णा दाशरथेरिव
राजा रामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते ।।


हाल पांच व कोट च्यार व गड च्यार येसें तुमचे असे सदरहू विलायेतीस आम्हांकडून उपसर्ग होऊ देणार नाही यासी हरसाल पैके आम्हास देवे तरी हालीं तुम्ही यवनासी देत आहा त्यास भग्न करून मग तेंच द्रव्य आम्ही घेऊन याव्यतिरिक्त तांब्रांचे कबजातील राज्य तुम्ही बांधून घेणे त्यासी हरसाल तुम्ही काये द्रव्य देणे करार कराल तेच आम्ही आपुले साम राज्य वैभोगादि तें द्रव्य तुम्हापासून घेणारास भग्न करून तेच प्रा हरसाल द्रव्य आपण सालेंसाल घेऊं तेही मुलूक तुम्हासच चालऊन देऊं शत्रूचा उपसर्ग तुम्हास जालियाने त्याविशईं आपली फौज पाठऊन उपराला करून स्नेहासी कधीं अंतर पडणार नाही क्रियापूर्वक लिल्हीया वचनासी या लिहिलेमधे कांही अंतराये पडेल तरी आम्हास आपले श्री        ची आण असे अंत:कर्णपूर्वक या प्रसंगासी श्रीचा बेल व कलेची माल व रोटी काढून पाठविलें आहे तें घेऊन तुम्हीही याच प्रा स्नेह चालऊन दिवसेंदिवस अभिवृधी करणे [1]बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

पौ घाता सं आषाढ शुा १५

[1] 'बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा' ही अक्षरे छत्रपती राजाराम यांच्या हातची.






शिवचरित्र-साहित्य खंड ४, लेखांक ७२६ | क्र. ५ | श. इ.

(पाठीवर राजारामाचा गोल शिक्का)

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजा राम छत्रपति उपरि तुम्हीं या देवांब्राम्हणाच्या राज्याची अभिवृधी करावी आपला नामोश करून घ्याव या गोष्टी ची उमेद धरिली आहे म्हणऊन कितेक वर्तमान रा शामजी चिंतामणी यानी विदित केले त्यावरून बहुत संतोश वाटला याहून उतम काये आहे हें राज्य तुम्हा लोकांचे आहे भागानगर प्रांतीचा राज्या धिपत्यांचा कार्यभाग राजश्री प्रल्हाद पंडित प्रतिनिधी याचे स्वाधीन करून त्या प्रांतास रा आनंद गंभीरराऊ सरसुभेदार यांस नामजाद पाठविले आहे येसियास तुम्ही कोणे गोष्टीविसी शंका न धरिता





Maharashtra State Archives


श्री धर्मप्र
द्योतितशोभेव
श्री राजारामेरिव ।
राजा रामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते

यास सामील होऊन कार्यसिधी करणे आगर जमावसहित येथें आलिया तुमचे अतिशयसी ऊर्जित होईल यामधें तुम्हांस आनकूल ते गोष्टी करणे तुम्हीं आमच्या राज्यामधे आलिया नंतर तुम्हांस हल्कहजारी दौलत द्यावयाचा निर्वाहा केला आहे तुमचे गोमटे करून चालवायाचेबिसी सहसा आतराये होणार नाही येबिसीं आपलें समाधान आसो दीजे कितेक वर्तमान रा शामजी चितामणी सांगतील त्याप्रा भरोसा आसो देणे †बहुत लिहिणे तरी सुदन असा

मर्या
देयं विरा
[जते]

† 'बहुत लिहिणे तरी सुदन असा' ही अक्षरे छत्रपती राजाराम यांच्या हातची.





डेक्कन कॉलेज संग्रह
क्र. ५

क्र. ६


माघ व. १३ शके १६३७
१० फेब्रु. इ. १७१६

श्री

श्रीमत् क्षत्रीये कुलावतंस माहारा
ज राजश्री छत्रपति स्वामीच सेवेसी

विनंती सेवक बाळाजी विश्वनाथ प्रधान कृतानेक वि
ज्ञापना सेवकाचे वर्तमान ता छ २६ सफर मुक्काम
मौजे सती सवदी येथास्थित असे विनंती स्वामी
चे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की भोजजी
पाटील आकलखोपकर हुजूर रुजू आहे त्यास कैदेंत
ठेवावासें नाहीं म्हणून सोडून देणें ऐसी आज्ञा
केली तरी येसाजी थोरात बिठोजी चव्हाण भोजजी
पाटील संताजी सुर्यवंसी हे येकच आहेत जि
तकी स्वारी येसाजी बिठोजी करीत त्यास हे दोघे







Maharashtra State Archives

सामील होत म्हणून दाये मुदये खरें जालें तेही आ
पले तोंडे कबूल जालें कडपूरचा पाटील आष्टीम
ध्यें होता त्याणी याचें आंगी लाविले भिलवडी
चे ठाणें संताजीचे हवाला होते तेथे सिदोजी
थोरात याची बाइको सांपडली पनालकर सर्नोब
ताची घोडी सांपडली यैसी हरामखोरी त्यांजकडे
खरीखुरी जाली म्हणून कैद करून खंड केला आहे
त्याचा निगम त्याणी करून दिल्हिया सोडून देऊ
× × पण रुजू होता म्हणून आज्ञा केली तरी संताजी भो
जजी दोघेही येकच प्रती यैसी लबाडी केली यावरी
हरामखोराचा मुलाहिजा करावासा नाही सेवे
सी विदित व्हावे म्हणून लिहिले असे येसाजीचा
ठेवा व कृष्णाजी थोरात त्याचे गावांत भोजजी
ने कतबाच लहून दिल्हा आहे आम्ही कोणाचे बोले करि
तोसे नाही सेवेसी विदित जाले पाहिजे सेवेसी


श्रुत होये विज्ञापना †

श्री
राजा शाहू न
रपती हर्षनीधा
न बाळाजी विश्व
नाथ मुख्य प्र
धान

× × फाटलेले.

† सर्व पत्र बाळाजी विश्वनाथाच्या हस्ताक्षरात.







Maharashtra State Archives

संशोधनासाठी
निवडलेले कागद
रुमाल क्र. ४८

क्र. ७


पौष शु. ३ शके १६४३
१० डिसेंबर इ. १७२१

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राज
श्री रामचंद्र माहादेऊ स्वामी गोसा
वी यांसी

पोष्य बाजीराऊ बलाल प्रधान नमस्कार उपरि येथी
ल कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष
बालाजी माहादेऊ फडनीस बराबरी स्वारी तीर्थरूप कैला
सवासी पंत हे दिलीस स्वारी कैलासवासी पंत यांची







Maharashtra State Archives

जाहाली ते समई समागमें होते तेथे युध्य जाहाले तेव्हा स्वामी कार्यावरी चीज जाहाले व पहिले कष्ट मेहनत केली म्हणोन राजश्री स्वामी कृपाळू होऊन त्याचे बंधु रामाजी माहादेऊ व पुत्र जनार्दन बलाल यांस मौजे बालोसे ता नाणेमावल हा गांव स्वराज्यातून व मोगलाई देखील इनाम तिजाई कुलबाब कुलकानू जलतरु निधिनिक्षेप त्रृण काष्ट पाशाण खेरीज हकदार इनाम करून देऊन इनामपत्रे सादर केली आहेत तरी तुम्हीं मौजे मजकूर स्वराज्यातून व मोगलाई देखील इनाम तिजाई कुलबाब कुलकानू खेरीज हकदार मारनिलेस इनाम चालऊन वसूल सुरलित पावे ते गोष्ट करणें प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवणियास मारनिलेजवल परतोन देणें जाणिजे छ १ रबीलोवल * सुरा इसने अशरैन मया व अलफ


† बहुत काय लिहिणे लेखन सीमा

---

* सिराळी अक्षर.

† येथून पुढे बाळाजीचे हस्ताक्षर.





पेशवे दप्तरातील
संशोधनासाठी
निवडलेले कागद
रुमाल क्र. ५६

क्र. ८

शके १६५१–५२ ते १६६१–६२
इ. १७३०–४०


श्री

राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांसी आज्ञा केली
ऐसीजे सरकारचे कोठीचे बैल सर ४०० ब्यारसे बाव
सेटी दरुजा व मलसेट बेलपत्रा कोठीवाले व कारकून अ
लाहिदा दस्तकांप्रमाणे हर येक जागा हर जिन [स] भरून अम
दरफ्ती करितील तरी तुम्ही आपणाकडील अमलदारांस ता
कीद करून मुजाहिम न होत सर साल पावेतो जकातीचा तगा
दा न लागे तै गोष्टी करणे व पेणेचे बंदरी शंभर बैलांस मीठ
साडे बारा खंडी द्यावयाचा सिरस्ता आहे त्यास साल गुदस्ता
वासुदेव हरि यांणी इस्किल करून दाहा खंडी प्रो॥ मीठ देवि
ले तरी पेसजी सिरस्त्यास अंतर करावें हें उत्तम नाहीं या उपरि त्या
स ताकीद करून दर सदे साडे बारा खंडीप्रमाणें मीठ देवणे
¹सुदन असा

¹ 'सुदन असा' हे शब्द छत्रपतींच्या हातचे.



Maharashtra State Archives





L. 2602—11a

डेक्कन कॉलेज संग्रह | क्र. ९ | शके १६५२–५३ ? इ. १७३१ ?


श्री

राजश्री साबाजी नाईक नि
बालकर गोसांवी यांसी

॥ॐ

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति
राजश्री राजा शंभु छत्रपति उपरि चिरंजीव राज
श्री दुर्गोजी राजे माहाडिक यांसी कितेक स्वांमी
कार्याची आज्ञा करून त्या प्रांते पाठविले आहेत आ
ज्ञेनुरूप स्वांमी कार्याचा अंगेज करून साहित्यवि






थंई तुम्हांस लिहितील व सांगतील त्याप्रमाणे सर्व प्रकारे अनकूल होऊन स्वामी कार्य सिधीस जाये स्वामी तुम्हां वरी संतोषी होत तें करणें †आणिजे बहुत

काय लिहिणें मर्यादेयं विराजते

श्री
प्रतिपच्चंद्र रेखे
व वर्धिष्णुर्विश्व वं
दिता शंभु छत्रप
तेर्मुद्रा राजसूनो
विराजते

† 'आणिजे बहुत काय लिहिणें' ही अक्षरे छत्रपती संभाजी कोल्हापूरकर यांच्या हातची.





पेशवे दप्तर पुणे
चिटणिशी दप्तर
रुमाल क्र. ९

क्र. १०


पौष व. ५ शके १६५२ ?
१७ जानेवारी इ. १७३१ ?
मार्ग व. ७ शके १६५५ ?
१६ डिसेंबर इ. १७३३ ?

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधा
न गोसांवी यांसी

॥ सकलगुणालंकर्ण अखंडित लक्ष्मी अलं
कृत राजमान्य स्नो फतेसिंग भोसले
दंडवत विनंती उपरि येथील कुशल जा
णून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष आ
पण पत्र व घडियाल पाठविलें पावोन
लिहिला अर्थ कळों आला कोरेगार गावास





L 2602—12




Maharashtra State Archives

गेला आहे म्हणून लिहिलें येंसीयास कारे
गाराचे जरूर प्रयोजन आहे आला असि
ला तरी आणिक येक दोनी घडियाले दुरु
स्त करऊन त्यास आज्ञा दिल्ही जाईल
या घडियाळाची कल कैसी फिरवावी
आधी कोणती मग कोणती तीही कला
ऊन कोणें कलेवरी प्रारंभ हे लिहिले पा
हिजे आपण पुणियाहून कूच करून
गेले किंवा कोणे दिवसी जाणार हे साकल्य
वृत लिहिलें पाहिजे पुढेही वरचेवरी
पत्री वर्तमान लिहीत आसिले पा
हिजे छ १९ रजब बहुत काये लिहिणे
लोभ आसों दीजे †हरघडी पत्रे पा
ठवीत जावे लोभ आसो दीजे हे
विनंती

† येथून पुढे कर्नेलिस भोसले यांचे हस्ताक्षर.







L/2602—12a

Maharashtra State Archives

पेशवे दप्तर, पुणे
संकीर्ण चिटणिसी दप्तर
रुमाल नं. ६

क्र. ११


चैत्र-वैशाख शके १६५५
एप्रिल इ. १७३३

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी


॥ श्री सकलगुणालंकरण अखंडित ल
क्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेो पि
लाजी जाधवराऊ दंडवत विनंती येथी
ल क्षेम जाणून स्वकीये कुशल ले
खनाज्ञा करीत आसिले पाहिजे विशे




श्री
राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी
॥ श्री सकलगुणालंकरण अखंडित
लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेो
पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती येथी
ल क्षेम जाणून स्वकीये कुशल
लेखनाज्ञा करीत आसिले पाहिजे विशे

ष आपण पत्र पाठविले पावोन वर्तमा
न कळो आले माहडच्या उपराल्लि
यास राऊत पाठविले आहेत ते पावले
याउपर माहडास धोका नाही मंद
वारी स्वार होऊन गेलो म्हणून राजश्री
स्वामीस लिहिले आहे याजकरिता
डेरा मात्र बाहेर द्यावा म्हणून लिा
उतम आहे बुधवारीही मुहू
र्त उतम आहे तो दो चौ दिवसी
तिकडीलही वर्तमान येईल तरी
उदंक पर्वतीवरील बोढियावर
डेरा देववावा मग तिकडील वर्त
मानासारखे बुधवारी डेरियास
योवे ऐसे आमचेही विचारे आहे मं
डणगडासही शामलाचे लोक
दाणिया गल्लियासाठी आले आसतील
तेहि राऊत पावलियावर उठोन आ
तील सारांश राजश्रीस मंदवारी
स्वार होऊन जातो म्हणून लिा आहे








Maharashtra State Archives

याजकरिता मंदवारी डेरा पर्वती
च्या वाडियावर द्यावा म्हणजे पर
स्परे त्यांस वर्तमान जाईल की डेरे बा
हर गेले राजश्री लक्ष्मण रघुनाथ
यास उर्बक आपणाकडे पाठवितो
ते आपणाकडील वर्तमान आसुदा
समागम लेहून पाठवितील विशे
ष काये लिहिणे कृपा केली पाहिजे
हे विनंती †विन

† शिवाजी जाधवाचे हस्ताक्षर.







L. 2602—13

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, भाग २७, लेखांक २३८

क्र. १२


पौष व. ७ शके १६५८
१२ जानेवारी इ. १७३६

श्री

राजश्री पंत प्रधान गो
सावी यांसि

श्रीमंत सकल गुणालंकरण
अखंडित लक्ष्मी अलंकृत राज
मान्य स्नेहांकित सटवोजी
जाधव कृतानेक दडवत विनती ये










Maharashtra State Archives

थील क्षेम ताा छ २१ रमजान मुाा
अकेरी प्रांत भदावर येथास्थि
जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा
केली पाहिजे विशेष स्वामीकडू
न पत्रे येऊन कुशल वृत कलो
येत नाही तरी सदैव आपणाकडी
ल वृत लेहून पाठवीत आसिले पा
हिजे आम्हाकडील दोन तीन पत्रें
तपसीलवार वर्तमान लेहून पा
ठविली ती प्रविष्ट होऊन शवेसी
श्रुत जाहाले आसेल सांप्रत आम्ही
सैन्यसहवर्तमान भदावरचे सरदे
स आलो संस्थानिकाकडून मातबर
आले बहुत स्नेहभावाचा आर्थ
सांगोन पाठविला की आम्ही आ
पल्यासी तीन वर्षे स्नेह संपादी








Maharashtra State Archives

ला आहे गतवर्षी ताम्राच्या सै न्यातून द्रव्य रेवातिरी प्रविष्ट केले साल मजकुरी पर्जन्याची आतिवृष्टी जाहाली गुदस्ताप्रा मामला करावा त्यास गुदस्ता च घ्यावा येसा आर्थ कार्य आहे जेथ वरी दबाव देऊन कस्त करावया ची ते करून कांही आधिकोतर करून विल्हे लाविले पैका आणाव यासी गेले आहेत सत्वरच येऊन पा वतील याउपरी आम्ही सेवा चे मह बुंधेलियाची व भदावर चे सरदेस जाऊन राहतो बुंधे लियाकडील दिवाण व गोविंद






Maharashtra State Archives

बलाल याचे आगमन जाहालियानंतर
जो विचार करणे तो करून स्वामी
चे पुण्यप्रादुर्भाविकडून यो
जिला मनसबा सिधीस पावेल
तीन मास दिवस आहेत मुलू
क कौली अगदी पोट भरावया
सी जागा येमुनावर नाही स्वा
मीकडे पत्रे गेली आहेत त्याच्या उ
तराची प्रतीक्षा करितो आज्ञा ये
ईल त्याप्रों वर्तणूक करून
सविस्तर आर्थ राजश्री भिवराऊ
यानी लिा आहे त्यावरून श्रुत होई

*ल विशेष काये लिहि
णे कृपा केली पा
हिजे
†हू विनती

* डावीकडील आडव्या ओळीतील मजकूर.
† 'हू विनती' ही अक्षरे सटवोजी जाधव यांचे हातची.







L. 2602—14

पेशवे दप्तरातून
निवडलेले
कागद, भाग २६,
लेखांक २१९

## क्र. १३

श्रावण-भाद्रपद शके १६६०?
ऑगस्ट इ. १७३८?


श्री व्यंकटेश

पौ छ २ जमादिलाखर

सकलगुणालंकरण अखंडित ल
क्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
पंत प्रधान स्वामी गोसावी यांसी

पोष्य व्यंकटराऊ नारायेण कृतानेक साष्टांग न
मस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वा
नंद अभ्युदयोचित प्रमोदवित असिलें पाहिजे
यानंतर आपला निरोप घेऊन स्वार जालो ते नाद








Maharashtra State Archives

णीस येऊन दाखल जालों येथील प्रसंग पूर्वी वार्तिका समागमे पत्री पेशजी लिहीलाच आहे त्यावरून अवगत जालाच आसेल स्वामीनी जमावा ची आज्ञा केली त्यास या प्रांतातील नामां कित लोक च्यार पदरी असावे समयोचित कामकाज पडलियास नग राहेत ऐसे पाहून ठेविले आहेत याउपरि स्वामी आज्ञा करिती तील ते समई स्वार होऊन येऊं आपण सातारी याहून गेलियादारभ्य तिकडील वर्तमान कांही कळले नाहीं तरी सविस्तर लिहावया अज्ञा केली पा हिजे राजश्री उदाजी चवाण अथणीस आहेत त्यां चे समजाविसीबदल राजश्री मंत्री व रा येमाजी सिवदेऊ व बालोजी ढुबल ऐसें राजश्रींनी पा ठविले आहेत त्याचे समजाविसीचा प्रसंग कै सा होऊन येतो तो पाहावा चिकुडीकरही राज श्री उदाजी चवाणाजवळी आहेत त्यास ऐकतों जे चिकुडीकराची व यांची आणभाष जाली आ






हू कीं आम्हांकडील ठाणींठुणी आहत यास उपसर्ग करावा साधल्यास ठाणेंहि घ्यावें अंसो यास आम्हीं तों जे रीतीने मजबुदी ठाणीयांची करावी ते केलीच आहे आपणासहि श्रुत असावे याजकरितां लिहिलें आहे काटक संधि पाहून आपल्या काबूस न चुकें आपला व चवाणाचा स्नेह त्यास गतवर्षी आम्हास स्वामीने आज्ञा केलीयानरूप हा कालवरी चालिलोच आहो अंतर न केले ऐसें आसतां काटकाचा अभिमान धरून सतत बादविली तरी श्री समर्थ आहे आपण पुढें शद्व लावितील याजकरितां श्रुत व्हावें म्हणोन लिहिले असे लस्कराची रवानगी कधी होणार आम्ही कधी यावे हे लिहिले पाहिजे †बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनती छ

† येथून पुढे व्यंकटराव नारायण घोरपडे यांचे हस्ताक्षर.







Maharashtra State Archives

पेशवे दप्तर
संकीर्ण चिटणीशी
रुमाल क्र. ९

क्र. १४


पौष शु. १५ शके १६६१?
२ जाने. इ. १७४० ?

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चि-
मणाजी बल्लाल आसिर्वाद उपरि
येथील कुशल ता छ १३ सवा
ल बुधवार मुकाम नजीक बोथेगा
व प्रा सेवगाव येथास्थित असे वि



Maharashtra State Archives






L 2602—13

शेष बालाजी चितामणीचे पुत्र व
नारो बाबाजी यास माघारे पाठवावे म्हणू
न लिहिले त्यास आज तीन रोज जाले त्या
स निरोप दिल्हा ते आपलाल्या ठिका
णास पावले असतील बेठे वगैरे फ
र्मास त्याकडून आणवणे ते आणविली पा
हिजे पुण्याचे कुंभार व केसो × × ×
देव समागमे होते त्यासही निरोप
दिल्हा काल येथून गेले असेत रा। बापू
जीपंत नानासही निरोप देऊन पाठ
ऊन देऊ शामराऊ तूर्त तेथे आहेतच
दारूच्या कारखान्याविसी लिहिले
यैसीयास दरमाहे तीनसे रुपये द्यावे
लागतात ते देऊन कारखाना चालता
करऊन दारू चांगली होये यैसी ताकी


× × × फाटले आहे.





द करणे दारू वाईट करतील ते कार्याची
नाही यास्तव दारू उतम प्रतीची
होये ऐसे करणे दारूचा हिसेब पाहाता
दारू पुण्यात चांगली होत नाही आणि
किमत भारी पडते याकरिता जि
तके कोलसे तयार असतील तित
क्या पुरते मात्र सोरा गंधक
खर्च करऊन दारू करवणे कोलसे खर्च
झाल्यावर येथे कारखाना कार्याचा नाही
सोरा व गंधक असेल तो वसईस शं
कराजी केशव याजकडे रवाना करवणे
तेथेही गंधक पाहिजे तितका आहे
सोरा येथे राहील तो व आणखीही
मेलऊन वरचेवर राकड बैलावर पाठ
वीत जावा म्हणजे पुण्यापेक्षा ते
थे खर्च थोडा पडून दारू चांगली हो








Maharashtra State Archives

ईल वसईच्या कोटात कारखाना सप्र
दाय सुध आहे तेथे सर्व प × ×
हलके पडेसे आहे मजुरीही इतकी
पडणार नाही दारू विकत मिलते म्ह
णून लिहिले येसीयास दारू चौकसी
करून हजार रुपयाची दारू खरि
दी करून ठेवणे माल दाखीवता चोख
ट दाखवितील वरकड दारू वाईट
देतील यास्तव सारा माल पाहून घे
त जावा याप्रमाणे करून हजार रुपया
ची खरीदी करणे हे आसिर्वाद आज
सुलतानजीआपाकडून याद्योपंत
बुरटे येथे आले असेत आम्ही पत्र पा
ठविले नसता सुलतानजीआपानी पा
ठविले असेत कलावे म्हणून लिहिले असे
हे आसिर्वाद

पौ छ २०

संपूर्ण पत्र चिमाजीअप्पांच्या हस्ताक्षरात.





पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, भाग २७, लेखांक ६

क्र. १५


आषाढ व. १० शके १६६५
५ जुलै इ. १७४३?

श्री

राजश्री पंत प्रधान
स्वामी गोसावी यांसी

ई श्रीमंत सकलगुणालंकरण अ
खंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य
स्नो यशवंतराऊ पवार कृता




श्री
राजश्री पंतप्रधान
स्वामीगोसावीयांसि
श्रीमंतसकलगुणालंकरण
अखंडितलक्ष्मीआलंकृतराजमान्य
स्नोयशवंतराऊपवारकृता



L 2602—16

Maharashtra State Archives


नेक दंडवत् विनंती येथील कुशल तां
छ २३ जमादिलावल मुां गातें पाा आगर
प्रांत मालवा स्वामीच्या आसिर्वादें करू
न संतोश असों विशेष स्वामीकडून पत्र
येऊन वर्तमान कलत नाहीं तरी यैसें न करा
वें सर्देव आलिया वार्तिका समागमें पत्र पा
ठऊन सांभाल करीत गेले पाहिजे यानंतर
वेदमूर्ती राजश्री माहादेव भट हस्तनापु
रींहून ज्या कार्यास गेले होतें तें कार्य क
रून परवाने घेऊन आले त्याचें साद्यंत वृ
त राजश्री मल्हारबा व राजश्री राणबा या
णी लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल
† लोभं असो द्यावां हे विन

ती मोर्तब सुद

श्री सांब वर
श्री दृढभाव
सवाजी सुत
आनंदराव
पवारराव

† यशवंतराव पवार यांचे हस्ताक्षर.







L 2602—16a

Maharashtra State Archives

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, भाग ४०, लेखांक ४३


क्र. १६

मार्ग. शु. १० शके १६६८
११ नोव्हेंबर इ. १७४६

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबा ई आसिर्वाद उपरि येथील कुशल ता मार्ग सीर्ष शुध १० मगळवारपावेतो जाणून स्वकीय लेखन करीत जावे विशेष पत्र पाठविले ते आज प्रातःकाली पावोन लेखनार्थ अवगत जाहाला त्याजवरून








Maharashtra State Archives

चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाईकडे बाराम तीस पत्र पाठविले आहे की सातारियांस न जावे म्हणोन वरकड पूणिमा जाहालिया नंतर चिरंजीव उभयतांस व सौभाग्यवती गोपिकेस साता रियास पाठवितो यानंतर उभयता नाईक उ पोशणे करितात अत्याग्रहास प्रवर्तले आ हेत याविसी पूर्वीच पत्र पाठविले आहे वारंवार ल्याहावेसे काये आहे जे गोष्टीने जीव वाचे त तो अर्थ केला पाहिजे बहुत काये लिहिणे † हे आसिर्वाद

† येथून हस्ताक्षर राधाबाईंचे.







Maharashtra State Archives

पेशवे दप्तर घडणी,
रुमाल क्र. ७९०

क्र. १७

शके १६६१-६२ ते १६६३-६४
इ. १७४०-४२

श्री


† श्रीकृष्ण

श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांप्रती

नारायेण दीक्षित अनेक आसिर्वाद उपरि येथील क्षेम ता। कार्तिक वद्य त्रितीया जाणून स्वकीयें कुशळ लेखन करणें विशेष तुम्ही त्या प्रांती आहा तेथील परस्परे कितीक पदार्थे वर्तमान आईकिलें त्यावरून चित बहुत संचित जालें तुम्ही त्या प्रांतास गेलियापासून रात्रींदिवस श्री ची प्रार्थना करितों परंतु श्रीस काये करणें ते

† 'श्रीकृष्ण' ही अक्षरे नारायण दीक्षित यांच्या हातची.




श्री
श्रीकृष्ण
श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांप्रती




L 2602—17

Maharashtra State Archives

Maharashtra State Archives

न कळे तुम्ही तेथून येश संपादून सुखरूप यावें हेंच इछितों वरकड कितीक वर्तमान मुखवचनी चिरंजीव हरभट सांगतील त्यावरून कळेल यानंतर वेदमूर्ती रघुनाथभट पाठक सदाव्रती राक्षसभुवन यांची वरात वर्षासनाची अगत्यरूप पाठवणें







L 2602—17a

पेशवे दप्तरातून
निवडलेले
कागद, भाग २६
लेखांक २३२

क्र. १८


शके १६६९-७० ?
इ. १७४८ ?

श्री

राजश्री सदासिव चिमणाजी पंडि
त यासि

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाईसा हेब उपरि पूर्वसंदर्भाच्या अन्वयानरूप तुम्हांकडे वे दशास्त्रसंपन्न राजश्री दादंभट श्रोत्री यांसमागमे आ ज्ञापत्रें सादर करून कितेक बोलिचालिचा प्रारंभयुक्त सद्ु इतेच्या प्रसंगाची अज्ञा सांगोन पाठविली त्याप्रो चित्ती संभऊन पूर्वसंकळप सिधीस नेऊन प्रमाणिक वचन निद र्शनास साहेबाच्या याचें तदोतर हुजूर संतुस्टता प्राप्त होऊ








Maharashtra State Archives

न मध्यस्ती केली त्या गोस्टीचा फलादेश घडोन यावा यां वि
चाराकरितां विनंती पत्राचा मार्ग लक्षिला अविलंबे कार्य द्रि
स्टीस पडावें लौकिक उतम दिसोन येशास पात्र तुम्हीं व्हा
वें साहेबीं सर्व चिसी येत्तयारी आपणावर टाकावी यैसे कितेक
मनोदये साहेबी कळपून गतवर्षापासून वेदशास्त्रसं
पन्न राजश्री भटजीस लागोपाठ रवाना केले यैसें असता साहे
बांचे प्रत्यास गोस्ट दिसोन न ये तेव्हां साहेब मध्यस्त होऊन
हुजूर वचन गुतविलें त्याचा लौकिक कोणे प्रकारीचा होणार हा
अर्थ चितात आणून तदनरूप याउपरी पूर्व संदर्भाच्या विचा
रानरूप अगेजणी करून *स्वराज्य कर्तव्यार्थ पेसजी बोली जाहा
ली आहे व करारदाज यादी लेहून दिल्या आहेत त्याप्रो निदर्शं
नास साहेबाचे याचे हुजूर विनंती केली आहे ती सत्यता होऊन राज्यउ
पयोगी मनसबा घडे ते करावे यैसे राजश्री बालाजी पंडित प्रधा
न यास तुम्हीं सांगोन त्वरेने करवावे या गोस्टीचे तुम्हास अ
गाध कोणतें आहे सविस्तर वेदशास्त्रसंपन्न राजश्री श्री
श्री याजवल आज्ञा सांगोन पा। आहे व पंडित मारनिले यास आज्ञा
पत्र सादर असे त्याजवरून सार्थंत करेल साहेब मध्यस्त तुम
ची निःस्टा दृढतर हा भरवसा साहेबास हुजूर विनंती करून ति
मी संवस्थानची ताकीदपत्रें घेऊन पाठविली आहेत साहे
बाचा तुमचा करारबाज कोणे प्रकारचा आहे *स्वराज्याविसी
पंडित मारनिले यांचे मांडीचे उसे केले आहे हाही अर्थ ध्या
नात आहे सारांश गोस्ट पूर्वसदर्भाप्रो। हुजूर निदर्शनास
साहेबी आणून द्यावे आणि येशास पात्र तुम्ही व्हावे हा अर्थ चि







Maharashtra State Archives


तात आणावा सकलार्थ तुमचे चिती संभवावा येदनिमित्य राजे श्री बापजी भुजंग यांस आज्ञा करून पाठविले आहेत व राजे श्री पंडित प्रधान यांस आज्ञापत्री लेख केला आहे त्याजवरून सांगोपांग चितात आणून योजिले कार्ये सिध्यत हो ये ते करणे †बहुत लिहीणे तरी सूज्ञ असा

लेख
नावधी
मुद्रा मोर्त
बमूद

बार

† येथून पुढे जिजाबाई (कोल्हापूर) यांचे हस्ताक्षर.









Maharashtra State Archives

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, भाग २५, लेखांक ९९

क्र. १९


शके १६७२–७३ ?
इ. १७५१ ?

श्रीसुबाराजे

राजश्री सदासिवराव गोसां
वी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी
अलंकृत राजमान्य स्नो मुरारजी हि








Maharashtra State Archives

दुराव घोरपडे वजारतमाब वंदवत् विनं
ती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कु
शल लेखन केले पाहिजे विशेष आपण व रा
जश्री पंडित प्रधान याणी व राजश्री केश
वराव यानीं विस्तरे लिहिल्यावरून भावार्थ
कलों आला पूर्वी परस्परें भेटी जाहाली आसतां
कितेक संभाषण जालें त्याचें निदर्शने
घडावें आपण आम्हास बंधू म्हणविले त्या
प्रमाणें आमचा मनोदये सिधीतें पाऊन
राजश्री पंत प्रधान व अपल्या भेटीचा यो
ग घडावा या आर्थे पूर्वी आपण लिहिल्याप्रों।
रायेचूर प्रातें येऊन आपणास पत्रें लेहून








Maharashtra State Archives

पंधरा बीस मोकामे केली आसें आसतां जबाब सालावर घालोन मोगलाकडें आनसंधान लाविलें असें दर्शाविलें त्यावरून बहुत आपूबें वाटलें मोगलास भेटावें आसेंच आसते तर भेटी होऊन कर्तव्य तें जाहालें आसतें जवाबस्वालाचा प्रसंग म्हणावा तर आपण बंधू प्रधानपंत वडील अमच्या मनोदयाप्रमाणें समर्पक करणे आपणास आवश्यक आसतां आम्हीं जबाबसालावर कार्य निमित्य घा लावें अमच्या मनोदयाप्रमाणें घडवाल हा अमचा चिताचा निशा आहे सर्वत्र दूर प्रदेसी होते ते आले आपलें येणे न जालें हे च आपूर्व वाटलें म्हणून लिा तरी आपण राये

+ + + स्वीत रम अंजन तलार। तान्हूल मरारजी बीरपडे निरंतर








Maharashtra State Archives

चूर प्रांतीं मोकाम करावयाविसीं पूर्वी लेख केला तदन्वयें भेटीची प्रतीक्षा करीत आसतां न आला म्हणून दर्शविलें हेंच आश्चिर्य वाटलें परस्परें भेटीचा लाभ घडावा हाच मुख्यार्थ जाणून राजश्री केशवराव यांस लिहिणें ते लेहून व सांगणे ते सांगून राजश्री विठल अनंत यांस पाठविलें आहेत ते पाऊन सर्व आर्थ कलोन तदनसार समर्पक करून उभयेताची र वानगी इकडे केलीच आसेल आम्ही आपणा सिवाये नाही आमचा भार आपणावर आहे उचित तें करावें †आपण लिहिल जे

† येथून अक्षर मुरारराव घोरपडे यांचे.








L 2602—19

Maharashtra State Archives

मद्यस्तीस दोश न लागावा याप्रकार सुचविल तर उभय ताही आपण आमास वडील या प्राती आलेवर आमचा दु सर विचार किमपि घडणार ना ही आमच मानस जे होणार राजकारण होतच आहेत परं तु आपले दरशणाचा लाभ हे च मुख्य बहुत लिहिणे तर सु ज्ञ असा हे विनंती

राजते
लेख
मार्यादे





Maharashtra State Archives

पेशवे दप्तरातून
निवडलेले
कागद, भाग २६
लेखांक १५७

क्र. २०


माघ व. ८ शके १६७२
७ फेब्रु. इ. १७५१

श्री

श्रीमंन्माहाराज मातुश्री आई
साहेब साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक उदाजी चवाण हिमतबाहादर मम लकलमदार कृतानेक दंडवत विज्ञापना ता छ २१ रबिलोवल पावेतों साहेबांच्या कृपावलोक नेकरून सवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष साहेबी सेवकावर कृपाळू होऊन आज्ञापत्र सा








Maharashtra State Archives

दर केले ते मस्तकी वंदून सनाथ जाहालों सिवाजी खांडेकर याबा संकेत सागोन पाठविला तो आज्ञेप्रमाणें यानी सांगितला येशिया स सेवक आज्ञाधारक असो साहेबी आज्ञा केली त्याचप्रमाणें विचार होईल येविषई चा अर्थ कितेक सिवाजी खाडेकर यांजवल सांगितला आहे सेवेसी येऊन विनंती करितील त्याजवरुन श्रुत होईल सेवकास साहेबा च्या पायाखेरीज दुसरें दैवत नाही सेवेसी श्रुत होय †हे वीज्ञापना

पौ छ २६ रबिलौवल

† 'हे विज्ञापना' ही अक्षरें उदाजी चव्हाण यांचे हातची.





पे. द. भा. २६ । लेखांक १६५

क्र. २१


चैत्र शु. १३ शके १६७४ । १६ मार्च इ. १७५१

श्री शंकर

श्रीमंत राजश्री नाना व ता
श्रीमंत भाऊ स्वामींचे शेवे
सी

विनंती सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृ
तानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील
कुशल ता छ २९ राखर पर्यंत स्वामी








L 2602—30

चे कृपेकरून सुखरूप असो विशे
ष अज शनवारी संध्याकाली राजश्री बाबा
स राजश्री नानाचे पत्र सातारियाहून
आलें कीं गायेकवाडाची आमची गाठ प
डली जूज जालें वेणेचे माथ्यावर आलीकडे
गाठ पडली जूज होत नदीपर्यंत गेलों
तेथे त्याचा मोड जाला पळून शहरां
त गेला पालख्या वगैरे लूटून पस्त
केला म्हणून पत्र आले त्याची नकल पाठ
विली असे संतोषाचे वर्तमान स्वामीस
कलावे म्हणून लिा असे या उपरि तो हि
रमोड जाला तेथे कोंडला इतक्यांत ता
बडतोड (ब) जर या प्रांती लौकर स्वामीचे येणे
होते तर जितक्यानी कुफराणे केले ति










Maharashtra State Archives

तवयानी फजित पाऊन स्वामीस शरण आले ऐसे होईल आणि सर्व मनसबा सिधी स जाईल परंतु यां प्रसंगीं इकडे येणें फारसे उपयोगांत पडेल इतके दि वसांत तिकडीलही सर्व मनसबा उल गडलाच असेल तर लौकर यावें उचित अ से तेथून सविस्तर लिहून आल्यानंतर सविस्तर वृत लिहून पाठऊ बहुत कायें लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

संपूर्ण पत्र त्रिंबकराव विश्वनाथ (मामा पेठे) यांच्या हस्ताक्षरात.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २३
लेखांक ५०

क्र. २२


वैशाख ब. २ शके १६७४
१९ एप्रिल इ. १७५२

श्री

तीर्थरूप राजश्री नाना
ता राजश्री भाऊ वडिला
चे सेवेसी

आपत्यें विस्वासराव साष्टांग
नमस्कार विनंती येथील कुशल
ता छ १५ जमादिलाखर प्रहर रात्र








Maharashtra State Archives

मुा खेडले परमानंदाचे पाा नेवासें
सुखरूप आसों वडिलाची आज्ञा घे
ऊन स्वार जालों ते मजल दरमजल
येथपर्यंत आलों आजी ये मुकाम
आहे उदईक कूच करून मौजे बे
लपाढरी येथे लग्नमंडप जाले आहे
त तेथे जाऊन राजश्री माहाराऊ जा
नोजी जसवंत निबालकर आजीच तेथे
गेले त्याची आमची उदईक भेट
होईल वैशाख बद्य चतुर्थी मंग
लवारी लग्न निस्चये जाला आहे
विदीत जाले पाहिजे हे [1]विनं
ती

[1] येथून पुढे विश्वासराव याचे हस्ताक्षर.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २६
लेखांक १९९

क्र. २३


कार्तिक शु. १३ शके १६७४
१९ नोव्हें. इ. १७५२

श्रीआईआदि पुरुष

सकलगुण अलंकर्ण अखंडित
लक्षुमी अलंकृत राजमान्य
राजश्री बालाजी पंडित स्वामी
गोसांवी यांसी

पोष्य जगजीवन परशराम कृतानेक
नमस्कार विनंती येथील कुशल जाणून








L 2602—21a

Maharashtra State Archives

स्वकीयें लेखन करविले पाहिजे विशेष वि
शेष पूर्वी आपलें पत्र आलें होते जे राजश्री
त्रिबकराव यासमागमे काही फौज पाटऊ
न तुम्ही तिकडील बंदोबस्तास राहाणें म्हणू [न]
लिहिल होते त्याजप्रमाणे त्रिबकरायास
मागमें फौज पाठवावी तरी त्रिबकराव निघो
न गेले याजकडील हिकडील बंदोबस्त करून द
क्षणेकडील मनसबा घडत होता तो वि
घड करून राजश्री गमाजीस दीड हजार फौज
नामी लोक बराबरी रवाना केला इतकियां
त राजश्री बाबूराव सदासिव आपल्याकडे
यावयासी म्हणून नीरानरसीहपुरापावेतो
जाऊन तेथे मुकाम करून जमाव पाच सातसे
राऊत करून राजश्री अंबाजी नाईक यांसी पुढे
किले तावबडा येथे पाठऊन आपण लोकि
कांत गेले ऐसे दृश्यमान करून येकायेकी
निघोन तावबडियास आले आम्ही सातारा
श्रीमंत मातुश्रीच्या दर्शणास गेलो होतो








Maharashtra State Archives

राजश्री येमाजीपंत किणयेस होते बातमी समागमे लस्करात होती छ १२ मोहरमी बातमी कलताच आम्ही निघोन किणयेस आलो पुढे नाईकावरी फौज पाठऊन विचार क राया तो उभयतां नाईक मजकूर किणयेस येऊन मध्यस्त घालून सांगोन पाठविले की भेटी घेऊन जाऊ घरास आलियानंतर इतर आर्थ न करावा याजकरितां भेटी घेऊन निरोप दिला बहुतां काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

† येथून पुढे जगजीवन परशराम यांचे हस्ताक्षर.





पे. द. भा. २४
लेखांक ९


क्र. २४

पौष शु. ३ शके १६७४
२२ जाने. इ. १७५३

श्रीभवानी प्रसन्न

सेवेसी विनंती सेवक येमाजी सिवदेव कृतानेक विज्ञापना ता। छ १६ रबिलौवल मुकाम केडगाव साहेबाचे कृपे करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष साहेबी आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा जे किले विशालगड येथे आसमंतादभागें








L. 2602—22

Maharashtra State Archives

राजश्री तुळाजी आंगरे यानी वेढा बसवू न जागियास आपाय करावयाचा योजिला आहे तरी तुम्हीं अविलंबे जाऊन वेढा उठ ऊन पारपत्य करणे तुमच्या साहित्याविसी राजश्री स्वामीस व राजश्री उदाजी चव्हाण यांसी व राजश्री मालोजी घोरपडे यांसी पत्रे पाठविली आहेत तेही सामील होतील तुम्हीं जाणे म्हणून आज्ञा आज्ञेप्र माणे सेवकानी श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी यांस विनती करून सिधता केली आहे परंतु राजश्री पाराशरवांसी यांची फौज व राजश्री उदाजी चव्हाण व समस्त काटक जमा होऊन मिरजे सभवत्या खंडणी या घेऊन मिरजेनजीक बसले होते त्यास व बाव घालून फौजेत फूट करून राजश्री








L 2602—22a

Maharashtra State Archives

स बहुता प्रकारें सांगोन पाठवावयाचे पा
ठऊन मिरजेचा शह उठऊन म्हशालावरी
मुकामास लाऊन दिले तेथूनहि परस्परे बिघ
ड योजून स्वस्थलास जावयाची योजना
केली आहे आम्ही उदियाच्या दिवसात हि
कडील निश्चिती करून मिरजेचे संरक्षण
जाले ऐसे दृढोतर करून कूच करून आंग
रकाच्या पारपत्यास आलेप्रा जाऊ सर्व
साहित्य करणार साहेब धणी आहेत सेवेसी
श्रुत होये हे विज्ञापना

संपूर्ण पत्र महादजी शिंदे यांच्या हस्ताक्षरात.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २६
लेखांक २२०


क्र. २५

फाल्गुन शु. ३ शके १६७४
८ मार्च इ. १७५३

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब या
सी राजमान्य राजश्री चिमणाजी पंडित सचिव या
सी आज्ञा केली येसीजे अंबरी गुरव व मल्हारी गुरव मौजे
लोहामकर याणे तुफान करून दताजी पा गायेक
वाड यासी मारून पळाला तो किले विचित्रगड तेथे
जाऊन राहिला आहे तरी ये गोष्टीची बाजपूस करा
वी लागती याजकरितां गुरव मजकूर हा आसपास








Maharashtra State Archives

कोणे गावी असेल अगर किले मारी असेल त्यास हुजूर पाठवणे या कामास सुभानजी नलवड हुजरे पाठविले यांसी खर्चास रुा १० दाहा देविले हे गुरव म अकुरापासोन देववणे जाणिजे छ २ जमादिलोवल सुहुरसन सलास खमसेन मया व अलफ †बहुत लिहि णे तरी सूज्ञ असा. लेखन सीमा

† येथून पुढे ताराबाईचे हस्ताक्षर.

(पाठीमागे)] बार बार पौा छ १९ जमादिलोवल पराणु न बद्ध मानसी







Maharashtra State Archives

पे. द. भा. २३
लेखांक ६६
पौ छ ४ सवाल

क्र. २६


आषाढ शु. २ शके १६७७
११ जुलै इ. १७५५

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राज
श्री जनार्दन बलाल स्वामी गो

पोष्य बालाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनं
ती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लि
हित जाणे विशेष सालमजकुरी फौजेची








L 2602—23a

Maharashtra State Archives

समजावीस लौकर करून स्वारीचा डौल त्वरित जाला पाहिजे ऐशास रसदाचा पट आकारून मामलेदारापासून रसदा घ्यावयास प्रारभ करणे श्रावणमास समीप आला व क्षणेस ऐवज पाहिजे तर मातबर मातबर मामलेदार ज्याचा गुता नाही त्याजपासून ऐवज रसदेचा घ्यावयास आरभ करणे पचवीस तीस लाख रुपयेपावेतो ऐवज लौकर जमा होये ऐसी तरतूद करणे सालमजकूरचा रसदेचा अजमास पाऊण करोड असी लाखपर्यंत आहे ऐवज जमा करावयाचा डौल करणे मातबर मामलेदार राजश्री गोविद बलाल व नारो शंकर व हरि विठल इत्यादि



Maharashtra State Archives




क आहेत याच्या कारभारियांस ताकीद करून ऐवज रसदेचा लौकर मागणे सर्व लाहानथोर कमावीसदार यांस रसदेविसी पत्रें लेहून पाठवणे आणि ऐवज जमा करावयाची तरतूद करणे। रसदाचा पट व कोणी माहाली काये दिक्त हे तावार पट लौकर पाठऊन देणे येथूनहि कलेल त्याप्रो लेहून पाठऊन तूर्त यैवज जमा करावयास प्रारंभ करणे पत्रे पाठवणे रा छ १ सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

पो छ ४ सवाल

१ येथून पुढे नानासाहेब (बाळाजी बाजीराव) यांचे हस्ताक्षर.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २८
लेखांक १२४

क्र. २७


पौष व. १० शके १६७७
२६ जाने. इ. १७५६?

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी


विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक सा। नमस्कार विनंती ता। पौष्य वद्य दशमी पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष





आम्हाकडे सालस दोन तीन हजार फौज सरकारी ताबीनात असते त्यास राजश्री गंगाधर बाजी राव यांचें पथक गेलियावर मोबदला फौज न आली गाजीपुरी फौजेचे प्रयोजन पडलें ते व्हां राजश्री हरिपंती ब्यारसे स्वार आपले दिल्हे च्यार महीने होते त्यानंतर मारनिलेही खासा को डाजाहनाबाजेस अले होते इतकियात मेघ पुरीचा फितूर पडला तिकडे आम्ही गेलों तिकडेही ब्यारसे स्वार याचे गेले होते आम्हास तिकडे महिना पंधरा दिवस गुंता पडला पंत मारनिले काल्पीहून स्वार होऊन राजे जगतरा ज याजकडे आले कर्जपटी निमित्य दबाव देऊन कर्जपटीची मामलत चुकविली इतकियांत अम्हीही येथे दाखल जालों उभयेताही काली








I. 2602—24a

आम्हाकडे सालस दोन तीन हजार फौज सरकारी ताबीनात असते त्यास राजश्री गंगाधर बाजी राव यांचें पथक गेलियावर मोबदला फौज न आली गाजीपुरी फौजेचे प्रयोजन पडलें ते व्हां राजश्री हरिपंती च्यारसे स्वार आपले दिल्हे च्यार महीने होते त्यानंतर मारनिल्हेही खासा को डाजाहनाबाजेस अले होते इतकियात मेघ पुरीचा फितूर पडला तिकडे आम्ही गेलों तिकडेही च्यारसे स्वार याचे नेले होते आम्हास तिकडे महिना पंधरा दिवस गुंता पडला पंत मारनिले काल्पीहून स्वार होऊन राजे जगतरा ज याजकडे आले कर्जपटी निमित्य दबाव देऊन कर्जपटीची मामलत चुकविली इतकियांत अम्हीही येथे दाखल आलों उभयेताही काली








I. 2602—24o

Maharashtra State Archives

जरास जाऊन मागील पैशाची वाट करून घ्या वी पुढे कर्जपटीची टीपटाप करार करून घ्यावा तों अंतरवेदींत फितूर जाला सकुराबादेचें ठाणे उठलें तमाम आमल बंद जाहाला जरूर जाणोन हरिपंत यांसी फौजसुधां तिकडे घेऊन गेलों अंतरवेदींत पांच हजार फौज जरूर असी पाहिजे फौज न आली तर दस्त राहाणार नाहीं [1]येविसीची विनंती दोन तीन पत्री लिहिलीच आहे वजीर बेइमानीस आला तमाम आंतरवेदची सनदें करून फितूर आरंभिला त्यास चार हजार फौज बहुत तावडतोब येते उपराला होतो तर अमल राहील आम्ही विनंती चारे वेळा लिहिली हे जागा विना फौज दस्त येकदर राहात नाही त्यास खावंद खबर न घेत तर आम्हा सेवकाचा

[1] येथून पुढे गोविंदपंत बुंदेले (खेर) यांचे हस्ताक्षर.








Maharashtra State Archives

उपाये काये हजार विनती हेच जाणावी दुसरे पत्र यावयासी दोन महिने' पाहिजे मार्गेही दुर्घट जाले माणूस पावले न पावले याजकरिता फौज तैनाती सत्वर पाठवावी येथे फजिती जाली ठाणी उठो लाग ली असता जो इलाज तो करित आहो हे इलाजास उपा ये नाही रा। हरिपंत आम्ही दर मजलीनी माघारे गेलो सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना





पे. द. भा. २४
लेखांक १४९

क्र. २८


पौष व. १० शके १६७७
२६ जाने. इ. १७५६?

श्री

तीर्थस्वरूप राजश्री बाबुराव
वडिलांचे शेवेसी

अपत्यें जनार्दनाने सां नमस्कार विनंती येथील
क्षेम ता छ २३ रागर पावेतो येथास्थित असे
विशेष वडिलांनी छ २२ रागरचें आसिर्वाद पत्र








L. 2602—25

Maharashtra State Archives

पाठविलें तें पावलें जनार्दन देव व मानाजी आगरे याजकडील मजकुराची पत्रे पावली नाही म्हणोन लिा त्यास आम्ही तो डांके बरावर रवाना केली ते वाटेस राऊतानी गमाविली यांत आमचा उपाय काय व आपलाही उपाय नाही हाली हे पत्र लिहून पाठविले आहे तर कानोजी आगरे याचा व भोरले नानाचा तहनामा आला आहे तो दप्तरी उमगेल तर त्याचा शोध करून पाठऊन द्यावा व त्या आला कडे राव संन खंमस सलासीनामध्ये कुलाबि यास गेले होते ते समई मानाजी आगरे याचा तह केला आहे व त्याजकडील हिसेबहि केला आहे तो गणेशपंत पेठसे यास ठाऊक असेल अथवा








L 2002—250

Maharashtra State Archives

दप्तरी असेल त्याचा शोध करऊन पाठऊन द्यावा त्या उपर आपा सन आंर्बा आर्बेना मध्ये कुलाबियास गेले होते ते समई मानाजी आगरे याचा तह जाला असिला तर त्याचाहि दप्तरी शोध करून अथवा गणेशपंत पेठसे यास पुसोन असिला तर पाठऊन द्यावा व मारनिले कडे साल दरसाल मक्ता किती करार केला आहे त्याचा वसूल सालेसाल काय आला आहे तो हिसेब आजतागाईत निवडऊन तहता ला करून पाठवावा मारनिलेकडील कोठीस जिनस आला असेल तर कोठीस शोध करून निवडून








Maharashtra State Archives

लिहोन पाठवावा या खेरीज मारनिलेकडील कामा काजाच्या यादी तहनामे याचे पाठीमागे व हिसेबाचे पाठीमागे असतील त्याचाहि शोध करऊन कुल पाठऊन द्याव्या व संन ईसने सलासीना मध्यें राव व आपा कुलाबियास गेले होते ते समई सेखोजी आगरे याचा तहनामा जाला असिला तर त्याचाहि शोध करऊन पाठऊन द्यावा व ते समई हिशेब जाला असिला तर पाठऊन द्यावा येणे प्रमाणे लिहिणारास ताकीद करून सत्वर पत्र पावतांच रवानगी करावी[1] बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

१ येथून पुढे लेखकाचे हस्ताक्षर







Maharashtra State Archives

वे. द. भा. २१
लेखांक ८३


क्र. २९

फाल्गुन व. १४ शके १६७७
२९ मार्च इ. १७५६

श्री

राजश्री मल्हारजी बाबा होलकर
सुभेदार गोसांवी यांसी
ॐ
सकलगुणालंकर्ण अखंडित लक्ष
मी आलंकृत राजमान्य स्नो अ
ताजी माणकेस्वर आसिर्वाद विनं
ती उपरि येथील कुशल ताा फा








L 2602—26

Maharashtra State Archives

लगुण वद्य १४ मुा नजीक रुपनगर
सुखी आसों या प्रांतीचे वर्तमान
आम्ही याजपासी राजश्री जयापाचा
काल जालियाउपरि आलों ते साद्यंत पूर्वी
दोन वेला तपसील सेवेसी लिहिलाच
आला जे आमच्याने श्रमसाहास जालें
तें जिवापेक्षा दाहा हजार फौज घेऊन
केलें याचें श्रीमतास त्यानी काये
लिहिलें असेल न कले प्रस्तुत बि
जेसिगाने मामलत पंनास लाखांची
केली निमे मुलूक वांटणी व जालो
र किला बिल्हा नागोर जोतपूर बि
जेसिगाकडे राहिलें या प्रा स
लूख करुन येक महिना जाला कू
च केले आहे साहेबांस कलावें म्हणून
लिहिलें असे आपण सदैव कृपा










Maharashtra State Archives

मुद्रेचा शंभुवरम
हुइ निशान सर्वदा
मार्तंडेश्वर संभूत
अनंतराव विराजत

करून पत्री सांभाल करीत आ
सावा माया निस्टूर न करावी
आमचें विशीं श्रीमंतांसही
विनंती करून सर्व प्रकारें ते कृ
पाच करीत तें करावयासी
आपण वडील आहेत पहिलेपा
सन आपले आहों त्यापेक्षा कृ
पा करून सांभालास अतर न करा
वें आपणाकडील साद्यंत वर्त
मान लिहून संतोशवीत आसा
वें आतां प्रस्तुत मारवाडचा गुं
ता नाहीं पुढें होईल वर्तमान
तें तपसीलवार लिहून पाठऊन
आपला गुंता त्या प्रांतीं कि
तीकां दिवसांचा आहे या प्रां








Maharashtra State Archives

ती कधी येणार तें लिहून
संतोशविलें पाहिजे बहु
त काये लिहिणें कृपा लो
भ आसों दिल्ही पाहिजे हे वि
नंती मोर्तब सुद

संपूर्ण पत्र अंताजी माणकेश्वर यांच्या हस्ताक्षरात.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २७
लेखांक १२७

क्र. ३०


वैशाख शु. ५ शके १६७८
४ मे इ. १७५६ ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायेत छ २३ जमादिलाखर मुकाम नदी धसाण नजीक जयेतपूर स्वामीचे कृपावृष्टीकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे यानंतर स्वामींनी मार








L 2602—27

Maharashtra State Archives

वाडची मोहीम सेवकास सांगितली त्या प्रमाणें फौजसुधा नरवरेपावेतों गेलों तो राजश्री समशरबाहादर यांचें पत्र अलें जें अम्हीही जलदीनें येत असों तुम्ही अम्ही येकत्र होऊन पुढें दरमजलीनें जाऊ त्याजवरून पंधरा दिवस वाट पाहिली तों इतकियांत राजश्री जनकोजी सिंदे यांज कडील पत्रें अली जें मारवाडची सला जाहाला इकडील गुंता थोडियाच दिवसात उरकून अम्हीच त्या प्रांतास येत असों तुम्ही मारवाडात न येणे अंतरवेद प्रांती जमीदारानी बखेडा अरंभिला आहे तिकडे जाऊन राजश्री गोविंदपंत व तुम्ही ये कत्र होऊन सरकारचे मुळूकाचा बदबस्त






राखणें त्याजवरून अम्ही नरवरचे मुका
मीहून माघारें फिरलों राजश्री गोविद
पंताकडून कारकून राजश्री मोरोपंत बो
लावाण्याकरितां अलेंच असेंत याजउ
परि अंतरवेद प्रांती जाऊन राजश्री गो
विदपंताची भेटी जाहालियावरी त्या प्रां
तीचें सविस्तर सेवेसी लिहोंन पाठऊ वरकड
या प्रांतीचे वृत साद्यंत राजश्री रामा
जी माहादेव सांगतां कलों येईल मतलबची
यादी पंत मशारनिलेसमागमें पाठविली
असें ध्यानास अणून अज्ञा कर्तव्य ते
कृपा करून उतर ल्याहावें *बहुत का
ये लिहिणें हे विज्ञापना

* येथून पुढील मजकूर नारो शंकर दाणी (राजेबहादर) यांच्या हस्ताक्षरात.







Maharashtra State Archives

पे. द. भा. २७ लेखांक १५८

क्र. ३१

जेष्ठ शु. ९ शके १६७९ २७ मे इ. १७५७

श्री


पौ छ १७ रमजान सन समान

श्रीमंत राजश्री दादासाहे

बाचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता छ ८ माहे रमजान भृगुवासरपर्यंत मुा भुसावर येथे स्वस्तीक्षेम असो विशेष स्वामीनी अगत्याच्या मुख्याच्या








Maharashtra State Archives

सनदा आम्हास दिल्ह्या आहेत यैसीयास प्रस्तुत रूपराम कटारे येथे अले आहेत त्यासी काही मामल तीचा मजकूर बोलावा किंवा न बोलावा आथवा बोली चालीचा आर्थ सरकारातूनच होईल या अशयाची आज्ञा जाली पाहिजे आम्हाकडे सुभा तो निश्चयात्म क दिल्हाच आहे परंतु खावंदाचे मर्जीस काये येत या स्तव विज्ञाप्ति लिहिली आसे। स्वामीचे मरजीस नसले तर सनदा स्वामीच्या स्वामीकडे पाठऊ प्रस्तु (त) स्वा मीचे मरजीस त्याची मामलतच करावी यैसे असले तर ती माम ल (त) करून वसूल आमचे स्वाधीन करावा आमचा वलवटा त्या सी राहील कमाविसद[ार] त्याजवल

† येथून पुढील हस्ताक्षर विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या हातचे.








L 2602—28

Maharashtra State Archives

राहातील जे समई स्वामीचे
चिती जागा सोडवणे तेव्हा
आमचा आमल बसऊन देवावा
बाजबी गोष्ट जैसिगाकडे सु
भा होता त्याप्राा आगरे हवेली वगैरे
हवेलीचे माहाल असतील त्यात आ
मल सुभ्याचा आसावा मसूर
ददेखील हे येक करावे नाही
तर सुभाही न द्यावा आमल
ही न द्यावा पैका थोडा बाब
पावेतो कमबेश मामलत करून
सर्व मुळुक कोडीचा खावा यै
से असले तर तों जे देईल त्यां
ची निशा सावकारी आमची








L 2602—28a

Maharashtra State Archives

द्यावी आम्हास सिबंदी न द्यावी स्वामीचा रुपया व सिबंदी यैसी वारुन सरकार चा नक्ष राखू यात जे मरजी स येईल त्याप्रा सवारा मपंत बापूस यांस त्याहावे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.





२१२

पे. द. भा. २७ }
लेखांक १९७ }

क्र. ३२

{ श्रावण व. ८ शके १६७९
{ ७ ऑगस्ट इ. १७५७


श्री

पो छ २४ जिल्काद

राजश्री सखारामपंत बा
पू गोसावी यांसी

ᳲ सकलगुणालंकरण अखंडितल
क्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो सम
शेरबाहादर सलाम विनंती उपरि
येथील कुशल जाणोन स्वकुशल
लिहीत असिले पाहिजे विशेष आपण
पत्र पाठविले पावोन संतोष जाला








Maharashtra State Archives

लिहिलें वृत्त कललें बलोंचाच्या मु
लकाची ताकीद करवावी म्हणौन
लिहिलें येशास श्रीमंत राजश्री दादा
साहेबांची स्वारी रेवाडीच्या मुका
मी असतांच आलीबाहादूरखान ब
लोंचाच्या माहालांची ताकीद होई
ल छ २१ जिल्कादी झील उतरो
न श्रीमंत समेत तोफखाना स्वार
वे ता रेवाडी येथे येऊन मुकाम
केला आपली भेट लौकरीच होई
ल कलावे रा छ २१ जिल्काद [1]ब
हुत काये लिहिणे लोभ
कीजे हे विनंती

1 येथून पुढें समशेर बहादर यांचे हस्ताक्षर.








Maharashtra State Archives

लिहिलें वृत्त कळले बलोंचाच्या मुलकाची ताकीद करवावी म्हणौन लिहिलें येशास श्रीमंत राजश्री दादा साहेबांची स्वारी रेवाडीच्या मुकामी असतांच आलीबाहादूरखान बलोंचाच्या माहालांची ताकीद होईल छ २१ जिल्कांदी झील उतरोन श्रीमंत समेत तोफखाना स्वार वे ता रेवाडी येथे येऊन मुकाम केला आपली भेट लौकरीच होईल कळावे रा छ २१ जिल्काद [1]बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती

[1] येथून पुढे समशेर बहादर यांचे हस्ताक्षर.









Maharashtra State Archives

पे. द. भा. २५
लेखांक २५४

क्र. ३३

माघ शु. ९ शके १६८१
२६ जाने. इ. १७६०

श्री


छ७ जमादिलाखर शनवार

शेवेशी विज्ञापना आले प्रो कूच करून स्वामी
चे पाटीमागें दोहो कोसावर येतो राजश्री दमाजी
गायकवाड याचे डेरे दांडे सारे गेले त्यास काही ना
ही याज करिता शेवेशी विनंती लिहिली आहे कोत
वाल डेरा लाहानसा घ्यावयास आज्ञा जाहाली तर देऊ
रा छ ७ जावर प्रांत:कालचा सा घटिका दिवस
हे विज्ञापना खंडागले घाकरचा घाट परवाचे
दिवशी चढून घाकरासच मुकाम आहे म्हणून
काल कृष्णाजी अनंत यांचे स्वारानी बातमी आणली
हे विज्ञापना

संपूर्ण पत्र नाना फडणविसाचे हस्ताक्षरात.



Maharashtra State Archives





L 2602—29a

पे. द. भा. २५ }
लेखांक २८६ }

क्र. ३४

{ फाल्गुन शु. ६ शके १६८१
{ २२ फेब्रु. इ. १७६०


श्रीगणराज

पो छ ७ रजब सितै
न फाल्गुन सोमवार

श्रीमंत राजश्री पंतभाऊ
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गोपाल गोविंद कृता
नेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ ४
रजब मो आंबिलवोहल स्वामीचें कृपें








Maharashtra State Archives

करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें
विशेष स्वामीनी लिहिल्यावरून श्रीमंता
नी दौलताबादेस पाठविलें बुधवारीं मो
काम मजकुरास आलों किल्लेदारांस पत्रें
पाठविलीं जें नबाबाचा व श्रीमंताचा स
ला जाला तहत किला श्रीमंतास दिल्हा
नबाबाचा परवाना आहे तुम्हीं आपणां
कडील कोणी मातबर माणूस पाठऊन देणे
त्यावरून त्याणी माधोंराव म्हणून प्र
हस्त पाठविला परवाना त्यांस दाखविला ते
म्हणों लागला जें आपण आपणांकडील को
णी ब्राह्मण माणूस पाठवावा त्याजसमा
गमें परवाना पाठवावा किल्लेदार परवाना पा
हातील त्यावरून मिर्जा कामीलबेग व








Maharashtra State Archives

नारों माहादेव याजसमागमें परवाना पाठ
विला त्याणी परवाना पाहिला उपरांतिक बो
लले जे तुम्ही परवाना आणिला खराच आहे
परंतु आपणास कांही आजीपावेतो पत्र
आले नाहीं म्हणून शफत केला बोलिले जे
आपणास परवाना वेगलां आलियाउपरि
उजूर नाही किल्यांत माणूस तीनसें
आहे दारूगोलीचे सामान करतात केवल
लबाडीच्या गोष्टी सांगत नाहीं त्या
मींनी नबाबाचा परवाना किलेदारास व
येक इतबारी मनुष्य परस्पर किलेदाराकडे
पाठवावा व दुसरे परवाने येक दोन सेवका
कडे पाठवावें नबाबानी किला तहत दिल्हा
परवानें सरकारां (त) दिल्हें येसें असतां कि









Maharashtra State Archives


लेंदारास आजीपावेतों परस्पर पत्र पाठ
विले नाहीं याचा अर्थ काये हाली विनं
ती लिहिल्याप्रो येक वेगला परवाना किले
दारास व सेवकाकडे येक दोन याप्रो
पाठवांवे किलेदाराचे पत्र आले तेच
सेवेसी पाठविले आहे किला माणूस पा
हून स्वाधीन करावा हे विज्ञापना
* उभयेता नवाबांचे परवाने असावे
(असावें) असा आशये किलेदारा
चा आहे यास्तव उभ
येताचे परवाने पा
ठवांवे
हे विज्ञापना

---

संपूर्ण पत्र गोपाळ गोविंद पटवर्धन यांचे हस्ताक्षरात.

* हा मूळचा मजकूर मोडी पत्राच्या पहिल्या पानावर तिरप्या ओळीत डाव्या बाजूस दिलेला आहे.







L 2602—30a

Maharashtra State Archives

पे. द. भा. ३८
लेखांक ३२

क्र. ३५


मार्ग. शु. ३ शके १६८३
२९ नोव्हेंबर इ. १७६१

श्री लक्ष्मीकांत

राजश्री रघुनाथपंत दादा
गोसावी यांसी

|| सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी
आलंकृत राजमान्य स्नो जानोजी भो
सले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती





श्री लक्ष्मीकांत
राजश्री रघुनाथपंत दादा
गोसावी यांसी
सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी
आलंकृत राजमान्य स्नो जानोजी भो
सले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती



Maharashtra State Archives

उपरि येथील कुशल जाणून स्वकीय
कुशल लिहित असिले पाहिजे विशेष
गोसांवियानी पत्र पाठविलें ते प्रवि
ष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला यावया
सी विरंग लागला आहे याजविसी विस्तारे लिहि
लें व मोगलानी देवस्थानी उध्वंस केला हे हि
दु धर्मास उचित नाही मंगलवारी पुष्य नेमि
ले आहे यास्तव रातोरात भेटीस यावें म्हणो
न लिहिलें ऐशियांस पैठणचे मुकामी गोसा
वियांचे पत्र आलें की गुजाल्याचा घाट चढू
न यांवे आम्ही आगाडीस घाट चढून जातो
याजवरून या सुमारे यावे तरी आपण घाट च
ढून गेलियावर मोगलाचा मुकाम घाटांखाली
होईल आमचा बुनगीचा गुंता म्हणोन








Maharashtra State Archives

श्री
श्रीशाहूरा
जपदांभोजभ्रम
रायित चिमणाजि
बाळाजितनुजमुद्रे
सदाशिवस्य
विराजते

करंजीच्या घाटाचे सुमारें आज छ १ जमादिलोवली सोला सतरा कोसाची मजल करून तिसगांवावर आलो तो आजच भेटीस यावयाविसी निकडीने पत्र आली ती सध्याकाली पोंहचली येथून सडे होऊन बुनगे ठेऊन रातोरात यावयाचे करावें तरी आपल्यास आम्हास फारच अंतर व बुनगीही ठेवावयाचे ठीक नाहीं त्याजवरून उदईक सोमवारी करंजीचा घाट चढून नगरा असपास बुनगे ठेऊन सडे होऊन मंगलवारी येऊन पोहचतो वरकड मोगलानीं बहूत बदराहा वर्तणूक केली याचे पारपत्य निश्च्य व्हावें यास्तव बहूत विषदें लिहिलें त्यास हाच दृढोतर विचार केलिया आपलेच प्रतापें होऊनही येईल रा छ मजकूर [1]सुज्ञ

१ येथून हस्ताक्षर [illegible].








L. 2602—31

प्रति विशेष कायै लिहिणे
कृपालोभ असु दिला पा
हिजे हे विनंती मोर्तब सुद







Maharashtra State Archives

सं. नि. का. ८
ह. क्र. १, प. क्र. ४०७३

क्र. ३६

शके १६८३-८४ ते १६८४-८५
इ. १७६२-६३


श्री

छ २२ सफर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी
जीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सुंदर सां नमस्कार विनंती प्रार्थना येसीजे स्वामी राजे राजश्री रामचंद्र मल्हार यांसी अज्ञा केली की सार संगमनेरच्या माहालाची जप्ती वसुलीची करून असनें त्यावरून राजश्री संगमनेर प्रांती आले आम्ही त्यांच्या अगमनापूर्वी जमाबंदीच्या कामामुळें ठाणे बेलापुरी होतों संगमनेरांत फौज नव्हती आम्ही सर्व प्रकारें त्यांच्या विश्वासावर बेफिकीर होतो मी हे आम्हा ब्राम्हणाच्या तालुकि








Maharashtra State Archives

यांत नव विगर कर नाहींत आम्ही या भरव सियावर असतां येकायेकी त्यांजकडील राऊत गांवात येऊन आमच्या ठाणियांत हंगामा केला त्यानी जप्तीची मात्र लोकास ताकीद करावी केवल अविश्वास करावा हें नव्हते दुसरें आकोले व धांदरमाल व सिनर येथें ठाणियाबदल हंगामा न करितां केवळ अम्हा ब्राम्हणावरच सखती केली त्यासी संगमनेरचे ठाणें कांही मातबरही नव्हतें मुलूकांतील ठाणी हस्तगत होतीं आणि अम्ही त्यांसी निग्रह करितों हेंही नाहीं त्यानी विचार न करितां सर्वांआधींच अम्हावर मोगलाईकडून शब्द आणिला त्यासी अम्ही सबं प्रकारें स्वामीकडील अभ्रा राखितो माहराज अम्हा लोकाचें छेत्र आहेत या करितां आपले सेवेसी विनंतीपत्र लिहिलें असे तर कृपावंत होऊन रामचंद्र मलार यांसी अज्ञापत्र द्यावें की तुम्ही दरोबस्त सार संगमनेरची ठाणी घेतली







Maharashtra State Archives

यांत नव दिगर कर नाहींत आम्ही या भरव
सियावर असतां येकायेकी त्यांजकडील राऊ
त गांवात येऊन आमच्या ठाणियांत हंगा
मा केला त्यानी जप्तीची मात्र लोकास ताकीद
करावी केवल अविश्वास करावा हें नव्हते
दुसरें आकोले व धांदरमाल व सिनर येथें ठा
णियाबदल हंगामा न करितां केवळ अम्हा
ब्राम्हणावरच सखती केली त्यासी संगमनेर
चे ठाणें कांही मातबरही नव्हतें मुलू
कांतील ठाणी हस्तगत होतीं आणि अम्ही
त्यांसी निग्रह करितों हेंही नाहीं त्यानी
विचार न करितां सर्वाआधींच अम्हावर मो
गलाईकडून शब्द आणिला त्यासी अम्ही स
र्व प्रकारें स्वामीकडील अश्रा राखितो
माहराज अम्हा लोकाचें छेत्र आहेत
या करितां आपले सेवेसी विनंतीपत्र
लिहिले असे तर कृपावंत होऊन रामचं
द्र मलार यांसी अज्ञापत्र द्यावें की तुम्ही
बरोबरल सार संगमनेरची ठाणी घेतली




Maharashtra State Archives

म्हणजे यांसी ठाणियाबदल खटखट करणें आधींच यांसी खटखट न करावी यांच्या ठाणियासी मुजाहिम न होणें अम्ही सर्व प्रकारे स्वामीचे पदरचे सेवक आहों या खेरीज दुसरी गोष्ट नांही मुलका प्राा जप्ती करावी या गोष्टीस अम्हास उजूर नाही आसपासचे ठानियास उपसर्ग न करता आमचे ठानियास निग्रह केलियामुले येव णाकडील शब्द आम्ही सर्व प्रकारे स्वामीचे स्थापित म्हनोन निरभये आसतो आम्हास जर याजकडील वसवास आसता तर आम्ही आपले बंदोबस्तीने आसतो त्यास स्वामी सर्वा ब्राम्ह नाचे छेत्र आहेत येवनाकडील शब्द दूर होये तो विचार करावा मुलकाची (चि)ठी जी घेतली यार आम्हास कोन्हेही प्रकारे दुराग्रह नाही विशेष काय लिा हे विज्ञप्त

संपूर्ण पत्र विठ्ठल सुंदरच्या हस्ताक्षरात असावे.







L 2602—32

Maharashtra State Archives

सं. चि. द. | ह. नं. ६


क्र. ३७

मार्ग. व. ५, शके १६८५
२५ डिसेंबर इ. १७६३

श्री

राजश्री पंतप्रधान सा
हेबाचे सेवेसी

ई श्रीमत सकळ गुणाळंकर्ण
आर्खंडित लक्ष्मी आळंकृत राजमा
न्य श्रीो मलारजी होळकर कृ
तानेक दंडवत विज्ञापना ये




थील कुशळ मार्गसीसं वद्य पचमीपावेतो येथास्थित आसे विशेष कृपा करुन पत्र पाठविळे ते पावोंन वृतांत कळो आळा राजश्री स्वामी च्या वेथेचा गुरुवारचा आर्थ लिहिळा त्याउपरि शुक्रवार चेही पत्र पावोन वृतांत कळो आळा त्यासी आज्ञेप्र माणे आजी रविवारी वाफगा वोहून क्च केळे सत्वरच डोवेसी येऊन पोहचतो [1] सेवसी श्रुत होये हे वि

ज्ञ:पना मोर्त वसूद

श्रीमदुक्तप्ता कालकरणी तत्पर खंडोजी सुत मल्हारजी होळकर.

१ येथून पुढे मल्हारजी होळकर यांचे हस्ताक्षर.





Maharashtra State Archives

सं. नि. का. १२
ह. क. १ प. क. ६२१४

क्र. ३८

शके १६९०-९१
इ. १७६९


श्री

पौ छ ४ साबान

राजश्री दादासाहेब गोसा
वी यांसी

॥ श्रीसकलगुणालंकर्णअखंडित
लक्षमी आलंकृत राजमान्य स्नो दमाजी
गायेकवाड सेनाखासखेल शंमशेर बाहा
दूर दंडवत विनंती उपरि येथील








Maharashtra State Archives

कुशल जाणून निजानंद लेखन करित असिले पाहिजे विशेष साहेबी कृपा करून पत्र पाठविले तेथे आज्ञा कीं फौजसुधा यावें लौकर ऐसें कितेक प्रकारें लिहिले त्यांस पूर्वी पांच च्यार वेळां सेवेसी विनंती लिहिली की या स्थळास गुंतोन दीड वर्षं जाहाले सांप्रत प्रांत राहाणे कठीन याजकरितां साप्रत अविधाचे पारपत्य जालेविणा प्रांताचा बंदोबस्त राहाणेच नाहीं ऐसें संकट जाणून फौजेच्या खर्चखाले अतिशय आधीच पूर्वीचे देणे भारी त्याहीमधे हे कर्ज आणीही लोकाचा गवगवा नित्यानी हे माहासंकटात पडलों आहों याजमुळे गुंता नाहीतर सरकारची










Maharashtra State Archives

श्री राजाराम छ
त्रपति अखिल प्रौढ प्रता
प पुरंदर दमाजी गाय
कवाड सेनाखासखेल
समशेर बहादर

पत्रे निस्यांनी यावी आणि दिवस काढावे हे आज पावेतो जाले नाहीं हे साहेब जाणत आहेत हे साकल्य निवेदन व्हावें येद निमित्य राजश्री रामचंद्र बसवंत याज ला लिहिले आहे ते विनंती करतील हे गो ष्टी दुस्तर साहेब कृपेने पार पडतील सरकारची पत्रे राजश्री आपाजीपंत याजकडे मामलत जाहाली तरी राजश्री गोपालराव याज ला सागून अंमल उधनखेकडे देवावा त्यांस गोपालराव यानी तो पेटलाद प्रगणीयाची गावें कौली मारित सुटले आहेत उभयेपक्षी त्यास ऐक्यभाव लौकर घडे ऐसें दिसत नाहीं याजकरितां










Maharashtra State Archives

श्री राजाराम छ
त्रपति अखिल क्षीद प्रता
प पुरंदर हमाजी नायें
कवाड सेनाखासखेल
समशेर बहादर

पत्रे नित्यांनी यावी आणि दिवस काढावे हे आज पावेतो जाले नाहीं हे साहेब जाणत आहेत हे साकल्य निवेदन व्हावें येव निमित्य राजश्री रामचंद्र बसवंत याज ला लिहिले आहे ते विनंती करतील हे गो ष्टी दुस्तर साहेब कृपेने पार पडतील सरकारची पत्रे राजश्री आपाजीपंत याजकडे मामलत जाहाली तरी राजश्री गोपाळराव याज ला सागून अंमल उधनळेकडे देवावा त्यांस गोपाळराव यानी तो पेटलाद प्रगणीयाची गावें कौली मारित सुटले आहेत उभयपक्षी त्यास ऐक्यभाव नौकर पडें ऐसें दिसत नाहीं याजकरितां






परस्परें कटाक्षामुळें प्रांताची खराबी आणि आम्हांकडील फौज त्यासमागमे च्यार मास पाहिजे ऐसा प्रकार या उभये ताचा मजकूर मागाहून लिहूं साहेब हु या करन्हार समर्थ †छ १ माहे रजब ब हूत काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती मोर्तब सुद

† येथून पुढे दमाजी गायकवाड यांचे अक्षर.







Maharashtra State Archives

सं.नि.का. रु. क्र. १५
पत्र क्र. ८६७१

क्र. ३९ अधिक चैत्र शु. १०, शके १६८८
२१ मार्च इ. १७६६

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री राम
शास्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष पुण्यास श्रीकेदारेश्वर याचे देवालयास उत्तरेस जागा सिवरामभट चित्राव याणी देवालय बांधिले ते समई देउल उत्तरेकडे थोडपानी साकुन निखालस जागा देवाची केली आवार सिवरा



श्री

वेदशास्त्रसंपन्नराजश्रीराम
शास्त्रीस्वामीचेसेवेसी
विद्यार्थीमाधवरावबलालप्रधाननमस्कारविनंती
उपरियेथीलकुशलजाणूनस्वकीयकुशललिहितजाणेंविशेष
पुण्यासश्रीकेदारेश्वरयाचेदेवा
लयासउत्तरेसजागासिवरामभटचित्रावया
णीदेवालयबांधिलेतेसमईदेउलउत्तरेकडेथोड
पानीसाकुननिखालसजागादेवाचीकेली




Maharashtra State Archives

मबाबानी घातलें असें असतां हाली त्या जाग्यावर सो फा केला आहे म्हणोन हुजूर विदित जालें येंशास ते जागा देवालयाखालें दिल्ही हे प्रमाण असतां तेथें सोफा बांधिला आहे तो मोडून लाकडे त्याची त्यास देणें भितीस विटा वगैरे खर्च लागला असल त्याचा अजमास पाहून जो ठरेल रुपया तो राजश्री नारो अपाजी याज कडून देविला आहे त्या जाग्यावर देवालय बांधावया स मारनिलेस आज्ञा केली आहे देवालये बांधितील घो डे कटकट करितील त्यास बरे वजने ताकीद करून कार्य करणें रा छ ९ सवाल सुा सीत सितैन मया अलफ बहुत काय लिहिणे †हे विनंती

पो छ २८ जिलकाद सुा सीत सितै न मया व अलफ चैत्र वद्य अमाव श्या

† येथून पुढे माधवराव बल्लाळ यांचे हस्ताक्षर.







L 2602—34

Maharashtra State Archives

चि. नि. का.
क. ५

## क्र. ४०

फाल्गुन शु. ९, शके १६९०
१६ मार्च इ. १७६९


श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो
सावी यासी

पोष्य नारायेणराव बलाल नमस्कार वि
नंती उपरि येथील कुशल जाणोन स्व
ये कुशल लिहित जाणे विशेष खास
जिलीबीतील बोभाटयांच्या काठया गैर



Maharashtra State Archives




कामी जाया जाहाल्या यास्तव दुस
न्या आणविल्या आहेत तरी तेथून
बोथाटघा तयार करून सुमार २० वीस
पिलाजी बावट हिमत तानाजी पडवल
खास जिलीब यास पाठविला आहे याजब
राबर पाठवणे रवाना छ ७ जिलकाद
सुरा तिसा सितेन मया व अलफ †बो
थाटघा जलद पाठवणें बहुत काय
लिहिणे हे विनंती फटाके दोन हजार
व चक्र्या पाच येणे प्रो पा
ठवणे हे विनंती

पौ छ १० जिलकाद फाल
गुन मास सन तिसा

† येथून पुढे नारायणराव बल्लाळ यांचे हस्ताक्षर.







Maharashtra State Archives

सं. नि. का. रु. क. १५
पु. अ. प. क. ८४८१

क्र. ४१


चैत्र व. ११, श वं
२ मे इ. १७६९

श्री

पौ छ २९ जिल्हेज तिसा
चैत्र ह्या रामजी जथे बनाजी
नाईक


सेवेसी हरी बल्लाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ २४ जिल्हेज मंगलवार मुा नजीक आलजापूर वर्तमान यथास्थित असे विशेष





आजच आपाजी बा पत्रें पा त्यांत गंगा
पुरास जावे लागेल म्हणौन लिा होते
त्यास गंगापुराहून पत्रें आली श्रीमंत
मातुश्री बाई पुण्यास येतात याजकरि
तां तिकडे जाणे मजकूर राहिला आतां
आज कूच जाले गुरुवारी टोक्यास जाऊ
शुक्रवारी मुकाम शनवारी कूच करुन दर म
जल वैशाख शुध षष्टीचे मुहूर्तास
पुण्यास येणार कळले पाहिजे फकीर
जी फडतरे यांचे वतनाची जपती केली
असे श्रीमंतास लिहिल होते त्याचे जाब
मागाहून पाठऊ व पुण्यांत माणसे
किती आहेत ते लिहिणे असे श्रीमंतानी
लिहिले होते त्याचे कारण काही लिहिले ना








L 2603—35

Maharashtra State Archives

ही म्हणौन त्यास श्रीमंत पुण्यास येणार माणूस आहे किती त्यात नेहे मी ठेवावे किती दूर किती करावे हा अजमास कळावयाकरितां मात्र लिहून आणविले होते दुसरा कांही अर्थ नाही सेवेसी श्रुत होय हे वि ज्ञापना

संपूर्ण पत्र हरी बल्लाळ फडके यांच्या हस्ताक्षरात.







L 2602—35a

सं. नि. का. द. क्र. २२
पत्र क्र. १३२१७

क्र. ४२


माघ व. १४, शके १६९५ ?
९ फेब्रु. इ. १७७४ ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो। यांसी

पो। रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनंती
उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहि
त जाणे विशेष पुण्याकडे काही गडबड जाली आहे म्हणू
न वर्तमान कळले त्यास तुम्ही तेथे असता गडबड व्हावी






असे नाही तुम्हास आढळल्यावर तुम्ही त्याहाबयास राहाणार नाही तरी काये वर्तमान ते सविस्तर लिहून पाठवणें [1]हुलड व्हावयाचे कारण लिहिणे व त्याची पैरवी तुम्हास होईल ते करणे खासा स्वारी जलद तिकडे येणार तुम्हास कळावे आणि जे छ २७ जिल्काद हे विनंती

१ येथून पुढे रघुनाथ बाजीराव यांचे हस्ताक्षर.





डेक्कन कॉलेज संग्रह


क्र. ४३ — अधिक वैशाख व. ३, शके १६९६ / २९ एप्रिल इ. १७७४

श्री शंकर

राजश्रिया विराजित राजमान्य रा
जश्री नाना यासी

प्रति सौ आनंदीबाई आसिर्वाद विनंती उपरि येथील कु
शल कुशल ता अधिक वैशाख वद्य ३ पर्यंत मुा
बऱ्हाणपूर येथे वर्तमान येथास्थित असे विशेष तु








L 2602—36

Maharashtra State Archives

म्हाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही हे अपूर्व आहे सर्वदा पत्र पाठऊन संतोषवीत जावे चि रंजीव नारायेणराव यास पुत्र जाहाल्याचे वर्तमान ति कडे हुजूर ल्याहावें आणि आम्हास न ल्याहावें असा तुम चा आमचा रुणानबंध आम्हाकडून नाही तुम्हांकडूनही नसेल असे आम्हास वाटते असे असोन च्यार पाच महिने पत्र न यावें हे काये कदाचित आम्हास म्हणाल की आपण पत्र पाठविले नाही तर मागे येक दोन पत्रे देशात कोणास लिहिली ते जामूद माघारे आले नाहीत यास्तव आम्ही पत्रे पाठविली नाहीत तुम्ही पंधरा दिवसाचे अंतराने पत्र बरोबर पाठवीत जावे किल्याची हवा बहुत सर द आहे लेकरु लहान यास्तव तुम्ही व राजश्री सखारा मपंत उभयेता विच्यार करुन ज्या जाग्यास ज्या गो








L 2602—36a

Maharashtra State Archives

ष्टीने लेकरास सुख पडे ते करावे तुम्हासही याजवि सी काळजी आहेच आम्ही ल्याहावे असे नाही थोरपणा ची रीत हीच आहे की कोणासी कोण्याही गोष्टीवि सी बहुत बोढू नये म्हणुक दाखविण्यात चमत्कार आहे असे आम्हांस वाटते परंपरा पाहोन योग्य असेल तो अर्थ समजून घ्यावा सूचना मात्र लिहिली आहे [1]बहुत काये लिहिणे हे विनंती

१ येथून पुढे आनंदीबाई यांचे अक्षर.





डेक्कन कॉलेज संग्रह

क्र. ४४

भाद्रपद व. ७, शके १६९६
२७ सप्टेंबर इ. १७७४

श्री


पौ छ २७ साबान खमस

राजश्री बाळाजीपंत नाना
गोसावी यांसी

॥ सकल गुणालंकरण अखंडित ल
क्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो
माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरि.




Maharashtra State Archives



येथील कुशल जाणोन स्वकीये कु
शल लिहित असिले पाहिजे विशेष आ
पण पत्र पाठविले ते पावले राजश्री
नागोराम आले यानी साद्यंत मार
सांगितला तो कलला त्यास इत:पर
श्रीमंताच्या येण्यास दिवसगत
न लागतां येऊन लौकर यावे म्हणोन लि
हिलें ते कललें ऐसियासी ऐविसी
चा मजकूर तरी श्रीमंताची मर्जी क
सकसी आहे हे आपल्यास लोपली नाहीं
तथापि नाना प्रकारचा प्रयेत्न क
रून तापी तीरी चांगदेवापासी उ
तर तीर पर्यंत येऊन आलो नदी उत







L 2603—37


Maharashtra State Archives

श्री
ज्योतिस्वरूप व
रणी मल्हार रायजी
जो सुत माहादजी
सिंदे निरंतर

रावयाचा गुंता आहे उतरावया
स दिवसगत लागल ती खरी वरकड
मजकूर आगोधरच लिा आहे रा छ २०
रजब [1]बहुत काये लिहिणे लोभ
कीजे हे विनंती मोर्तब
सुद

[1] येथून पुढे महादजी शिंदे यांचे हस्ताक्षर.







L 2602—37a

सं. नि. का.
प. क्र. १३५९२

क्र. ४५

कार्तिक शु. ७, शके १६९६
१० नोव्हें. इ. १७७४


श्री

थी छ २५ सवाल सन खमस सबैन

राजश्री माधवराव पं
डित प्रधान गोसावी यांसी

॥ सकल गुणालंकरण अखंडित
लक्ष्मी आलंकृत राजमान्य




श्री

राजश्रीमाधवराव पं
डितप्रधानगोसावीयांसि
सकलगुणालंकरणअखंडित
लक्ष्मीआलंकृतराजमान्य




Maharashtra State Archives

श्री शाहूरा
[illegible]

॥श्री॥ साबाजी भोंसले सेनासाहे
ब सुभा दंडवत विनंती उपरि
येथील कुशल जाणून स्वकीय
कुशल लेखन करीत आसिले पा
हिजे विशेष प्रा कडेवलीत येथील
देशमुखीची गुमस्तगिरीचे काम
राजश्री सदासिव गणेश यांसी सां
गितले आहे तरी यांसी वतनाविषई
राजश्री माधवराव नारायेण किले नगर
व राजश्री रंभाजीराव निंबालकर व रा
माहादाजी निंबालकर व राजश्री रामराव
निंबालकर व रायेभानजी निंबालकर व






Maharashtra State Archives

सिदे होलकर यासी पत्रे देऊन वत
नाचा रसुम सुदामत चालें तें केलें
पाहिजे सुधामत प्रमाणें काम चालत
आहे सांप्रत आपली ताकीद त्यास
असावी रा छ ७ माहे रमजान
[1]मुबाप्रती विशेष काये लिहि
णे कृपा लोभ असो दिल्हा पाहि
जे हे विनंती मोर्तब सुद

[1] येथून पुढे साबाजी भोसले यांचे हस्ताक्षर.







L. 2602—38

Maharashtra State Archives

डेक्कन कॉलेज संग्रह | क्र. ४६ | शके १६९०-९२ इ. १७६९-७०


श्री वरद

पौ छ २६ रावार इ
हिदे समानीन इा अजुर
दार

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक पुरुषोतम माहादेव कृता
नेक सां नमस्कार विज्ञापना येथील कु
शल ता छ २६ माहे रोवल मु॥ दिली स्वामी
चे कृपावलोकनेकरून येथास्थित अ
से विशेष इकडील सविस्तर वृत राजश्री








L 2602—38a

Maharashtra State Archives

बालाजी जनार्दन यास लिहिले आहे त्यावरून
श्रुत होईल [१]तात्पर्य इंग्रेजाचे पारप
त्यास पातशाहासहित नजरखाना
स काढावयाचे उद्योगांत आहों यां
चे मानस सरकारची फौज सरदार आलि
यावर शत्रूचे प्रांतात सिरावे
से आहे घडोन येईल ते मागाहून
विनंती लिहू कृपा करून हस्ताक्षर
पत्री सनाथ करणार स्वामी समर्थ
आहेत दर्शन लाभ होये तो सु
दीन कृपा केली पाहिजे हे विनंती

१ येथून पुढे सर्व अक्षर पुरुषोत्तम महादेव यांच्या हातचे.







Maharashtra State Archives

सं. नि. का.
र. क्र. १९, पु. क्र. ४
प. क्र. १०७७१

क्र. ४७


जेष्ठ शु. ५, शके १७०२
७ जून इ. १७८०

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बलवंतराव वांकडे यांसी

प्रति रामशास्त्री आसिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असावे विशेष माहादेवभट जोसी मौजे कड अलगांव पो शेवगांव याणी विनंती केली की








Maharashtra State Archives

आपले बायकोनें आपला दायाद ब्राम्हण वि[ठ]
ल जोसी यासी माल्याकरवीं जिवें मारिलें सा
मी व माझे दायाद बहिष्कृत आहेत मजला
न कलतां माझे बायकोनें दुष्ट कर्म केलें स्वा
मींनी कृपा करून आम्हा सर्वांस दोषा
स्तव प्रायश्चित घ्यावयाची आज्ञा केली
पाहिजे म्हणौन ऐशास माहादेव भट
जोसी यांचे बायकोनें बुध्धीपूर्वक विठल
जोसी यासी जिवें मारविलें यास्तव तिज
ला प्रायश्चित द्वादशाब्दपूर्वोत्तरांग
सहित संकल्प करावा मग कासीयात्रा
रामेश्वरयात्रा करून स्वग्रामी येऊन
उत्तरांगे करावीं इचा प्रायश्चिताचा










Maharashtra State Archives

संकल्प केल्यानंतर माहादेवभट जोसी व यांचे दायादांस संसर्गानरूप प्रायश्चित देऊन शुध्ध करावे याप्रो मुंगीकर समस्त ब्राम्हणास पेशजीं पत्र लिौा होतें परंतु ते पैठणकरांचे ग्रामण्यांतील शरीरसंबंधी यास्तव तुम्ही शेवगांवचे वगैरे ब्राम्हण मेळऊन लिहिल्याअन्वये प्रायश्चित देवून यांची शुध्धता करावी रा छ ३ जाखर सुा इहिदे समानीन मया व अलफ बहुत काये लिहिणे †हे आशीर्वाद

† येथून राजशास्त्री प्रभुणे यांचे हस्ताक्षर.







L 2602—39a

## क्र. ४८




श्री

[†]आसिर्वाद उपरि शरीर प्रकृत केवल नाजूक जाली आहे ज्वर येतो त्याकरिता अंग्र चालत नाही खर्चाची आबाल याजकरिता रा १०० शंभर पाठवावे बरा जालो तर मीच तुम्हास देईन नाहीतर येणे जाणे त्यात घ्याल तेहि नाही तर मी मामा तुम्ही भाचे काल देश तर तुम्हा

† सर्व पत्र सखाराम बापू बोकील यांचे हातचे आहे.








Maharashtra State Archives

सच येऊ परिणाम लाविला पाहिजे
दुसरें कोण आहे हे दुखणे परिणामाचे
च दिसते जर खर्चास पाठवाल तर ये
क गाई ब्राम्हणास द्यावी दाहा ब्राम्हणांचे तीर्थ घ्या
वे असे मनात आहे परंतु [तु]मचे स्वाधीन आहे
पुढे मुलाचे चालवणे तुम्हासच आहे
सविस्तर शरीर-प्रकृत सेद सागता क
लेल हे आसिर्वाद.







Maharashtra State Archives

सं. नि. का.
रु. क. १४, पु. क. ४
प. क. ७९४८

क्र. ४९


माघ ब. ८, शके १७०४
२४ फेब्रु. इ. १७८३

श्री

राजश्री बाळाजीपंत लेले
गोसावी यांसी

॥ अखंडित लक्ष्मी आलंकृत रा
जमान्य स्नेो आनंदराव धुळप
मुकाम अंजिरे विजयदुर्ग रामरा








L 2602—40

Maharashtra State Archives

म विनंती येथील कुशल ता
गायेत छ २१ रौवल आणीन
स्वकीये लेखन करीत असिले
पाहिजे विशेष आम्ही अरमार
सुधा स्वारीस निघोन गेलों
होतों त्यास बाहेर मालवणात
वीस जाबांवर इंग्रजी बंगाली त
रांडघाची गांठ पडली तेव्हा
अरमारचा येक जडाव करून तरां
दे दुबाज राखोन लढाई देऊन आडा
वणी करून पाडाव केलें श्रीमंता
च्या पुण्य प्रतापें फत्ते होऊन








Maharashtra State Archives

छ २० रौावली जंजिरे मारी आलों नारायण पालास घामत फार होतों यास्तव तेवढा बंदरी ठेऊन वरकड अरमार नस्तावरुन परभारें पुन्हा स्वारीस रवाना केलें आहे पैदास्ती तरांडयावर माल बंगाली कापड व रेसीम कचे व साकर व हस्तीदंत सुपारी हे जिनस आहेत कळावे बहुत काय लिहिणे लोभ करावा [1]हे विनंती

[1] येथून अक्षर आनंदराव धुळप यांचे हातचे.






डेक्कन कॉलेज संग्रह | क्र. ५० | पौष शु. ७, शके १७०५ ३० डिसें. इ.स. १७८४

श्री

राजश्री माहादजी सिंदे गो-
सावी यासी

ऽ॥ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी
अलंकृत राजमान्य स्नो॥ माधव
राव नारायण प्रधान आसिर्वाद विनंती
उपरि येथील कुशल जाणून स्वकी








Maharashtra State Archives

Maharashtra State Archives

य कुशल लिहिणे विशेष तुम्ही राजश्री बालाजी जनार्दन यांचे पत्री तिकडील बादशाहांचे वगैरे मसलतीचा व बं दोबस्ताचा मजकूर लिहिला व रा सदा सिव दिनकर यांजकडून लिहिविला तो सविस्तर मशारनिलेनी विनंती केल्या वरून विदित जाहाला पातशाही बं दोबस्ताविसी सरकारची आज्ञा वारंवा र येत होती त्यावरून पातशाहांसी रा जकारण करून आंगरेयांस आणिले त्यां चे सरदारानी आपसमध्यें फंदफि तूर करून दगे फटके केले त्याची पारप त्यं करून पातशाहांकडे आपली फौज पा ठऊन आणून भेट घेतली सरकारची बक्षिि








L 2602—41

री व मेरठ वगैरे माहाल करार करून घेतले व त्यांजवल सरकारची फौज ठेऊन जवलचा बंदोबस्त कुल केला म्हणौन लिहिले त्याव रून संतोष जाहाला पातशाहांचे म्हणे की बक्षिगिरी व मेरठ वगैरे माहाल देतो परंतु तुम्ही संनिध राहावे बक्षिगिरीची मुतालकी तुम्ही करावी पातशाहीचा बंदोबस्त करावा येविसी जसी आज्ञा ये ईल तसी वर्तणूक करू म्हणौन सदासि व दिनकर यांजकडून तुम्ही लिहवले ते विदित जाहाले ऐसियास तुम्ही तिक डे गेलां पातशाहांची भेट जाली त्यांचे संनिधचा बंदोबस्त फौज ठेऊन केला ही गोष्ट चांगली केली बक्षिगिरीचा








L 2602—41a

Maharashtra State Archives

प्रकार करार करून दिल्ही परंतु तुमचे
राहाण्याची अड घातली त्यास सरका
रचे नावे बक्षिगिरी करार करून दि
ल्ही तेव्हा ही गोष्ट वाजवी म्हणता
त पातशाही बंदोबस्त करून सरका
र लक्षाप्रमाणे सर्व हाताखाली ठेवणे
तेव्हां राहिल्याखेरीज कसा होतो व
पातशाहांजवळ मातबर सरदार कोणी
राहिला नाही त्यापक्षी तुम्हास रा
हा म्हणे ही गोष्ट त्यांस प्राप्त आहे त्यां
अर्थी तुम्ही राहावे बक्षिगिरीची व
स्त्रें काईद्याप्रमाणे व बक्षिगिरी
चे जागिरीच्या व मेरठ वगैरे माहाल करा
र करून घेतले त्याच्या व बक्षिगिरी








Maharashtra State Archives

च्या याप्रमाणे सनदा घेऊन पाठऊन देणें. बक्षिगिरीची मुतालकी तुम्ही करावी. पातशाही बंदोबस्त सरकार लक्षां प्रो करावा तुम्ही मातबर सरदार जिकडे काम पडेल तिकडे जावे करावे ही पहिल्यापासून रीत आहे आतां पातशाहाजवळ राहिल्यास चिंता नाही यात सरकारचा नफाच आहे परंतु पा
..............[फाटलें आहे].....
ले तर जावें लागेल तेथें कारभारी राहील तो काम चालवील या प्रमाणे बोलण्यात यावें बादशाही बंदोबस्त सरकारांतून व्हावा या गोष्टीचा उद्योग बहुत दिवस सरकारांतून आहे ती गोष्ट ईश्वरी इच्छेने होऊन तुम्हास यश

श्री
राजा शाहू नर
पती हर्ष नीधा
न बाळाजीराव ना
रायण मुख्य
प्रधान







Maharashtra State Archives


आले ही गोष्ट मोठी जाहाली त्यास तेथी
ल बंदोबस्त सरकाराशिवाय दुसऱ्या
चा पाय न शिरे असा असावा पुढें पात
शाहानी कोणी येक मातबर मनसबा
व मसलत जे करणे ते सरकारांत इतला
होऊन येथील सलाहाप्रमाणें होत जावे
सरकारचे सलाहाखेरीज कांही होऊ नये
ही गोष्ट मनांत ठेऊन या प्रो बंदोबस्त
करणें जाणिजे. छ १७ सफर सुा खमस[स]
मानीन मया व अलफ †बहुत काय
लिहिणे हे विनंती लेखन सीमा

लेखन सीमा

लेखन सीमा

† येथून अक्षर माधवराव नारायण (सवाई माधवराव) यांचे हातचे.









Maharashtra State Archives


आले ही गोष्ट मोठी जाहाली त्यास तेथी
ल बंदोबस्त सरकाराशिवाय दुसऱ्या
चा पाय न शिरे असा असावा पुढें पात
शाहानी कोणी येक मातबर मनसबा
व मसलत जे करणे ते सरकारांत इतला
होऊन येथील सलाहाप्रमाणें होत जावे
सरकारचे सलाहाखेरीज कांही होऊ नये
ही गोष्ट मनांत ठेऊन या प्रो बंदोबस्त
करणें जाणिजे. छ १७ सफर सुा खमस[स]
मातीन मया व अलफ †बहुत काय
लिहिणे हे विनंती लेखन सीमा

लेखन सीमा

लेखन सीमा

† येथून अक्षर माधवराव नारायण (सवाई माधवराव) यांचे हातचे.







L 2602-42

Maharashtra State Archives

डेक्कन कॉलेज संग्रह

क्र. ५१

माघ शु. ७, शके १७११
२२ जाने. इ. १७९०


श्री लक्ष्मीकांत

छ २८ जोवल तिसैन माघ

राजश्री बालाजीपंत ना
ना गोसावी यांसी

॥ सकल गुणालंकरण अखंडि
त लक्ष्मी आलंकृत राजमान्य








L 2602—42a

Maharashtra State Archives

श्रीमो रघोजी भोसले सेनासाहे ब सुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे वि शेष राजश्री गोविंदराव व गोविंद राव भगवंत तिकडील सांगितल्याप्रमाणे हैदराबादेकडील जाबसालात मुखतार व इकडीलही मुखतारी त्याचेच जिमेस व त्याचे लिहिल्याप्रमाणे येथून रा राम चंद्र दादो नामे प्रहस्त वाकीफकार यां सकागदासहित त्याजकडेस रवाना कर ण्यात आला तो तेथे पावलियावर उभये तास या कामाची कुल वाकिफगारी जाहालियावर किस्तबंदीच्या येवजी जे बो लणी मध्येस्तासी जाली जो निश्चये ठहरला तो उभयेतानी पत्राआन्वई इकडेस लिहिला त्या





पत्राच्याच नकला बजिनस आपणाकडेस पाठ
विल्या आहेत. त्याजवरून सर्व कळो येईल नवा
बाचे व मध्येस्ताचेही खलिते याच आन्वई
आहेत त्याची प्रत्योतरे तो पाठविली पाहि
जेत आपण जे समई लिहितील त्याच
प्रमाणे इकडून प्रत्योतरे लिहिण्या
त येतील व आमलात येईल वरकड स
विस्तर मजकूर राजश्री भवानी नागना
थ याचे लिहिल्यावरून कळेल. रा छ ६ माहे जे
मादिलोवल ¹बहुत काये लिहिणे लोभ
असो दीजे हे विनंती

श्री
श्रीशाहू रा
जपदांभोजभ्रम
रायित चेतस बि
[illegible]
[illegible]
विराजते


मोर्तब
सुद

मोर्तब
सुद

मोर्तब
सुद

१ येथून अक्षर रघुजी भोसले याचे हातचे.







Maharashtra State Archives


डेक्कन कॉलेज संग्रह | क्र. ५२ | शके १७११–१३ इ. १७९०–९१

श्री म्हाळसाकांत

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक अहिल्याबाई होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना येथील क्षेम स्वामींचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असे विशेष स्वामींकडून छ १५ रोजलचे आज्ञापत्र आले प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहाला तुम्हाकडील पेंढारी इकडे आणावयाचे परंतु करार मवारानेरीज










Maharashtra State Archives

आणित्याने मनस्वी उपद्रव करतील याकरिता पेंढारी याचे जमातदारास बोलाऊन त्यांसी बोलावे की तुम्हांबरोबर सरकारची येक हजार व आम्हांकडील येक हजार फौज नेहमी राहील आज्ञा होईल ति कडे जावे काम करावे मिलकत होईल त्या पौ नि मे सरकारांत द्यावे निमे तुम्ही घ्यावे जे जमा हो ईल त्याचा दाखला सरदाराचा असावा या प्रो ....ऊन ठराऊन घेऊन लिहून पाठवणे म्हणोन आज्ञा ऐसियासी पेंढारी यास देसी घेऊन जावे आणि त्यासी कराराप्रमाणे चालावे हे गोष्ट मार्गा ची आहे परंतु हजाराधरचे हजार बोलल्या प्रो कर तील हा भरवसा काये तथापि बिघाडच ठरून










Maharashtra State Archives

मसलत सिध्य जाल्यास येऊन जाणे प्राप्तच आहे जाबसालाची घळमल असता येऊन गेल्यास को की मुलूक उपद्रव लागेल याकरिता विचार पडतो परमुलूकात गेलियावर जोपर्यंत निर्वाह चालेल तावत्काल अवघड पडावयाचे नाही लूट मना जाल्यावर कांही व्यवस्था काढा वी लागेल आज्ञेप्रमाणे पेंढारी याचे जमातदा रास आणावयाकरिता कारकून व पागा पाठवि ल्या आहेत आले म्हणजे लिहिल्याअन्वये बोलण्यात आणून ठरेल तसे शेवेसी विनंती लिहून पाठऊ[1] मि ति कार्तिक वद्य ७ सप्तमी सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

[1] येथून अक्षर अहिल्याबाई होळकर यांच्या हातचे







Maharashtra State Archives


डेक्कन कॉलेज संग्रह    क्र. ५३    शके १६८७–८९ / इ. १७६६–१७६७

श्री

राजश्री हरीपंत तात्या
गोसावी यांसी

ऽ॥ अर्खंडित लक्ष्मी आलंकृत राजमा
न्य स्नेो तुकोजी होलकर दंडवत वि
नंती उपरि येथील कुशल जाणून




श्री

राजश्री हरीपंत तात्या
गोसावी यांसी
अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमा
न्य स्नेो तुकोजी होलकर दंडवत वि
नंती उपरि येथील कुशल जाणून




Maharashtra State Archives

स्वकीये लिहित आसावे विशेष आ
म्हाकडील माहाल गाव खेडी देसी आ
हेत त्याचा व इकडील जाबसाल आला
गेला त्याचे बंदोबस्ताकरिता येथू
न राजश्री केशो गणेश कुंटे यांस
लिहिले आहे ते आपल्यासी बोलत
जातील त्याप्रमाणे आपण बंदोब
स्त करून देत जावा रा छ २६
जिल्काद । [1]बहुत काये लिहिणे
लोभ आसो दीजे हे विनं मोर्तब सुद

श्री
म्हाळसाकां
त चरणी तत्प
र मल्हारसि सु
त तुकोजी हो
ळकर

१ येथून अक्षर तुकोजी होळकर यांचे हातचे.







I. 2602—44

Maharashtra State Archives

सं. नि. का.
ह. क्र. ५३

क्र. ५४

शके १७२१–४०
इ. १८००–१८१८


श्री †गजानन

राजश्री सदासिव भिका
जी गोसावी यांसी

ऐ अखंडित लक्ष्मी आलंकृ
त राजमान्य स्नो त्रिंबकजी
या डेंगळे रामराम विनंती उ
परि तुम्ही डाकेवर पत्रे या ती

† 'गजानन' ही अक्षरे त्रिंबकजी डेंगळे यांचे हातची.








L 2602—41

Maharashtra State Archives

पावली व दतु तलेकर याजबराबर जरीपटक्याचा भाला व भगवे निशा ण व चिरा तमामी या प्रो पो ते पावले डाकेतील पत्रात राजश्री गोविंद बेडेकर यांजकडील हिसेब लिहिला त्यांस राजश्री बापू गोड बोले यांसी रुजुवात करून येथे मारनिलेस रोजमऱ्याचा वगैरे ऐवज पावला त्याची याद करून पाठऊन देऊ कर्नाटकात राजश्री हैबतराव जगथाप वगैरे यास पत्रे लिहून पाठविली आहेत ही डाके








L 2002—43a

Maharashtra State Archives

वर रवाना करावी राजश्री गणेश त्रि
बाजी याजबराबर मेणवाती सत्रा पा त्या
याजकडे जाऊन लाखोटा देऊन
पत्रातील मजकूर त्यासी बोलून
कोन्हेरपंत नंदुरबार गुन्हतान
पुरास आहेत त्यास पत्र तोर
खेड येथील ठाणे रा बाजी हरि निा
त्रिबकजी डेंगले याचे हवाली करण्यावि
सी पत्र निखालस घेऊन पा
देणे राजश्री सेटजीचे नावाचा
लाखोटा पा आहे हा पावता क
रून उतर घेऊन जलद पा द्यावे








Maharashtra State Archives

पत्रे जगथाप याजकडे पा
ठऊन देणे वराता व यादी
तलेकर याजसमागमे पाठविल्या
आहेत. तुम्ही दरोबस्त तगा
दा करून ऐवज वसुलात आणावा
वराता मागाहून येतच आहेत
जासूद पत्र घेऊन या आहे तो
पलाला तरी डाकेत पत्रे पाठऊ
न द्यावे सेटजीचे पत्र लौकर या
वे रा छ १० रावल बहुत
काय लिहिणे हे विनंती







Maharashtra State Archives

Maharashtra State Archives